



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शनिवार ४ जूलै २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


## बस दरीत कोसळून 40 ठार

**लाहोर :** पाकिस्तानमध्ये शुक्रवारी पहाटे भीषण अपघात झाला. त्यानंतर बलुचिस्तान आणि खैबर पख्तुनख्वा प्रांतांच्या सीमेलगत असलेल्या दान सर परिसरामध्ये प्रवाशांनी भरलेली बस खोल दरीत कोसळली. यामध्ये ४० जणांचा मृत्यू झाला असून अनेकजण जखमी झाले आहेत. अलीकडील काळातील पाकिस्तानमधील हा सर्वात भीषण बस अपघातांपैकी एक मानला जात आहे. बस भरधाव वेगाने जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर बस महामार्गावरून घसरून दरीत कोसळली. अपघाताची माहिती मिळताच बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली आणि जखमींना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. बलुचिस्तान सरकारचे प्रवक्ते शाहिद रिंद यांनी सांगितले की, अपघातग्रस्त बसमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी होते. मूळ बसमधील प्रवाशांबरोबरच बिघाड झालेल्या दुसऱ्या बसमधील प्रवाशांनाही या बसमध्ये बसवण्यात आले होते.

# सरकारच्या निर्णयांना विरोध करणे हद्दपारीचे कारण नाही-उच्च न्यायालय

### पक्ष बदलावा, वॉशिंग मशीन आहेच



### भारत सरकार सर्व नागरिकांना गुलाम बनवते



**मुंबई/प्रतिनिधी :** भाजप मुर्दाबाद, अमित शहा मुर्दाबाद अशा घोषणा देणे एखाद्याच्या तडीपारीचे कारण ठरू शकत नाही अशा शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने मुंबई पोलिसांना ठणकावताना चपराक लगावली आहे. याचिकाकर्त्याच्या तडीपारीचे आदेश रद्द करतानाच न्यायमूर्ती माधव जामदार यांनी थेट पोलिसांना दंड ठोठावण्याचा इशारा दिला आहे.

फक्त आणि केवळ सरकारच्या निर्णयांना विरोध करणे एखाद्या नागरिकाला हद्दपार करण्याचे कारण ठरू शकत नाही आणि तसे केल्यास त्याच्या भाषण स्वातंत्र्याचा आणि सन्मानाने जगण्याच्या मूलभूत अधिकारांवरती गदा येईल अशा शब्दांत न्यायमूर्ती जामदार यांनी मुंबई पोलिसांना आपल्या आदेशामध्ये फटकारले आहे.एचडीपीआय पक्षाचे सईद अहमद अब्दुल चौधरी यांच्या हद्दपारीचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाकडून रद्द करण्यात आला आहे. चौधरी यांच्यावर पाच गुन्हे दाखल असून त्यातील बहुतांश गुन्हे हे आंदोलन केल्याप्रकरणी दाखल करण्यात आले आहेत. यावरून त्यांना हद्दपार करण्याचे आदेश मुंबई पोलिसांनी काढले होते. या कारवाईवर मुंबई पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ आणि २१ नुसार नागरिकांना केवळ आपले मत व्यक्त करण्याचे स्वातंर्त्यच नाही, तर सन्मानाने जगण्याचाही अधिकार आहे असल्याचे स्पष्ट केले.

**पक्ष बदलावा, वॉशिंग मशीन आहेच**

राज्यात सध्या सुरू असलेल्या घोडेबाजारावरून मुंबई उच्च न्यायालयाने कानउघाडणी केली आहे. परवा दहा वर्षीय मुलाचा अपघातात मृत्य झाला आणि राज्याची विधानसभा कशावर चर्चा करत होती तर पीठासन अधिकाऱ्याच्या निवडणुकीवर आणि कशा प्रकारे त्यांनी पक्षांतर केले त्यावर, अशा शब्दात न्यायालयाने कानउघडणी केली. राज्यात सध्या घोडेबाजार सुरू असून गुन्हे दाखल असल्याने हद्दपार करण्यात आलेल्या याचिकाकर्त्यांने देखील पक्ष बदलावा, वॉशिंग मशीन आहेच अशा शब्दात मुंबई उच्च न्यायालयाची मिश्किल टिप्पणी केली.

**भारत सरकार सर्व नागरिकांना गुलाम बनवते-** न्यायालयाने सांगितले की, पोलिस हे मुख्यमंत्री किंवा पंतप्रधानांचे सेवक नसून ते जनतेचे सेवक आहे हे स्पष्ट करताना पोलिस अधिकाऱ्याला दंड ठोठावण्याचे मुंबई उच्च न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आले. आंदोलन करणं हा नागरिकांचा अधिकार असल्याचेही नमूद केले एवढे सगळे पेपर लीक होत आहेत आणि जर लोकांनी आंदोलन केलं तर तुम्ही त्यांच्यावर केसेस टाकणार, हे सगळ काय सुरू आहे? अशा शब्दात मुंबई उच्च न्यायालयाने प्रश्नांची सरबत्ती केली. भारत सरकार सर्व नागरिकांना गुलाम बनवतय, अशा शब्दात मुंबई उच्च न्यायालयाने सुनावले आहे.

## 8 दहशतवाद्यांना अटक

**अहमदाबाद :** गुजरात एटीएसने दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मद (खीट) च्या आठ दहशतवाद्यांना गुजरात आणि मध्य प्रदेशातून




पकडले आहे. एटीएसनुसार, ते गुजरातमध्ये खीट चे एक सक्रिय नेटवर्क तयार करण्याचे काम करत होते जेणेकरून दहशतवादी कारवाया करता येतील. एटीएसने त्यांची चौकशी सुरू केली आहे. एटीएसने या सर्वांविरुद्ध राष्ट्रविरोधी कारवाया आणि दहशतवादी नेटवर्कशी संबंधित असल्याच्या गंभीर आरोपांवर पुढील कायदेशीर तपास आणि सखोल चौकशी केली आहे. अटक करण्यात आलेल्या दहशतवाद्यांमध्ये अहमद अब्दुल्ला गाजीवाला, इब्राहिम मोहम्मद हुसेन घाघा, मुदस्सिर अब्दुल्ला गाजीवाला, जकारिया दुर्रानी, मुफ्ती फौजान, मोहम्मद अमीन शेरा, मोहम्मद अब्दुल रहमान सौदा आणि बिलाल मोहम्मद यांचा समावेश आहे. यापूर्वी आयएसआय संबंधित २ दहशतवादी पकडले, सोशल मीडियाद्वारे भरती करून नेटवर्क (पान २ वर)

## अवैध सावकारीला चाप; पाचऐवजी सात वर्षांची कैद


**मुंबई/प्रतिनिधी :** अवैध सावकारी व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीला ७ वर्षांपर्यंत कैदेची शिक्षा सुनावली जाणार आहे. त्यासाठी महाराष्ट्र सावकारी अधिनियमात सुधारणा करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली. सध्या पाच वर्षे कैदेची तरतूद आहे.खोट्या नावाने सावकारी परवाना मिळविणारी व्यक्ती, ठरवून दिलेल्या क्षेत्राबाहेर सावकारी करणाऱ्या व्यक्तीला



पहिल्या अपराधासाठी एक वर्षापर्यंत कैदेची तरतूद होती. ती आता ३ वर्षांपर्यंत करण्यात आली आहे. तसेच १५ हजार रुपयांऐवजी ५० हजार रुपये दंड आकारला जाईल. दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधासाठी पाच वर्षांपर्यंत कैदेची तरतूद होती, आता ती ७ वर्षांपर्यंत असेल. दंडाची रक्कम ५० हजार वरून १ लाख रुपयांपर्यंत करण्यात येणार आहे. कर्जवसुलीसाठी कर्जदाराचा छळ करणाऱ्या व्यक्तीला २ वर्षांपर्यंत कैदेच्या शिक्षेची तरतूद होती, आता तीन वर्षांपर्यंत कैदेची शिक्षा दिली जाईल. तसेच दंडाची रक्कम पाच हजार रुपयांवरून एक लाख रुपये करण्यात येणार आहे. (पान २ वर)

## 'टीईटी' परीक्षा 'आयबीपीएस'कडे

**मुंबई :** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेचा (टीईटी) पेपर फुटल्याचे पडसाद संपूर्ण राज्यात उमटल्यानंतर ही परीक्षा आता ऑनलाईन पद्धतीने घेण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतला आहे. त्यापार्श्वभूमीवर ही



परीक्षा सुरक्षित, पारदर्शक आणि पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने घेण्यासाठी इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन (आयबीपीएस) या संस्थेमार्फत घेण्यात येणार आहे.महाटीईटी २०२६ ही परीक्षा २८ जून रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेच्या पेपर क्रमांक १ साठी २ लाख ५८ हजार ६१ आणि पेपर क्रमांक २ साठी ३ लाख ४२ हजार ६४ असे एकूण ६ लाख १२५ उमेदवारांनी अर्ज केले होते. राज्यभरात पेपर क्रमांक १ साठी ७०१ आणि पेपर क्रमांक २ साठी १ हजार २८ अशी एकूण १ हजार ७२९ परीक्षा केंद्रे निश्चित (पान २ वर)

## कुंभमेळ्याच्या निधीत 241 कोटींचा घोटाळा

**मुंबई/प्रतिनिधी :** पावसाळी अधिवेशनादरम्यान विधान परिषदेतील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार अनिल परब यांनी आज सार्वजनिक





बांधकाम विभागातील ठेकेदारीतील गैरव्यवहार, मुंबई महानगर पालिकेतील निधी वाटपातील दुजाभाव आणि पुण्याच्या विषारी दारूकांडावर राज्य सरकारला धारेवर धरले आहे.नाशिकमध्ये २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने काढलेल्या टेंडर प्रक्रियेत मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप परब यांनी पुराव्यांसह केला.कुंभमेळ्यासाठी एकट्या नाशिक जिल्ह्यासाठी २२७० कोटी रुपयांची विविध रस्त्यांची टेंडर्स काढण्यात आली आहेत. मात्र, ही टेंडर्स मिळवण्यासाठी मुख्य अभियंता प्रशांत अवटी आणि हर कन्स्ट्रक्शनचे विलास बिरारी यांनी मिळून १६ कंपन्यांची रिंग तयार केली असल्याचा आरोप परब यांनी केला.

**पात्रतेचे नियम धाब्यावर**

२०१८ च्या सरकारी जीआरनुसार, जर एखादा कंत्राटदार एका निविदेत पात्र ठरला, तर त्याला दुसऱ्या निविदेत अपात्र ठरवता येत नाही. मात्र, या अधिकाऱ्यांनी स्वतःच्या मर्जीतील कंत्राटदारांना कामे देण्यासाठी नियम धाब्यावर बसवले. एका निविदेत पात्र ठरलेल्या कंत्राटदाराला दुसऱ्या निविदेत हेतुपुरस्सर अपात्र ठरवण्यात आले, जेणेकरून पूर्वनियोजित कंत्राटदारालाच काम मिळेल असा दावा परब यांनी कागदपत्रांचा दाखला देत केला.

**एसआयटी चौकशीची मागणी**


तुम्ही देवाच्या पैशांवर डल्ला मारत आहात. अजून काम पूर्णही झाले नाही आणि रस्त्यांना तडे गेले आहेत. या संपूर्ण प्रकरणाची एसआयटी चौकशी करून संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांवर फौजदारी गुन्हे दाखल करा अशी थेट मागणी अनिल परब यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांकडे केली.

## रविवारपासून 'राम रक्षा आंदोलन'

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी राम मंदिराच्या देणगी निधीच्या कथित गैरव्यवहाराच्या मुद्यावर भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. अयोध्येतील राम मंदिरासाठी भाविकांनी दिलेल्या देणगीच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित करत त्यांनी राम रक्षा आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली. या आंदोलनाची सुरुवात रविवार, ५ जुलै रोजी सायंकाळी ४ वाजता दादर येथील मारुती मंदिराजवळ होणार असल्याचे त्यांनी सांगितले.



पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, राम मंदिर हा केवळ धार्मिक विषय नसून लाखो हिंदूंच्या श्रद्धेचा प्रश्न आहे. या श्रद्धेशी कुणीही खेळ करू नये. राम मंदिरासाठी जमा झालेल्या निधीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत असताना सत्य जनतेसमोर आले पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. भाजपवर टीका करताना उद्धव ठाकरे म्हणाले, एकेकाळी अटलबिहारी वाजपेयी यांनी अब हिंदू मार नहीं खाएगा असे म्हटले होते. आज मी एवढेच म्हणेन की, अब हिंदू माफ नहीं करेगा. रामाच्या नावाने राजकारण करणाऱ्यांनी आता जनतेला उत्तर द्यावे लागेल. दरम्यान, राम मंदिर निधीबाबतचे आरोप, त्यावरील चौकशी आणि उद्धव ठाकरे यांनी केलेले आरोप यावर संबंधित यंत्रणा किंवा भाजपकडून (पान २ वर)



### रामभक्तांच्या भावना दुखावल्या

**अयोध्या :** अयोध्येतील श्रीराम मंदिरातील देणगी चोरीच्या प्रकरणावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने (आरएसएस) प्रथमच अधिकृत भूमिका मांडली आहे. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रय होसबळे यांनी निवेदन जारी करत या घटनेमुळे देशभरातील रामभक्तांच्या भावना दुखावल्या असल्याचे म्हटले आहे. तसेच या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. दत्तात्रय होसबळे यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, श्रीराम जन्मभूमीवरील भव्य मंदिर हे अनेक पिढ्यांच्यांच्या संघर्ष, त्याग आणि कोट्यवधी रामभक्तांच्या श्रद्धेचे प्रतीक आहे. त्यामुळे मंदिरातील देणगीपेटीतील पैशांच्या कथित चोरीची घटना अत्यंत दुर्दैवी असून, यामुळे संपूर्ण हिंदू समाजाच्या श्रद्धेला धक्का बसला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत उत्तर प्रदेश सरकारने विशेष (पान २ वर)

## सहजिल्हा निबंधकांच्या घरातून तब्बल २.९४ कोटींचा मुद्देमाल जप्त

- अकोला एसीबीची धडक कारवाई
- सीलबंद घराचे कुलूप तोडून प्रवेश
- पुरावे नष्ट करण्याच्या संशयाने स्वतंत्र गुन्हा, तपासाला नवे वळण

**अकोला :** अकोला येथे दाखल असलेल्या लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये नोंद गुन्ह्याच्या तपासात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) मोठी आणि धक्कादायक कारवाई करत सहजिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी (वर्ग-१) किरण पुरुषोत्तम चौधरी यांच्या जळगाव येथील विष्णुनगरस्थित निवासस्थानावर झडती घेतली. या कारवाईत तब्बल २ कोटी ९४ लाख ६४ हजार ८४७ रुपयांचा मुद्देमाल आढळून आला असून, त्यामध्ये कोट्यवधींची रोख रक्कम, सोन्या-चांदीचे दागिने, मालमत्तेची कागदपत्रे आणि अन्य मौल्यवान साहित्याचा समावेश आहे. हा संपूर्ण मुद्देमाल एसीबीने जप्त केला असून, या कारवाईमुळे प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

या प्रकरणात अकोला शहरातील सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २३८/२०२६ अंतर्गत भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ मधील कलम ७ व १२ अन्वये गुन्हा दाखल आहे. त्याच गुन्ह्याच्या तपासाचा भाग म्हणून ही झडती घेण्यात आली. त्यामुळे तपास आता केवळ कथित लाच-खोरीपुरता मर्यादित न राहता आर्थिक व्यवहार, मालमत्ता आणि संपत्तीच्या स्रोतांच्या तपासाकडे वळल्याचे संकेत मिळत आहेत.

तपासादरम्यान समोर आलेली आणखी एक बाब अधिक गंभीर मानली जात आहे. एसीबीच्या जळगाव पथकाने २५ जून २०२६ रोजी संबंधित निवासस्थानी झडतीसाठी भेट दिली असता घर बंद असल्याने पंचांसमक्ष ते सीलबंद करण्यात आले होते. मात्र त्यानंतर २७ जून रोजी आरोपीच्या काही नातेवाईकांनी सीलबंद घराच्या मागील गॅलरीचे तसेच मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केल्याची घटना उघड झाली. पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने हा प्रकार घडल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, या संदर्भात जळगाव येथील जिल्हापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २०७/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता (बीएनएस)-२०२३ मधील संबंधित कलमान्वये स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे मूळ भ्रष्टाचार प्रकरणाबरोबरच पुराव्यांशी छेडछाड झाल्याच्या शक्यतेचाही तपास सुरू झाला आहे.

त्यानंतर २ जुलै २०२६ रोजी आरोपीची पत्नी मनीषा किरण चौधरी, त्यांच्या नातेवाईक, दोन शासकीय पंच, अधिकृत गोल्ड व्हॅल्यूअर आणि बँक कॅशियर यांच्या उपस्थितीत घराची सविस्तर झडती घेण्यात आली. या झडतीत १ कोटी ५३ लाख ८४ हजार ६३० रुपयांची रोख रक्कम, ४२२.१०० ग्रॅम वजनाचे ६० लाख ५७ हजार १३५ रुपयांचे सोन्याचे दागिने, त्यामध्ये १६० ग्रॅम वजनाची दोन सोन्याची बिस्किटे, ११ लाख ५२ हजार ७४५ रुपयांच्या सोन्याच्या खरेदीच्या पावत्या, १५४.१०० ग्रॅम वजनाचे ३१ हजार ४१६ रुपयांचे चांदीचे दागिने, ६२ लाख १३ हजार ३७६ रुपयांच्या विविध मालमत्तांची कागदपत्रे, तसेच ६ लाख २५ हजार ५४५ रुपयांच्या घरगुती मौल्यवान वस्तू आढळून आल्या. एसीबीने सापडलेली रोख रक्कम, सोन्याचे दागिने आणि इतर मौल्यवान साहित्य पंचनाम्याद्वारे जप्त केले असून, या मालमत्तेचे स्वरूप, तिचे आर्थिक स्रोत, उत्पन्नाशी असलेले संबंध आणि संबंधित व्यवहारांची कागदपत्रे यांची तपासणी सुरू आहे. आवश्यकतेनुसार आर्थिक नोंदी, बँक व्यवहार, मालमत्ता खरेदी-विक्रीचे दस्तऐवज आणि अन्य पुरावेही तपासले जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

दरम्यान, या प्रकरणातील जप्त मुद्देमाल अथवा मालमत्तेबाबत अंतिम निष्कर्ष अद्याप निघालेला नसून, संबंधित व्यक्तींविरुद्धचे आरोप न्यायालयीन प्रक्रियेत सिद्ध होणे बाकी आहे. त्यामुळे या कारवाईकडे तपासाचा महत्त्वाचा टप्पा म्हणून पाहिले जात असून, पुढील तपासात आणखी महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता तपास यंत्रणांकडून व्यक्त केली जात आहे.

## श्रीराम मंदिर चंदा घोटाळा

### एसआयटी घेणार चार्टर्ड अकाउंटंटची मदत; ५ वर्षांच्या आर्थिक व्यवहारांची होणार झाडाझडती

**अयोध्या /वृत्तसंस्था :** अयोध्या येथील भव्य श्रीराम मंदिरातील चंदा आणि चढावा चोरी प्रकरणाच्या चौकशीला आता अत्यंत वेग आला आहे. या संपूर्ण प्रकरणाची पाळेमुळे खणून काढण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाने (SIT) आता तपासात चार्टर्ड अकाउंटंट (CA) म्हणजेच सनदी लेखापालांची मदत घेण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. हा तपास ज्या वळणावर येउन पोहोचला आहे, तिथे राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे माजी सरचिटणीस चंपत राय आणि विश्वस्त डा. अनिल मिश्रा यांच्या भूमिकेबाबतचा सस्पेन्स आणखी वाढला आहे. या प्रकरणाच्या सखोल तपासासाठी एसआयटीने आता थेट श्रीराम मंदिर ट्रस्टचे ऑडिट रेकार्ड्स, बँक खात्यांचे दस्तावेज आणि गेल्या पाच वर्षांतील सर्व आर्थिक व्यवहारांची कसून तपासणी सुरू केली आहे. मंदिरातील दान गोळा करण्याची नेमकी प्रक्रिया काय आहे, तसेच सुरक्षिततेसाठी लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही फुटेजचाही सखोल अभ्यास केला जात आहे. आर्थिक गैरव्यवहार नेमका कसा आणि कोणत्या स्तरावर झाला, हे तांत्रिकदृष्ट्या सिद्ध करण्यासाठीच आता सीएची मदत घेतली जात आहे. या तपासादरम्यान एसआयटीने चंपत राय, डा. अनिल मिश्रा आणि गोपाळ राव यांची स्वतंत्रपणे आणि सविस्तर चौकशी केली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या चौकशीदरम्यान चंपत राय आणि अनिल मिश्रा यांनी या चोरीच्या प्रकरणाशी आपला कोणताही थेट संबंध नसल्याचे सांगत या संपूर्ण घोटाळ्यात (पान २ वर)



### चंपत राय, अनिल मिश्रा यांना कधीही अटक होण्याची शक्यता

नवी दिल्ली: अयोध्येतील भव्य राम मंदिर देणगी अपहार प्रकरणात दररोज नवनवे धक्कादायक खुलासे समोर येत असून, या प्रकरणामुळे देशभरात तीव्र संताप आणि नाराजी व्यक्त केली जात आहे. या प्रकरणाच्या चौकशीची व्याप्ती वाढली असून, श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे माजी सरचिटणीस चंपत राय, अनिल मिश्रा आणि गोपाल राव यांना या प्रकरणात कधीही अटक केली जाउ शकते, असे कयास आता वर्तवले जात आहेत.राम मंदिरातील नैवेद्य आणि देणगी चोरी प्रकरणाचा तपास करण्यासाठी स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाने (SIT) अयोध्येत सुमारे आठ तास प्रदीर्घ चौकशी व तपास केला. या दरम्यान ट्रस्टच्या अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांची कसून चौकशी (पान २ वर)



e paper www.janmadhyam.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# खा.बळवंत वानखडे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद



## विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**अमरावती/ प्रतिनिधी:-** अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त दर्यापूर येथील जनसंपर्क कार्यालय व कृषी भवन येथे आयोजित कार्यक्रमाला मतदार, नागरिक, हितचिंतक, मित्रपरिवार तसेच काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. जिल्ह्याच्या विविध भागांतून आलेल्या हजारो नागरिकांनी शुभेच्छा देत खासदार वानखडे यांच्यावरील विश्वास आणि प्रेम व्यक्त केले. खासदार बळवंत वानखडे यांनी सर्वांच्या शुभेच्छा मनःपूर्वक स्वीकारून उपस्थितांचे आभार मानले.

अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व सायकलींचे वाटप, तसेच गुळतुला यांसारखे उपक्रम राबविण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत समाजोपयोगी कार्यातून वाढदिवस साजरा करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

कार्यक्रमास श्रीरंग पाटील अरबट, दिनकरराव गायगोले, बाळासाहेब टोळे, सुनील गावंडे (सभापती, कृ.उ.बा.स. दर्यापूर), आतिष शिरभाते, पप्पू होले (शहराध्यक्ष, काँग्रेस कमिटी दर्यापूर), प्रदीपबापू देशमुख (माजी सभापती, पंचायत समिती दर्यापूर), संजय बेलोकार (महासचिव, काँग्रेस कमिटी अमरावती), रामेश्वर मालपानी (नगरसेवक, नगर परिषद दर्यापूर), गजानन देवतळे (माजी सभापती, पंचायत समिती दर्यापूर), राजेंद्र वडाळ (संचालक, कृ.उ.बा.स. दर्यापूर), भारत आठवले (संचालक, कृ.उ.बा.स. दर्यापूर), डॉ. अविनाश ठाकरे, राजेंद्र नागपूरे, सैय्यद राजीक, पोलेंद्र ढोके, दादाराव इंगळे, दिलीप गवई, इंजि. नितेश वानखडे (महासचिव, युवक काँग्रेस महाराष्ट्र), सागर देशमुख (तालुका अध्यक्ष, युवक काँग्रेस दर्यापूर) यांच्यासह नगरसेवक, तालुका व युवक काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक आणि खासदार बळवंत वानखडे मित्रपरिवाराचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पान १ व १० वरून

## रविवारपासून 'राम रक्षा आंदोलन'

अधिकृत प्रतिक्रिया येणे बाकी आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

**भाजपवर गंभीर आरोप-** राम मंदिरासाठी जमा झालेल्या पैशांचा गैरवापर होत असल्याचा आरोप करत उद्धव ठाकरे यांनी भाजपवर निशाणा साधला. राम मंदिराच्या नावावर लोकांनी श्रद्धेने देणग्या दिल्या. मात्र आता या निधीबाबत संशय निर्माण झाला आहे. काही माध्यमांमध्ये आलेल्या वृत्तांनुसार या पैशांचा वापर राजकीय हेतूंसाठी, पक्ष फोडण्यासाठी किंवा सत्तेचे राजकारण करण्यासाठी होत असल्याच्या चर्चा आहेत. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी व्हायला हवी असे ते म्हणाले.

**राम मंदिर आंदोलनाची आठवण-** राम मंदिर आंदोलनात शिवसैनिकांनीही मोठा सहभाग घेतल्याची आठवण करू न देताना ठाकरे म्हणाले की, त्या काळात अनेक हिंदूंनी संघर्ष केला होता. त्या भावनांचा वापर करू न भाजपने राजकीय फायदा घेतला आणि आज त्याच राम मंदिराच्या नावावर प्रश्न निर्माण झाले आहेत, असा आरोप त्यांनी केला.

**सत्य बाहेर आणणार-** राम मंदिर निधीबाबत सत्य बाहेर यावे आणि जबाबदारांवर कारवाई व्हावी, या मागणीसाठी राज्यभरातील रामभक्तांनी रविवारी दादरमधील मारु ती मंदिराजवळ एकत्र यावे, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी केले. या आंदोलनाला राम रक्षा आंदोलन असे नाव देण्यात आले असून, रामभक्तांच्या श्रद्धेचे संरक्षण करण्यासाठी हा लढा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## रामभक्तांच्या भावना दुखावल्या

तपास पथक (एसआयटी) स्थापन केले आहे. तपासात जे कोणी दोषी आढळतील, त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे, असेही होसबळे यांनी स्पष्ट केले. संघाने आपल्या निवेदनात मंदिर व्यवस्थापनालाही काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. मंदिराच्या आर्थिक व्यवहारात पूर्ण पारदर्शकता असावी, व्यवस्थापनातील त्रु टी तातडीने दूर कराव्यात आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडणार नाहीत, याची खात्री करावी, अशी अपेक्षा संघाने व्यक्त केली आहे.सध्या या प्रकरणामुळे भाविकांमध्ये अनेक प्रश्न आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे मंदिर प्रशासन आणि विशेष तपास पथकाने संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करू न सत्य लवकरात लवकर जनतेसमोर आणावे, असेही संघाने म्हटले आहे. दरम्यान, राम मंदिरातील देणगीपेटीतील पैशांच्या कथित अपहारप्रकरणी आतापर्यंत आठ जणांना अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्यांमध्ये श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे महासचिव चंपत राय यांचे चालक टिन्नू यादव तसेच मंदिरातील देणगी मोजण्याच्या प्रक्रियेशी संबंधित काही कर्मचा-यांचाही समावेश असल्याची माहिती समोर आली आहे.

## श्रीराम मंदिर चंदा घोटाळा

आपली कोणतीही भूमिका नसल्याचा स्पष्ट इन्कार केला आहे. त्यांनी चौकशीत स्वतःला निर्दोष सांगितले असले, तरी त्यांच्या या दाव्यांमुळे आणि इन्कारामुळे तपास यंत्रणांसमोर या प्रकरणाचा सस्पेन्स आणखी वाढला असून, गुंतागुंत अधिक वाढली आहे.

यापूर्वी या घोटाळ्याची प्राथमिक अहवाल समोर आल्यानंतर चंपत राय आणि अनिल मिश्रा यांनी नैतिकतेच्या आधारावर आपापल्या पदांचे राजीनामे दिले आहेत. मात्र, ट्रस्टच्या नियमांनुसार आणि बायलाजनुसार, त्यांचे राजीनामे अद्याप अधिकृतपणे मंजूर झालेले नाहीत. राजीनामा स्वीकारण्यासाठी ट्रस्टच्या दोन-तिहाई सदस्यांचा होकार आणि बहुमत असणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर आगामी ६ जुलै रोजी अयोध्या येथे श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टची एक अत्यंत महत्त्वाची बैठक होणार असून, या बैठकीत त्यांच्या राजीनाम्यावर अंतिम निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या प्रकरणाची दखल घेत निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशीचे आदेश दिले होते. त्यानुसार एसआयटीने आत्तापर्यंत या प्रकरणात तब्बल आठ जणांना अटक केली असून, त्यांच्याकडून लाखो रु पयांची रोकड हस्तगत करण्यात आली आहे. रोख रक्कम मोजताना आणि बँकेत जमा करताना झालेल्या या घोटाळ्यात मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. आता सीएच्या प्रवेशामुळे ट्रस्टच्या अंतर्गत खात्यांचे पुनरपरीक्षण केले जाणार असून, येत्या काही दिवसांत या प्रकरणातील मोठे सत्य समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## चंपत राय, अनिल मिश्रा

करण्यात आली. या तपासात मंदिरातील देखभाल कामगार म्हणून संशयितांना प्रवेश पास देणारा मुख्य आरोपी अनुकल्प मिश्रा याच्याबाबत मोठा खुलासा समोर आला आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि बजरंग दलाचे संस्थापक विनय कटियार यांनी या प्रकरणावर गंभीर भाष्य करताना, देणगीच्या पैशांचा अपहार झाला असल्याचे स्पष्ट आहे, असे म्हटले आहे. तसेच आपण या संवेदनशील विषयावर थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी सविस्तर चर्चा केल्याचे सांगत चंपत राय, गोपाल राव आणि अनिल मिश्रा यांना आगामी काळात अटक होउ शकते, असा खळबळजनक दावा त्यांनी केला आहे.

दुसरीकडे, या प्रकरणातील आणखी एक आरोपी राम शंकर यादव उर्फ टिन्नू यादव याचा भाउ दिनेश यादव याने पहिल्यांदाच प्रसारमाध्यमांसमोर येत गंभीर आरोप केले आहेत. चंपत राय आणि अनिल मिश्रा यांनी स्वत?चा बचाव करण्यासाठी आपल्या भावाला या प्रकरणात खोट्या आरोपाखाली अडकवले असून टिन्नू यादव पूर्णपणे निर्दोष असल्याचा दावा दिनेशने केला आहे.

दरम्यान, या संपूर्ण वादामुळे आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे लागलेल्या कलंकामुळे चंपत राय कमालीचे अस्वस्थ असून त्यांनी आपल्या निकटवर्तीयांकडे तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. अयोध्येतील माझी सेवा आता पूर्ण झाली असून यापुढे तिथे काम करण्याची माझी अजिबात इच्छा नाही, असे सांगत चंपत राय सध्या एकांतात गेले आहेत. आपला मोठा वि□ासघात झाल्याची भावनाही त्यांनी बोलून दाखवली आहे. या पार्श्वभूमीवर, आपल्या पदांचे राजीनामे दिलेले चंपत राय आणि ट्रस्टचे सदस्य अनिल मिश्रा यांच्या भवितव्याबाबतचा अंतिम निर्णय ६ जुलै रोजी होणा-या श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टच्या अत्यंत महत्त्वाच्या बैठकीत दोन-तृतीयांश बहुमताने घेतला जाण्याची दाट शक्यता आहे.

## 8 दहशतवाद्यांना अटक

तयार करत होते.

**गजवा-ए-हिंदचा कट-** गुजरात एटीएसने देशविरोधी कट रचणा-या दोन आरोपींना अटक केली आहे. एटीएसनुसार, हे आरोपी सोशल मीडियाच्या माध्यमातून कट्टरपंथी विचारसरणीने प्रभावित होउन देशात गजवा-ए-हिंदस्थापन करण्याचा कट रचत होते. एएनआयच्या माहितीनुसार, दोन्ही आरोपींना ११ दिवसांच्या पोलीस कोठडीत पाठवण्यात आले आहे.

**४ अलकायदा दहशतवादी अटक-** गुजरात एटीएसने सांगितले की, त्यांनी अल-कायदाशी संबंधित ४ दहशतवाद्यांना अटक केली आहे. दोन दहशतवादी गुजरातमधून, एक दिल्लीतून आणि एक नोएडातून पकडले गेले आहेत. हे चौघे बनावट नोटांच्या रॅकेटमध्ये आणि दहशतवादी संघटनेत लोकांना जोडण्याचे काम करत होते. हे अशा अ?प्सचा वापर करत होते ज्यात मजकूर आपोआप डिलीट होतो.

## अवैध सावकारीला चाप;

**नाममात्र सभासदांनाही कर्ज-** भागधारक सभासदांबरोबरच नाममात्र सभासदांनाही सोने तारण कर्ज मिळावे यासाठी अधिनियमात दुरु स्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे नाममात्र सभासदांना हे कर्ज मिळविता येईल.

**१० लाख शेतक-यांना दिलासा-** किमान १० गुंठे शेतजमीन असलेल्या शेतक-याला प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थेचे सभासदत्व द्यावेच लागणार आहे. संस्था असे सभासदत्व नाकारू शकणार नाही. प्राथमिक कृषी पतसंस्थेचे सभासद नसलेले सुमारे १० लाख खातेदार शेतकरी आहेत. त्यांना या संस्थांचे सभासदत्व मिळेल.

## 'टीईटी' परीक्षा 'आयबीपीएस'

केली होती. मात्र २८ जूनच्या आदल्यादिवशीच म्हणजे २७ जून रोजी भिवंडीमध्ये पेपर फुटल्याचे उघडकीस आले. त्यामुळे परिषदेने तातडीने ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय जाहीर केला. त्यानंतर ही परीक्षा नव्याने व ऑनलाईन पद्धतीने घेण्याचा निर्णय परिषदेने घेतला. ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेण्यासाठी परिषदेने आयबीपीएसची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य परीक्षा परिषदेने पत्रात नमूद केले आहे की, सर्वोच्च न्यायालयाने १ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार सेवेत असलेल्या तसेच नव्याने सेवेत येणा-या शिक्षकांसाठी टीईटी उत्तीर्ण होणे बंधनकारक केले आहे. त्यासाठी २०२८ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने शिक्षकांना टीईटी परीक्षा द्यावी लागणार असून भविष्यात ही परीक्षा वर्षातून किमान दोनदा घेण्याचेही प्रस्तावित करण्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर टीईटी लवकर, सुरक्षित आणि पारदर्शक पद्धतीने आयोजित करण्याबाबत राज्य परीक्षा परिषदेने आयबीपीएसच्या व्यवस्थापकांना पत्राद्वारे विनंती केली आहे.

## महिलांसाठी सुरक्षित वातावरण

यंत्रणांची सामूहिक जबाबदारी आहे, असेही त्या म्हणाल्या.

संकटकाळात सापडलेल्या किंवा पीडित महिलांना एकाच छताखाली वैद्यकीय, कायदेशीर आणि मानसिक मदत देणाऱ्या 'वन स्टॉप सेंटर' या योजनेबाबत जनजागृती करण्यात यावी, तसेच तेथील सेवांची वेळोवेळी तपासणी करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. याशिवाय, ग्रामीण भागातील महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात यासाठी महिला बचत गटांनी निर्माण केलेल्या वस्तूंना बाजारात योग्य स्थान मिळावे आणि या वस्तू आपल्या जिल्ह्याची एक स्वतंत्र ओळख 'ब्रॅन्ड ' म्हणून पुढे याव्यात, यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन रहाटकर यांनी यावेळी केले.

## ५८ तक्रारींवर राष्ट्रीय महिला

रहाटकर यांनी पोलिसांना तात्काळ गुन्हा नोंदविण्याचे निर्देश दिले. तसेच त्यांची प्रत सादर करण्यास सांगितले. तडजोडीच्या प्रकरणात काहींनी एकत्र राहण्याचे मान्य केले.

जनसुनावणीत आली प्रकरणे ऐकून त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच या प्रकरणांचा मागोवा घेतला जाणार आहे. यातून पिडीतांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला जाईल. गुन्हा नोंदविल्यानंतर चार्जशिट दाखल करण्यापर्यंत प्रकरणांचा पाठपुरावा केला जाणार आहे. आयोगाच्या अखत्यारीत येऊ शकणार नाही, अशा प्रकरणी महिलांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. त्यांच्या तक्रारी योग्य प्राधिकरणाकडे पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. महिला आयोगाच्या राज्यातील विविध भागात जनसुनावण्यामुळे महिलांसाठी असलेल्या यंत्रणांबाबत जनजागृती वाढण्यास मदत होत असल्याचे राहटकर यांनी सांगितले.

## चिखलदऱ्यात पावसाळी पर्यटनासाठी

प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली आहे. हे रायडर्स सतत गस्त घालत वाहतूक नियंत्रण, पर्यटकांना मार्गदर्शन आणि आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदत करतील. मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी विविध ठिकाणी 'ड्रंक अँड ड्राइव्ह' तपासणी नाके उभारण्यात आले आहेत. वाहनचालकांची नियमित तपासणी केली जाणार असून मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविताना आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच वेगमर्यादेचे उल्लंघन, धोकादायक वाहनचालक, ट्रिपल सीट प्रवास, हेल्मेट व सीटबेल्टचा वापर न करणाऱ्यांवरही कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. गर्दीच्या ठिकाणी चोरी, पाकिटमारी, महिलांशी गैरवर्तन, बेकायदेशीर धंदे तसेच पर्यटकांची फसवणूक रोखण्यासाठी विशेष पथके, दामिनी पथके आणि साध्या वेशातील पोलिसांची नियुक्ती करण्यात आली आहे. पर्यटकांशी नम्र, संवेदनशील आणि मदतशील वर्तन करण्याच्या सूचनाही सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, अमरावती ग्रामीण पोलिसांनी पर्यटकांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे तसेच मद्यप्राशन करून वाहन चालविणे टाळण्याचे आवाहन केले आहे.

## एकतर्फी प्रेमातून तरुणीवर

कानावर, डोक्यावर, पायावर ,पाठीवर ,सपासप वार करण्यात आले.या मध्ये ती गंभीर जखमी झाली. संपूर्ण घटनाक्रम परिसरातील सीसीटीव्ही मध्ये कैद झाला आहे. पोलीस आरोपीचा शोध घेत आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. आरोपी विरुद्ध कलम १०९(१),७८ व १२६(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करत आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तरुणीची प्रकृती गंभीर आहे.

## घर भाड्यावरून झालेल्या

पोलिसांना दिलेल्या तक्रारीतून केली आहे. यावेळी किसन मंजुळकर, राजू शेळके, भगवान दांडेकर, राधेश्याम पवार, बंडू चौधरी, हिरामण शेळके, मनोज दांडेकर, अमोल शेळके, राजदीप पवार, रामू राऊत, योगेश देवकर, भीमराव आलुडे, अक्षय तुपेकर, अतुल चाफळकर सह इतर उपस्थित होते.

## शिराळ्यात तलवार

येथे दाखल झाले. वार्ड क्रमांक ६ मधील संशयिताच्या घराची झडती घेतली असता तेथून एक मोठी लोखंडी तलवार आणि धारदार लोखंडी कोयता आढळून आला. पोलिसांनी दोन्ही शस्त्रे जप्त करून संबंधित युवकाला ताब्यात घेतले. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव रोहित शिवदास राठोड (वय २२, रा. वार्ड क्र. ६, शिराळा, ता. जि. अमरावती) असे आहे. पुढील कायदेशीर कारवाईसाठी आरोपी व जप्त मुद्देमाल वलगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त राकेश ओला, पोलिस उपायुक्त यशवंत सोळंके, पोलिस उपायुक्त (मुख्यालय) प्रांजली सोनवणे, सहाय्यक पोलिस आयुक्त कैलास पुंडकर व निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

## सराईत फरार आरोपी

आणण्यात आले. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक उमेश मुंडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे तसेच मनीष करपे, पवन तिवारी, पंकज खटे, रवी लिखितकर, शशिकांत शेळके, अंकुश काळे, प्रशांत बेलोकर, आकाश यादव, रफीक खान, मंगेश कपिले, नरेश बावणे, अमोल देशमुख, अमोल खंडेझोड, अर्जुन कदम आणि यश ओगले यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी

शाळेचे स्थलांतर केल्याचा आरोपही करण्यात आला असून, या संदर्भात जिल्हाधिकारी, आदिवासी अपर आयुक्त व संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार निवेदने देऊनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे पालकांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर आज आदिवासी आंदोलन कृती समितीचे अध्यक्ष अर्जुन युवनाते यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी, अमरावती तसेच आदिवासी अपर आयुक्त, अमरावती यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनाद्वारे शासकीय माध्यमिक आदिवासी आश्रमशाळा, गुल्लरघाट ही पूर्वीप्रमाणे दर्यापूर येथे तात्काळ सुरू करण्यात यावी, संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी आंदोलन कृती समितीचे अध्यक्ष अर्जुन युवनाते, विष्णु राऊत, प्रशांत खंडागळे, बबलू मारकवार, बबलू गवते, स्वप्नील नरकास, सुनील बारस्कर, प्रकाश डाखोरे, रामकिसन गवते, विजय बारस्कर, नितीन बारस्कर, अर्चना भाटे, मुकुंद बेलसरे, अजब भारस्कर, बबीराम गावरकर

व शंकर कागले यांच्यासह पालक, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

निवेदनातील मागण्यांवर तात्काळ सकारात्मक निर्णय न झाल्यास येत्या सात दिवसांत पालक, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ व सामाजिक संघटनांच्या वतीने तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल. आंदोलनादरम्यान उद्भवणाऱ्या परिस्थितीची तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानाची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्रशासनाची राहील, असा इशारा यावेळी देण्यात आला.

## एसआयआर प्रक्रियेसाठी काँग्रेसची

विशेष भर देण्यात आला. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर प्रत्येक विधानसभा क्षेत्रात मदत केंद्र (हेल्प डेस्क) सुरू करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. या मदत केंद्राच्या माध्यमातून चुकीने वगळलेल्या मतदारांना नमुना क्रमांक ६ भरण्यास मदत, बोगस मतदारांविरोधात नमुना क्रमांक ७ दाखल करणे, नोटिशींना आवश्यक कागदपत्रांसह उत्तर देणे तसेच आवश्यकतेनुसार जिल्हा व मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे अपील दाखल करण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे.

यावेळी जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख म्हणाले, 'मतदारांच्या हक्कांचे संरक्षण करणे ही काँग्रेसची प्राथमिक जबाबदारी आहे. SIR प्रक्रिया पारदर्शक व निष्पक्ष राहण्यासाठी प्रत्येक पदाधिकाऱ्याने बूथ स्तरापर्यंत सक्रिय राहून काम करणे आवश्यक आहे. तसेच मतदार याद्यांमध्ये जर कोणत्याही प्रकारची गडबड करण्याचा प्रयत्न झाला, तर संबंधितांना कायद्याच्या कचाट्यात अडकवले जाईल. मतदार याद्या पारदर्शक आणि अचूक तयार व्हाव्यात यासाठी काँग्रेस विशेष लक्ष देऊन त्या तयार करून घेणार आहे.एकूणच, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने एसआयआर प्रक्रियेसाठी संघटनात्मक पातळीवर सज्जता दाखवली असून, मतदार याद्यांच्या अचूकतेसाठी व्यापक नियोजन हाती घेतले आहे.बैठकीस माजी मंत्री यशोमती ठाकूर, हरिभाऊ मोहोळ, रामेश्वर अभ्यंकर, कांचनमाला गावंडे, प्रवीण मनोहर, सुनील गावंडे, वैभव वानखडे, नितेश वानखडे, प्रमोद दाळु, हरेराम मालवीय, नामदेव तनपुरे, सहदेव बेलकर, शैलेश मालवीय, किशोर देशमुख, श्रीकांत बोंडे, श्रीकांत झोडपे, राहुल गवई, अमोल धवसे, समीर दहातोंडे, प्रदीप देशमुख, अमोल होले, राजा खान, श्रीनिवास सूर्यवंशी, मनीष कुबडे, राहुल बोडखे, श्याम बेलसरे, विपुल भडांगे, भूषण कोकाटे, श्रीकांत होले, निखिल काटोलकर, राहुल गाठे, रमेश सावळे, गजानन देशमुख, विशाल खानजोडे आदींसह शहर व तालुका स्तरावरील अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## अचलपूर नगर परिषदेच्या

शासकीय अभिलेख तसेच इतर दस्तऐवजांची तपासणी केल्यानंतर संबंधित नगरसेविकेला कायद्यातील तरतुदीनुसार दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्याचे सिद्ध झाल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी आदेशात नमूद केले आहे. सुनावणीदरम्यान नगरसेविकेच्या बाजूने विविध आक्षेप व स्पष्टीकरणे सादर करण्यात आली होती. मात्र उपलब्ध अधिकृत नोंदी व पुराव्यांच्या आधारे त्यांचे स्पष्टीकरण ग्राह्य धरता येत नसल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले.खुर्शिदा बानो अताउल्ला शहा यांना महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १६ (१) (क) अंतर्गत अपात्र घोषित करण्यात आले असून, आदेशाच्या दिनांकापासून त्यांचे अचलपूर नगरपरिषदेचे सदस्यत्व रिक्त झाल्याचे घोषित करण्यात आले आहे. याबाबत उपाध्यक्ष खुर्शिदा बानो यांनी प्रतिक्रिया देतांना म्हटले की जिल्हाधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयावर वरच्या न्यायालयात अपील करत न्याय मागणार आहे.

## देवडी व चावलमंडीमधील मुख्य

आणि सिमेंट काँक्रीटीकरण चे काम पूर्ण झालेले नाही . मात्र या दोन्ही रस्त्याची दुरावस्था झाली असून जागोजागी खड्डे पडल्याने नागरिकांमध्ये तिर्व रोष व्यक्त व्यक्त होत आहे.यामुळे या रस्त्याचे तत्काळ सिमेंट काँक्रीटीकरण चे काम सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.त्यापूर्वी या दोन्ही रस्त्यावरील खड्डे नगर परिषद प्रशासनाने तत्काळ दुरुस्त करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

देवडी या मुख्य रस्त्याचे रुंदीकरण आणि सिमेंट काँक्रीटीकरण चे बांधकाम पूर्ण करण्यासाठी जमीन भूसंपादन साठी लवकरच मोजणी होणार आहे .या रस्त्यावर असलेली वाहतूक कोंडी कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी या रस्त्याचा कायापालट करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न सुरू आहे . पावसाळ्यात या रस्त्यावरील खड्डे बुजवण्याची सूचना सबंधित अधिकाऱ्यांना दिली आहे.

**-अभय माथने,** स्वीकृत नगरसेवक ,अचलपूर नगर परिषद.

अचलपूर नगर परिषद कार्यालयाला पावसाळा सुरू होण्यापूर्वी देवडी रस्त्यावरील असलेल्या खड्ड्यांची सुधारणा संदर्भात अर्ज दिले आहे .लवकरच या रस्त्यावरील खड्डे तात्पुरत्या स्वरूपात बुजविले जाणार आहे. नागरिकांना भविष्यात सुविधा उपलब्ध व्हाव्या यासाठी या रस्त्याचे रुंदीकरण आणि सिमेंट काँक्रीटीकरण चे काम सुरू करण्यासाठी आमचा पाठपुरावा सुरू आहे .

**-राजू उर्फ नील माहेश्वरी,** स्वीकृत नगरसेवक,अचलपूर नगर परिषद.

## गुरुकुंज उपसा सिंचन योजना

कळविले आहे. अत्यंत सुरुवातीच्या काळापासून या वंचित १२ गावातील शेतकऱ्यांना सिंचनाचे पाणी मिळावे यासाठी आमदार राजेश वानखडे शासन स्तरावर सातत्याने प्रयत्न करत आहेत. या बारा गावांना वैनगंगा नळगंगा प्रकल्पांतर्गत मार्डी तलावावरून सिंचन सुविधा देण्याचे प्रस्तावित होते.परंतु इतका मोठा अजस्त्र प्रकल्प त्याला पूर्ण होण्यासाठी लागणारा मोठा कालावधी पाहता या अनुषंगाने या बारा गावांना अप्पर वर्धा धरणाच्या उजव्या कालव्यावरूनच वाढीव उपसा सिंचन योजनेद्वारे लवकरात लवकर सिंचनाच्या लाभ देण्याबाबत आमदार राजेश वानखडे आग्रही होते. त्यांचे मागणीला यश आलेले आहे. भविष्यात ही योजना पूर्णत्वास जाऊन पहिल्या टप्प्यात वंचित राहिलेले या १२ गावातील अंदाजे चार हजार हेक्टर च्या वर जमीन शाश्वत सिंचना खाली येणार आहे आहे.

तिवसा विधानसभा मतदार संघातील गुरुकुंज उपसा सिंचन योजने मधून तिवसा तालुक्यातील सिंचनापासून वंचित वऱ्हा, जावरा, विष्णोरा, मालधुर सालोरा, धोत्रा, माळेगाव, शेंदोळां, शिरजगाव यासह परिसरातील एकूण १२ गावांना अप्पर वर्धा धरणाच्या कालव्यावर उपसा सिंचन योजना प्रस्तावित करून सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनस्तरावर आमदार राजेश वानखडे सातत्याने मागणी करीत होते

शेतकऱ्यांच्या शाश्वत सिंचन सुविधा येणाऱ्या काळात उपलब्ध करून देऊ असा सार्थ विश्वास आमदार राजेश वानखडे यांनी व्यक्त केला आहे. त्याचप्रमाणे संपूर्ण तिवसा विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांचे वतीने सिंचनाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वपूर्ण योजनेला मान्यता दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

## पहिल्याच पावसात महामार्गाला

कामाच्या गुणवत्तेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गेल्या तीन वर्षांपासून या मार्गावर खड्डे पडण्याचे सत्र सुरूच आहे.

टाकरखेडा बस स्टॉपजवळ गावकऱ्यांनी रस्त्यावर शेणखत टाकून अर्धा रस्ता बंद केला आहे. शिवाय रस्त्यावर काटेरी झुडपे वाढल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, या महामार्गावर सार्वजनिक बांधकाम विभागाचा एकही अधिकारी फिरकून पाहत नाही. अंजनगाव सुर्जी सार्वजनिक उपविभागीय बांधकाम विभागात अधिकारीवर्ग गेल्या ५ वर्षांपासून कार्यरत आहे. शासकीय नियमानुसार ३ वर्षांनंतर अधिकाऱ्याची बदली होणे अपेक्षित असते. मात्र ५ वर्षे उलटूनही बदली न झाल्याने अधिकाऱ्यांवर कोणाचाही वचक राहिलेला नाही. त्यामुळे मनमानी पद्धतीने कामकाज सुरू असल्याचा आरोप वाहनचालक व नागरिक करत आहेत.या महामार्गासाठी शासनाने कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला. मात्र PWD च्या दुर्लक्षामुळे आणि अधिकाऱ्यांच्या मनमानीमुळे तो सर्व पैसा पाण्यात जात आहे. जनतेच्या पैशाची अशी उधळपट्टी होत असताना संबंधित अधिकारी मात्र मूग गिळून गप्प असल्याने नागरिकांत तीव्र नाराजी आहे. पावसाळा सुरू होताच खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

## हरविलेले २० मोबाईल

तसेच अप्पर पोलिस अधिक्षक दत्ता तोटेवार यांच्या सूचनेनुसार उपविभागिय पोलिस अधिकारी दर्यापूर सतिश कुलकर्णी यांच्या नेतृत्वात करण्यात आली.शोधण्यात आलेले सर्व २० मोबाईल दर्यापूर पोलिस स्टेशन येथे आयोजित कार्यक्रमात उपविभागिय सतिश कुलकर्णी व ठाणेदार अजित राठोड यांच्या हस्ते संबंधित मूळ मालकांच्या ताब्यात देण्यात आले.

ही यशस्वी कारवाई करण्यासाठी दर्यापूर पोलिस स्टेशनचे पोलिस अंमलदार सचिन जाधव, पोलिस अंमलदार लखन होलगरे तसेच सायबर पोलीस स्टेशनचे पोलिस हवालदार राठोड यांनी विशेष मेहनत घेऊन तांत्रिक तपासाच्या माध्यमातून मोबाईलचा शोध लावला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ शनिवार, ४ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे- जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**शेती आणि शेतकऱ्यांचा विकास हा केवळ शासनाच्या योजनांवर अवलंबून नसून प्रशासन व शेतकरी यांनी उत्कृष्ट समन्वय साधून एकत्रितपणे काम केल्यासच कृषी क्षेत्रात शाश्वत प्रगती साधता येईल. आधुनिक तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण शेती पद्धती आणि शासनाच्या विविध योजनांचा प्रभावी लाभ प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.**

## कृषी दिनानिमित्त जिल्हा परिषदेत कै. वसंतराव नाईक यांना अभिवादन; प्रगतिशील शेतकरी व पीक स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव



कृषी विभाग, जिल्हा परिषद वाशिम यांच्या वतीने १ जुलै रोजी कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद सभागृहात कृषी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान होते.

अध्यक्षीय समारोपात मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी कै. वसंतराव नाईक यांनी राज्याच्या कृषी विकासासाठी दिलेल्या दूरदृष्टीपूर्ण योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. शासनाच्या विविध कृषी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून त्यांचा लाभ प्रत्येक पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषी विभागाने अधिक समन्वयाने कार्य करावे. आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, जलसंधारण, पीक विविधीकरण आणि शाश्वत शेती पद्धतींच्या माध्यमातून जिल्ह्यातील कृषी विकासाला अधिक गती देण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शहा, प्रकल्प संचालक आत्मा अनिसा महाबळे, प्रगतिशील शेतकरी दिलीप फुके, शास्त्रज्ञ डॉ. राजेश डावरे आणि डॉ. भरत गीते यांनी आधुनिक शेती तंत्रज्ञान, उत्पादनवाढ, मृदा आरोग्य, पीक व्यवस्थापन आणि शाश्वत शेतीविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृषी विकास अधिकारी अभिजीत देवगिरीकर यांनी केले. सूत्रसंचालन संतोष चौधरी, वैशाली गावंडे आणि गव्हाळे यांनी केले. या कार्यक्रमात सन २०२५-२६ मधील जिल्हास्तरीय पीक स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त करणारे राजू बल्लाळ, प्रल्हाद मोरे, नारायण देशपांडे, बबन गोदमोले, गणेश भोंडणे, सचिन राऊत, गोपाल गोदमोले आणि संतोष डाखोरे यांचा गौरव करण्यात आला.

तसेच जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना अंतर्गत विहिरींची कामे पूर्ण करून शेतीत उल्लेखनीय प्रगती केलेल्या संदेश डेरे, दिलीप जयाजी सावंत, अनुसया गारुळे, भीमराव कांबळे, संतोष अंभोरे, प्रयागबाई डाखोरे, रघुनाथ लठाड, संतोष मोरे, पांडुरंग भगत, अन्नपूर्णा ढाकरे आणि सीमा कोल्हारे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी कर्मयोगी दादारावजी जोगदंड कृषी महाविद्यालय, आमखेडा येथील प्राचार्य वाकुडकर तसेच विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

# आरक्षणाचे तुकडे पाडणारा उपवर्गीकरणाचा निर्णय म्हणजे बहुजनांच्या पाठीत खंजीर – ॲड.संदीप ताजने

■ प्रतिनिधी | वाशिम ■



अनुसूचित जातीच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याचा निर्णय हा बहुजन समाजात अंतर्गत फूट पाडणारा आणि घटनाकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या घटनात्मक अधिकारांना कमकुवत करणारा आहे; असा घणाघाती आरोप बहुजन नेते ॲड.संदीप ताजने यांनी शुक्रवारी (ता.३) केला. उपवर्गीकरणाचा निर्णय म्हणजे बहुजनांच्या पाठीत खंजीर खुपसणारा आहे, अशी भावना व्यक्त करीत यामागील राजकीय व सामाजिक धोके ॲड.ताजने यांनी अधोरेखित केले.

अनुसूचित जाती हा केवळ एक प्रवर्ग नसून, शतकानुशतके अस्पृश्यतेचा आणि सामाजिक विषमतेचा डंख सोसलेला एकसंघ समाज आहे. उपवर्गीकरणामुळे या समाजात 'जात विरुद्ध जात' असा अंतर्गत संघर्ष निर्माण होईल, ज्यामुळे बहुजन चळवळीची मूळ शक्ती कमकुवत होण्याची शक्यता असल्याची भीती ॲड.ताजने यांनी व्यक्त केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण शोषित समाजाला एका छताखाली आणण्यासाठी अनुसूचित जातीची संकल्पना मांडली. उपवर्गीकरणामुळे या ऐक्याचे तुकडे होतील, असे ॲड.ताजने म्हणाले.

आरक्षणाचा आधार आर्थिक नसून 'सामाजिक अस्पृश्यता' हा आहे. अनुसूचित जातीमधील सर्वच उपजातींनी हा दंश सारखाच झेलला आहे, त्यामुळे त्यांच्यात पुन्हा भेद करणे अन्यायकारक आहे. कोणत्याही ठोस, अचूक आणि देशव्यापी

## अनुसूचित जातींमध्ये फूट पाडण्याचा डाव असल्याचा आरोप

जातनिहाय जनगणनेशिवाय किंवा उपजातींच्या मागासलेपणाचा वस्तुनिष्ठ डेटा नसताना असा निर्णय घेणे तर्कसंगत नाही, असे ॲड.ताजने यांनी स्पष्ट केले.

सरकारी क्षेत्रातील खाजगीकरण आणि कंत्राटीकरणामुळे मुळातच नोकऱ्या संपत चालल्या आहेत. मूळ जागाच शिल्लक नसताना आरक्षणाचे उपवर्गीकरण करणे म्हणजे बहुजनांची दिशाभूल करण्यासारखे आहे. हा निर्णय बहुजन समाजाचे राजकीय व सामाजिक महत्त्व कमी करण्याचा एक सुनियोजित डाव आहे. कायदेशीर आणि घटनात्मक चौकटीत या निर्णयाला आमचा तीव्र विरोध राहील. सरकारने हा निर्णय मागे न घेतल्यास रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा ॲड.ताजने यांनी दिला.

# १५ वर्षांपूर्वी घडलेल्या बहूचर्चित बेंग्या पवार प्रकरणी आंबेडकरी आंदोलनाला यश - राजकुमार पडघान

## ठाणेदारासह पोलीसांना जन्मठेप न्यायालयाचा आदेश

■ प्रतिनिधी | वाशिम ■

हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यात येत असलेल्या वाढोणा या गावातील पारधी वस्तीवर चोरीच्या संशायावरून रिसोड पोलीसांनी दि .९ मे २०११ रोजी धाड टाकून बेग्या पवार यास गावातून तर राजू पवार यास शेतातून अटक केली होती.

या प्रकरणी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना समजताच चळवळीतील कार्यकर्ते व वाशीम जिल्हा नेते हे वाढोणा येथील पारधी वस्तीवर जावून त्यांची भेट घेतली.व आंदोलनाची दिशा ठरवून तीव्र आंदोलन करण्याचा ठरविले.नंतर बेग्या पवार व राजू पवार या संशयीत आरोपींना चोरीची कबुली देण्यासाठी रिसोड पोलीसांनी बेदम मारहाण केली.त्यामध्ये बेग्या पवार यांचे शरिरावर ४४ जखमा झाल्या.आणि त्यातच त्यांचा दि १० हे रोजी रिसोड पोलीस स्टेशनमध्येच मृत्यू झाला. ही घटना आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना समजताच चळवळीतील कार्यकर्त्यांनी वाशीम मध्ये तीव्र प्रकारचे आंदोलन करून बेग्या पवार याच्या मृत्यूचा तपास सिआयडीकडे देवून बेग्या पवार यांचे मृत्यूस जबाबदार असणाऱ्या पोलीसांवर कठोरातील कठोर कारवाईची मागणी केली होती.असे डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे.यामध्ये जिल्ह्यातील सर्वच वर्तमान पत्राने दखल घेतली होती. पुढे राजकुमार पडघान यांनी म्हटले की, जो पर्यंत बेग्या पवार यांचे मृत्यूस जबाबदार असणाऱ्यावर कार्यवाही होत नाही तोपर्यंत आंदोलन हे तीव्रतेने सुरू राहील.त्यानंतर लगेच बेग्या पवार प्रकरण सिआयडीकडे सुपुर्द करून वाशीम न्यायालयात दाखल करण्यात आले.आणि जबाबदार पोलीसांवर कार्यवाही झाली.त्यांना न्यायालययाचे दरवाजे ठोठावण्याची वेळ आली. कार्यवाही झालेले पोलीस अधिकारी व कर्मचारी से.नि.देखील झाले आहेत.

# सत्ताधारी भाजप नगरसेवकाचाच नगरपरिषदेला कचऱ्याचा 'प्रसाद'

## वाशीममध्ये स्वच्छतेच्या प्रश्नावर अनोखे आंदोलन





■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम शहरातील कचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नावर संतप्त झालेल्या भाजपचे नगरसेवक सतीश उर्फ गल्ला वानखेडे यांनी सोमवारी थेट नगरपरिषद कार्यालयात कचरा आणून टाकत अनोख्या पद्धतीने आंदोलन केले. नगरपरिषदेच्या परिसरासह अधिकाऱ्यांच्या दालनात कचरा टाकल्याने काही काळ दुर्गंधी पसरली आणि या प्रकाराची शहरभर जोरदार चर्चा रंगली.

वाशिम शहरातील अनेक प्रभागांमध्ये कचरा संकलन करणाऱ्या गाड्या नियमित येत नसल्याने ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिग साचत असल्याचा आरोप नगरसेवक वानखेडे यांनी केला. यामुळे शहरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रभाग क्रमांक ८ मधील नागरिकांच्या तक्रारींकडे नगरपरिषद प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत वानखेडे यांनी संतप्त भूमिका घेत नगरपरिषद कार्यालयातच कचरा आणून टाकला.

शहरातील कचरा व्यवस्थापन तातडीने सुरळीत करण्यात आले नाही, तर यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,' असा इशाराही त्यांनी दिला. विशेष म्हणजे, सत्ताधारी पक्षातील नगरसेवकानेच प्रशासनाविरोधात आंदोलनाचा मार्ग अवलंबल्याने नगरपरिषदेतील कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, भाजपच्या स्थानिक गोटात सर्व काही आलबेल नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

दरम्यान, या प्रकरणी नगरपरिषदेचे आरोग्य निरीक्षक सुदाम चव्हाण यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की, संबंधित प्रभागातील कचरा संकलन करणारी गाडी दुरुस्तीच्या कामासाठी गेल्यामुळे गेल्या दोन ते तीन दिवसांपासून बंद होती.

त्यामुळे त्या प्रभागात कचरा उचलला जाऊ शकला नाही. मात्र, शहरातील इतर सर्व कचरा गाड्या नियमित सुरू असून सेवा सुरळीत सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# श्री मध्यमेश्वर संस्थानच्या पुनर्स्थापनेला ६५ वर्षे पूर्ण; भक्तीमय वातावरणात स्थापना दिन संपन्न




■ प्रतिनिधी | वाशिम ■

पृथ्वीच्या मध्यरेषेवरील जागृत देवस्थान म्हणून ख्याती असलेल्या वाशिम येथील 'श्री मध्यमेश्वर संस्थान'च्या पुनर्स्थापनेला ६५ वर्षे पूर्ण झाली आहेत. या ऐतिहासिक दिनानिमित्त शनिवारी (दि. २७ जून २०२६) ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीला मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावत शिवकृपेचा लाभ घेतला.

**इतिहास आणि स्थापना दिन** : वाशिम (प्राचीन वत्सगुल्म) नगरीला ऐतिहासिक वारसा लाभला असून, खगोलशास्त्रीय दृष्ट्या पृथ्वीच्या मध्यरेषेवर हे मंदिर वसलेले आहे. वाकाटक काळात येथे भव्य वेधशाळा आणि मंदिर होते, असे संदर्भ मिळतात. कालांतराने मंदिराची हानी झाल्यानंतर, १९६१ मध्ये आद्य गुरु शंकराचार्य यांच्या पावन हस्ते ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी अर्थात 'शिवसाम्राज्य दिनी' या मंदिराची अधिकृत पुनर्स्थापना करण्यात आली होती. या घटनेला ६५ वर्षे पूर्ण झाल्यामुळे मंदिर परिसरात उत्साहाचे वातावरण होते.

**दिवसभराचे धार्मिक उपक्रम** : या पवित्र दिनानिमित्त मंदिरात सकाळी रुद्राभिषेक आणि विशेष महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर 'श्री शिवलीलामृत' ग्रंथाचे सामूहिक पारायण पार पडले. या धार्मिक सोहळ्यानंतर असंख्य भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# काटेपुर्णा अभयारण्यात प्री-मान्सून बर्ड सर्वे उत्साहात संपन्न; १५३ पक्षी प्रजातींची नोंद

**मंगरुळपीर** : वाशिम-अकोला जिल्ह्यात पसरलेल्या काटेपुर्णा अभयारण्यात अकोला वन्यजीव विभाग, निसर्गकट्टा अकोला, वत्सगुल्म जैवविविधता संवर्धन संस्था (वाशिम) आणि महाराष्ट्र पक्षीमित्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'काटेपुर्णा प्री-मान्सून बर्ड सर्वे-२०२६' उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला. तीन दिवस चाललेल्या या सर्वेमध्ये देशातील विविध राज्यांतील ३० पक्षी अभ्यासक, निसर्गप्रेमी आणि पर्यावरणशास्त्राच्या



विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये उत्तराखंड, पंजाब, मध्यप्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा आणि महाराष्ट्रातील देहरादून, लुधियाना, इंदौर, भोपाल, बुऱ्हाणपूर, बिलासपूर, दुर्ग, गोंदिया, हैदराबाद, नागपूर, पुणे, जालना, लोणार, अमरावती, वाशिम आणि अकोला येथील सहभागी या सर्वेत सहभागी झाले होते.

# रंगारंग झाला इनरव्हिल क्लब अकोलाचा पदग्रहण सोहळा


**अकोला** : सामाजिक, सांस्कृतिक सेवा क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिलांच्या इनरव्हील कलब ऑफ अकोलाचा नूतन कार्यकारणीचा पदग्रहण सोहळा गुरुवारी नवीन बस स्टँड जवळील हॉटेल कृष्णा मध्ये गुरुवारी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या पदग्रहण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय इनरव्हीलच्या कोषाध्यक्ष डॉ.रश्मी शर्मा उपस्थित होत्या. सर्वप्रथम बालिका वियाना शाह हिच्या गणेश वंदना नृत्य व स्वराली अग्रवाल यांच्या स्वागत गीताने या सोहळयास प्रारंभ झाला. कार्यक्रमात अध्यक्षा जयश्री शास्त्रकार यांनी वर्ष २०२६-२७ च्या अध्यक्षा निरू शाह यांना अध्यक्ष पदाचा पदभार सोपविला.

# 'एक हात शिक्षणासाठी... एक हात समाजासाठी'

## विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे मोफत वाटप

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शिक्षणाच्या प्रवासात आर्थिक अडचणी आड येऊ नयेत आणि प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी मिळावी, या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून गोविंद इंग्लिश पब्लिक स्कूल व गोविंद महाराज उच्च प्राथमिक मराठी शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने स्वर्गीय अर्जुनराव पाटील यांच्या १९व्या पुण्यस्मरणानिमित्त गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे मोफत दि.३० जून रोजी वाटप करण्यात आले. शाळेच्या नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच



दिवशी झालेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य खुलले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच ज्या विद्यार्थ्यांना आई किंवा वडील यापैकी एक पालक नाही अशा विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना वह्या, पुस्तके व अन्य आवश्यक शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला नवसंजीवनी मिळाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे अध्यक्ष श्री. किरण चौधरी सर होते, तर प्रमुख अतिथी म्हणून गोपालभाऊ पवार उपस्थित होते. यावेळी गोविंद महाराज उच्च प्राथमिक मराठी शाळेच्या मुख्याध्यापिका अपर्णा कदम मॅडम तसेच गोविंद इंग्लिश पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका अर्चना काकडे मॅडम यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेचे संचालक संतोष चौधरी सर यांनी प्रास्ताविकातून शाळेचा गौरवशाली प्रवास, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधा आणि संस्थेमार्फत सातत्याने राबविण्यात येणाऱ्या सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेतला. आपल्या मनोगतात ते म्हणाले, 'समाजातील गरजू, होतकरू आणि पालकांच्या छत्रछायेला मुकलेल्या विद्यार्थ्यांच्या भावना समजून प्रत्येकाने मदतीचा हात पुढे करणे ही काळाची गरज आहे.

# शिष्यवृत्ती परीक्षेत आरुषी ढोरे वाशीममध्ये पहिली; कारंजाच्या इतिहासात मानाचा तुरा!

■ प्रतिनिधी | कारंजा ■



महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) आणि पूर्व माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षेत कारंजा येथील विद्यार्थिनीने यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. या परीक्षेत कारंजा येथील विद्यार्थ्यांनी जिल्हा व राज्य पातळीवर घवघवीत यश संपादन केले असून संपूर्ण परिसरात विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची चर्चा आहे.

या परीक्षेत कारंजा येथील अष्टपैलू विद्यार्थिनी आरुषी रुपेश ढोरे हिने आपल्या अफाट बुद्धिमत्तेच्या जोरावर वाशिम जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावण्याचा अभूतपूर्व बहुमान मिळवला आहे. अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या राज्य पातळीवरील गुणवत्ता यादीतही तिने १३ वा क्रमांक मिळवून कारंजा शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

# 'शिक्षणाच्या नव्या प्रवासाची आनंदमयी सुरुवात'

## जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते सोनखास येथे शाळा प्रवेशोत्सव उत्साहात

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शिक्षण हीच उज्ज्वल भविष्याची गुरुकिल्ली आहे, या भावनेला साजेसा उत्साह, आनंद आणि विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील निरागस हास्य अशा मंगलमय वातावरणात पंचायत समिती, वाशिम अंतर्गत जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा, सोनखास येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चा शाळा प्रवेशोत्सव जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.

प्रवेशोत्सवानिमित्त शाळेच्या परिसराची आकर्षक सजावट करण्यात आली होती. रंगीबेरंगी फुगे, स्वागत कमानी, रांगोळ्या आणि प्रेरणादायी संदेशांनी संपूर्ण शाळा नव्या शैक्षणिक वर्षाच्या स्वागतासाठी सजली होती. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे औक्षण



करून, पुष्पगुच्छ देऊन आणि शालेय साहित्य प्रदान करून त्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि पालकांच्या डोळ्यांतील समाधान यामुळे प्रवेशोत्सव संस्मरणीय ठरला. यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. प्रत्येक बालकाने नियमित शाळेत उपस्थित राहून गुणवत्तापूर्ण शिक्षण घ्यावे, आपल्या आवडी-निवडी जपत ज्ञान, संस्कार आणि कौशल्यांचा विकास करावा, असे त्यांनी सांगितले. पालकांनीही मुलांच्या शिक्षणात सक्रिय सहभाग घेऊन त्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी स्वागतगीत, सांस्कृतिक सादरीकरण आणि विविध उपक्रमांद्वारे उपस्थितांची मने जिंकली. शिक्षकांनीही नवागत विद्यार्थ्यांना शाळेतील शैक्षणिक वातावरण, विविध उपक्रम आणि उपलब्ध सुविधांची माहिती दिली. या प्रवेशोत्सवामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दल आत्मीयता निर्माण झाली असून, पालकांमध्येही मुलांना नियमित शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याची सकारात्मक भावना दृढ झाली. शाळेतील शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात राहील, यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २१७ ■ शनिवार, ४ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.



महापुराने हिरावली अन्नदात्याची स्वप्ने

# पेरलेली शेते खरडली; दुबार पेरणीच्या संकटाने आष्टी तालुक्यातील शेतकरी हतबल

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील सततच्या मुसळधार पावसाने आणि नदी-नाल्यांच्या महापुराने शेतकऱ्यांच्या कष्टावर अक्षरशः पाणी फेरले आहे. वडाळा, साहूर, बोरगाव, माणिकवाडा, तारासावंगा, अंतोरा, खंबीत, बेलोरा, भारसवाडा, खडकी, परसोडा, सिरसोली, चिस्तूर, भीषणूर, आनंदवाडी, राणवाडी, तळेगाव, बंबरडा, बोरखेडी, थार, किन्ही, मोई, धाडी, पोरगव्हाण, पंचाळा, पिलापूर, लहान आर्वी, जैतापूर, लिंगापूर, जोळवाडी, देलवाडी आणि अंबिकापूर परिसरातील शेकडो हेक्टरवरील नव्याने पेरलेली खरीप पिके महापुराच्या पाण्यात वाहून गेली आहेत.

२७ व २८ जूनच्या अतिवृष्टीनंतर सावरत असतानाच १ जुलैच्या मध्यरात्री झालेल्या संततधार पावसाने शेतकऱ्यांचे उरले-सुरले धैर्यही खचवले. सोयाबीन, कापूस, तूरसह विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक ठिकाणी सुपीक मातीही वाहून गेली आहे. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे भीषण आर्थिक संकट ओढवले आहे.

कर्ज काढून, दागिने गहाण ठेवून आणि उसनवारी करून बियाणे-खते खरेदी करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर आता पुन्हा पेरणीसाठी निधी उभा करण्याचे मोठे आव्हान आहे.

विशेष म्हणजे, एवढ्या मोठ्या नुकसानीनंतरही अनेक गावांत पंचनामे सुरू न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप आहे.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत, मोफत बियाणे-खते, दुबार पेरणीसाठी विशेष अनुदान आणि त्वरित पंचनामे करण्याची मागणी जोर धरत आहे.

# डोरलीत ग्रामस्थांचा रस्तारोको; रस्ता द्या, नाहीतर आंदोलन तीव्र करू चा इशारा

## पोलिसांच्या मध्यस्थीनंतर तासाभराने आंदोलन स्थगित

गिट्टीच्या अवजड वाहतुकीने रस्ता उद्ध्वस्त

**वर्धा जनमाध्यम :** विकासाच्या गप्पा आणि प्रत्यक्षात खड्ड्यांनी भरलेले रस्ते, या विरोधाभासाविरोधात देवळी तालुक्यातील डोरली गावातील नागरिकांचा संताप शुक्रवारी रस्त्यावर उसळला. गिट्टीच्या अवजड वाहनांनी अक्षरशः चाळण केलेल्या रस्त्याच्या तातडीच्या दुरुस्तीच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी थेट रस्तारोको आंदोलन छेडत प्रशासनाला धारेवर धरले. सुमारे तासभर वाहतूक ठप्प राहिल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. अखेर पोलिसांच्या मध्यस्थीनंतर आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले.



डोरली परिसरातील गिट्टी खदानीतून दिवस-रात्र अवजड वाहनांची वर्दळ सुरू असते. मात्र या वाहतुकीचा सर्वाधिक फटका गावकऱ्यांनाच बसत आहे. रस्त्यावर पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे प्रत्येक प्रवास जीवघेणा ठरत असून दुचाकीस्वार, शालेय विद्यार्थी आणि रुग्णवाहिकांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी खड्डे न दिसल्याने गंभीर अपघातांची भीती कायम आहे. अनेकदा मागणी करूनही प्रशासनाने दखल घेतली नसल्याचा आरोप करत संतप्त नागरिकांनी रस्त्यावर ठिय्या मांडला.

आंदोलनाची माहिती मिळताच पुलगावचे ठाणेदार सदाशिव ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून संबंधित विभागाशी संपर्क साधण्यात आला. रस्त्याच्या दुरुस्तीबाबत सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन मिळाल्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन स्थगित केले. त्यानंतर ठप्प झालेली वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली.

आंदोलनात ज्ञानेश्वर मोहिते, अमोल गोंडाणे, सुरेश चांभारे, भास्कर चांभारे, विक्की गोंडाणे, संदेश जारुंडे, प्रशिक पाटील, स्वप्नील गोंडाणे, अजय मोहिते, मनोज मोहिते, महेश गायकी, अविनाश गोंडाणे, राहुल मोहिते, राम घरकेले, विकी भगत, राहुल लोहारे, सूरज लिंतपणे, हर्षदीप लिंतपणे, शेषराव पाटील, सुजल जारुंडे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ सहभागी झाले होते.

# सभागृहात कचरा फेकणे भोवले; तिघा नगरसेवकांना दंड, खुलाशाची नोटीस

## सदस्यत्व रद्द करण्याचा प्रस्ताव पाठविण्याचा इशारा

**पुलगाव जनमाध्यम :** स्थानिक नगरपालिकेच्या विशेष सभेत अध्यक्ष व उपाध्यक्षांच्या टेबलवर कचरा आणि नालीतील सांडपाणी फेकून आंदोलन करणाऱ्या तीन नगरसेवकांविरुद्ध मुख्याधिकारी विजयकुमार आश्रमा यांनी कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे. संबंधित तिन्ही नगरसेवकांना प्रत्येकी १०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला असून, त्यांना सदस्यपदावरून दूर करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे का पाठवू नये, याबाबत तीन दिवसांत लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

पुलगाव नगर परिषदेच्या विशेष सभेदरम्यान नगरसेवक प्रवीण जुगलकिशोर पनिया, दुर्गेश देवीप्रसाद यादव आणि

### अध्यक्ष-उपाध्यक्षांच्या टेबलवर कचरा टाकल्याप्रकरणी मुख्याधिकाऱ्यांची कारवाई

आकाश ईश्वर कागडे यांनी शहरातील कचरा व्यवस्थापन आणि नाल्यांच्या सांडपाण्याच्या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी दोन पोती कचरा व नालीतील सांडपाणी सभागृहात आणून थेट नगराध्यक्ष व उपाध्यक्षांच्या टेबलवर फेकले होते. या घटनेमुळे सभागृहात एकच खळबळ उडाली होती.

या प्रकारामुळे सभागृहाची प्रतिष्ठा आणि पावित्र्य बाधित झाले, सभेच्या कामकाजात अडथळा निर्माण झाला तसेच नगर परिषदेची प्रतिमा मलिन झाल्याचा ठपका मुख्याधिकाऱ्यांनी ठेवला आहे. त्यानुसार महाराष्ट्र नगर परिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ४२ व ४४ अंतर्गत संबंधित नगरसेवकांना प्रत्येकी १०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

याशिवाय संबंधित नगरसेवकांना सदस्यपदावरून दूर करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे का पाठवू नये, याबाबत तीन दिवसांच्या आत लेखी खुलासा सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विहित मुदतीत समाधानकारक उत्तर न दिल्यास पुढील एकतर्फी कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा मुख्याधिकारी विजयकुमार आश्रमा यांनी दिला आहे.

# ऑनलाइन परीक्षा रद्द करा : विद्यार्थ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

## एमपीएससीसह पेपरफुटी प्रकरणावर संताप; मोर्चाने दणाणले शहर, जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपती-राज्यपालांना निवेदन

**वर्धा जनमाध्यम:** एमपीएससी संयुक्त गट 'क' परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्याच्या निर्णयाविरोधात व पेपरफुटीच्या वाढत्या घटनांबाबत संतप्त झालेल्या स्पर्धा परीक्षा देणाऱ्या तरुण-तरुणींनी शुक्रवारी शहरात जोरदार मोर्चा काढत सरकारविरोधात एल्गार पुकारला. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ थांबवा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. मोर्चानंतर विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपती व राज्यपालांना पाठविण्यात आले.

स्पर्धा परीक्षा विद्यार्थी कृती समितीच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकातून मोर्चाला सुरुवात झाली.



सोशलिस्ट चौक, बजाज चौक, नेताजी सुभाषचंद्र बोस चौक, झाशी राणी चौक मार्गे हा मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात पोहोचला. येथे मोर्चाचे विसर्जन करण्यात आले.

आंदोलनकर्त्यांनी एमपीएससी संयुक्त गट 'क' परीक्षा ऑनलाईनऐवजी ऑफलाईन पद्धतीने घेण्यात यावी, परीक्षा प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक व विद्यार्थीहिताची असावी, टीईटी पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करून त्यांच्यावर जलदगती न्यायालयात खटला चालविण्यात यावा, तसेच नीट पेपरफुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशा प्रमुख मागण्या केल्या. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत सरकारच्या विद्यार्थीविरोधी धोरणांवर टीका केली. स्पर्धा परीक्षांची विश्वासार्हता टिकविण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणीही त्यांनी केली. आंदोलनाचे नेतृत्व नितेश कराळे, इंद्रजित वाघमारे, अमित कावडकर आणि प्रफुल गेडाम यांनी केले. मोठ्या संख्येने स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे तरुण-तरुणी या मोर्चात सहभागी झाले.

# बालकावरील अत्याचार-हत्या प्रकरणी आरोपीला जन्मठेप

## वर्धा जिल्हा न्यायालयाचा कठोर निर्णय

**वर्धा जनमाध्यम :** अल्पवयीन मुलाला चॉकलेटचे आमिष दाखवून त्याच्यावर अनैसर्गिक अत्याचार केल्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी त्याची हत्या केल्याप्रकरणी वर्धा जिल्हा न्यायालयाने आरोपीला आजीवन सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. अतिरिक्त सत्र न्यायाधीश तथा जिल्हा न्यायाधीश-३ एस. जे. अन्सारी यांनी आरोपी विशाल गजानन जोगदंड (वय २६, रा. वर्धा) यास दोषी ठरवत विविध कलमांखाली कारावास व दंडाची शिक्षा ठोठावली.



न्यायालयाने भादंवि कलम ३०२ अंतर्गत आजीवन सश्रम कारावास व तीन हजार रुपये दंड, कलम ३७७ अंतर्गत दहा वर्षांचा सश्रम कारावास, कलम ३६३ अंतर्गत सहा वर्षांचा सश्रम कारावास, कलम ३४२ अंतर्गत एक वर्षाचा सश्रम कारावास, कलम २०१ अंतर्गत पाच वर्षांचा सश्रम कारावास तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक (पॉक्सो) कायद्यानुसार दहा वर्षांचा सश्रम कारावास व दहा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास अतिरिक्त कारावासाचीही तरतूद करण्यात आली आहे.

घटनेतील आरोपीने मुलाला चॉकलेटचे आमिष दाखवून एका झोपडीत नेले. तेथे त्याच्यावर अनैसर्गिक अत्याचार करण्यात आला. मुलाच्या रडण्याचा आवाज ऐकून एका महिलेने झोपडीचा दरवाजा ठोठावला; मात्र आरोपीने दार उघडले नाही. काही वेळाने तो महिलेला धक्का देत तेथून पसार झाला. संशय आल्याने नागरिकांनी झोपडीत शोध घेतला असता प्लास्टिकच्या पाण्याच्या टाकीत मुलाचा मृतदेह तरंगताना आढळला. पोलिस तपासात

### अल्पवयीन मुलावरील अनैसर्गिक अत्याचारानंतर हत्या

अत्याचारानंतर मुलाची हत्या करून मृतदेह टाकीत टाकल्याचे निष्पन्न झाले.

या गंभीर गुन्ह्याचा तपास उपविभागीय पोलिस अधिकारी पियुष जगताप यांनी केला. शासकीय पक्षाची बाजू अतिरिक्त सरकारी वकील विनय आर. घुडे यांनी मांडली. शासकीय पक्षाने १३ साक्षीदारांचे जबाब व भक्कम पुरावे सादर केल्यानंतर न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत कठोर शिक्षा सुनावली.

# ओसाड भूमीला हिरव्या स्वप्नांचा शालू

## वनमहोत्सवानिमित्त १० एकरांवर ४४४४ रोपांचे संगोपनाचे संकल्प

### विद्यार्थी, ग्रामस्थ आणि प्रशासनाने श्रमदानातून घडविला निसर्गसोहळा

वर्धा जनमाध्यम : आज झाडे लावली, तर उद्या जीवन फुलेल... हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देत वनमहोत्सवानिमित्त शुक्रवारी आलोडी परिसरात निसर्गसंवर्धनाचा प्रेरणादायी सोहळा रंगला. वनविभागाच्या पुढाकाराने १० एकर ओसाड क्षेत्रावर तब्बल ४ हजार ४४४ विविध प्रजातींच्या रोपांची लागवड करण्यात आली. प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, वनकर्मचारी, ग्रामस्थ आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी खांद्याला खांदा लावून श्रमदान करत उजाड भूमीला हिरव्या भविष्यासाठी सजविण्याचा संकल्प केला.

संत तुकाराम महाराजांच्या वृक्षवल्ली आम्हा सोयरे या अभंगाचा प्रत्यय देणारा हा उपक्रम वनविभागाने वनमहोत्सवाच्या निमित्ताने राबविला. आलोडी येथील सर्व्हे क्रमांक ७१ मधील सुमारे ९ हेक्टर क्षेत्रापैकी ४ हेक्टरवर आवळा, कडुलिंब, उंबर, सिताफळ, जांभूळ, पापडा, सिसू आदी पर्यावरणपूरक प्रजातींची रोपे लावण्यात आली. काही तासांतच उजाड दिसणाऱ्या परिसराने हिरवाईचे स्वप्न अंगीकारल्याचे चित्र पाहायला मिळाले.



उपक्रमात जिल्हाधिकारी वान्मथी सी., पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, उपवनसंरक्षक हरविर सिंग, सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वनाधिकारी सुहास बढेकर, सहायक वनसंरक्षक हरिलाल सरोदे, निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे, साटोडाचे सरपंच गौरव गावंडे तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी वैशाली भलावी यांनी स्वतः रोपे लावून वृक्षसंवर्धनाचा संदेश दिला. वृक्ष लावणे ही केवळ जबाबदारी नसून, पुढील पिढीला सुरक्षित पर्यावरण देण्याची सामूहिक प्रतिज्ञा आहे, असा भाव या उपक्रमातून उमटला.

यावेळी वन अधिकाऱ्यांनी वृक्ष लागवडीबरोबरच त्यांच्या संगोपनाचे महत्त्व अधोरेखित केले. लावलेले प्रत्येक रोप जगले, तरच हरित वर्ध्याचे स्वप्न साकार होईल, असा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

**विद्यार्थ्यांच्या हातून हिरव्या भविष्याची पेरणी**

या उपक्रमात न्यू आर्ट, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत श्रमदान केले.

हातात कुदळ आणि रोपे घेऊन विद्यार्थ्यांनी वृक्ष लागवड करत पर्यावरण संवर्धनाची सामाजिक जबाबदारी स्वीकारली. तरुणाईच्या सहभागामुळे हा उपक्रम अधिक प्रेरणादायी ठरला.

**ग्रामस्थ आणि वनकर्मचाऱ्यांचीही हिरवाईसाठी एकजूट**

आलोडी व साटोडा येथील ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहाने वृक्ष लागवडीत सहभाग घेतला. हिंगणी व वर्धा वनपरिक्षेत्रातील ८० हून अधिक वनकर्मचाऱ्यांनी श्रमदान करत रोपे लावली. प्रशासन, ग्रामस्थ आणि विद्यार्थी यांच्या एकत्रित सहभागातून पर्यावरण संरक्षणाचा हा उपक्रम सामाजिक चळवळीचे रूप घेताना दिसला. हिरवाई जपण्याचा आणि पुढील पिढ्यांसाठी समृद्ध पर्यावरण निर्माण करण्याचा संदेश या उपक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला.

# रात्रभर दारात अस्वलीचा पहारा पिल्लासह ठाण मांडल्याने वस्ती हादरली

## -रासा-घोंसा वस्तीतील नागरिकांचा रात्रभर थरकाप

**समुद्रपूर जनमाध्यम :** दार उघडले आणि समोर अस्वली गुरुवारी मध्यरात्री समुद्रपूर तालुक्यातील मोहगाव जंगलालगतच्या रासा-घोंसा लोकवस्तीत घडलेल्या या प्रसंगाने अवघी वस्ती हादरून गेली. पिल्लासह आलेल्या अस्वलीने एका घराच्या व्हरांड्यात बराच वेळ ठाण मांडल्याने ग्रामस्थांना रात्रभर जीव मुठीत धरून काढावी लागली. वारंवार होणारा वीजपुरवठा खंडित होणे आणि जंगलातून लोकवस्तीकडे वाढलेला वन्यप्राण्यांचा वावर यामुळे परिसरात भीतीचे सावट अधिक गडद झाले आहे.

पहाटेच्या सुमारास वीज नसल्याने अंधारात घराबाहेर पडलेले संदीप पडवे यांना सुरुवातीला घरासमोर म्हैस उभी असल्याचा भास झाला. मात्र मोबाईलचा प्रकाश टाकताच समोर पिल्लासह अस्वली असल्याचे दिसताच त्यांनी प्रसंगावधान राखत तातडीने घरात धाव घेतली. त्यानंतर त्यांनी जगदीश महातळे आणि इतर ग्रामस्थांना माहिती दिली.

ग्रामस्थांनी कोणतीही घाई न करता सावधगिरीने प्रयत्न करत अस्वली आणि तिच्या पिल्लाला जंगलाच्या दिशेने परतवून लावले. मात्र सकाळी सहा वाजेपर्यंत सुरू असलेल्या या थरारामुळे संपूर्ण वस्ती भीतीच्या छायेत होती.

रासा-घोंसा वस्तीतील अवघ्या सहा कुटुंबांतील सुमारे वीस नागरिकांचे दैनंदिन आयुष्यच वन्यप्राण्यांच्या धास्तीने वेढले गेले आहे. २०१५ मध्ये याच परिसरातील शेतकरी ईश्वर महातळे यांचा अस्वलाच्या हल्ल्यात मृत्यू झाला होता. त्या घटनेची आठवण आजही ग्रामस्थांच्या मनातून पुसली गेलेली नाही. त्यामुळे अस्वलांसह इतर हिंस्र वन्यप्राण्यांचा लोकवस्तीतील वाढता वावर रोखण्यासाठी वनविभागाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांनी केली आहे.

कोर्ट विद्यमान श्री समर्थ क्षिरसागर तहसिलदार, तथा तालुका दंडाधिकारी यांचे न्यायालय देवळी

जन्म - मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये
ज.मृ.नो.र.प्र.क्र.- /२०२५-२६

**जाहीरनामा**

ज्याअर्थी संदर्भिय प्रस्तावाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) आणि महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम व फोजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम २० चे पोटकलम (१) अंतर्गत अर्जदार श्री मधुकर चिंधुजी चनेकार रा. मुरदगांव (खोसे) ता. देवळी जि. वर्धा यांची मुलगी कु. सलोनी हिचा जन्म मुरदगांव (खोसे) ता. देवळी येथे दिनांक २६/९/२००९ येथे झाला असून तिचे जन्माची नोंद ग्रामपंचायत मुरदगांव (खोसे) ता. देवळी येथे उपलब्ध नसल्याने त्यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तिकेमध्ये नोंद घेण्याचा आदेश होणेबाबत या कार्यालयास ग्रामपंचायत मुरदगांव (खोसे)) ता. देवळी यांचेव्दारे प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

त्याअर्थी सदर व्यक्तीच्या जन्माच्या नोंदीबाबत हितसंबंधीत व्यक्तीचे आक्षेप / हरकतो असल्यास ते त्यांनी निश्चित केलेल्या तारखेस स्वतः अथवा विधी व्यवसायीमार्फत किंवा मान्यता प्राप्त अभिकर्त्यामार्फत हजर राहून १५ दिवसाचे आत सादर करावे. उक्त तारखेनंतर व ठिकाणी अशा रितीने हजर राहण्यास व हरकती निवेदन करण्यास कसूर केल्यास त्यानंतर प्राप्त कोणत्याही हरकती व आक्षेप विचारात घेण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. / /२०२६


**तहसिलदार देवळी**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# इराणमध्ये खामेनींच्या अंत्यविधीला सुरुवात

## १४ महिन्यांच्या नातीची शवपेटीही ठेवली; श्रद्धांजली द्यायला आलेले राष्ट्रपती पझेशकियान यांचे डोळे पाणावले



अली खामेनी आणि त्यांची नात झहरा मोहम्मदी गोलपायगानी यांच्या शवपेट्या ठेवण्यात आल्या.




इराणच्या रिव्होल्युशनरी गार्डचे जनरल अहमद वाहिदी तेहरानमध्ये खामेनींच्या शवपेटीजवळ बसले आहेत.




इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची, सरन्यायाधीश गुलाम हुसेन मोहसेनी एजेई, संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर गालिबाफ आणि राष्ट्रपती मसूद पाझशिकयान हे तेहरानमधील इमाम खोमेनी ग्रँड मशिदीत आयोजित स्मृती समारंभास उपस्थित होते.



अयातुल्ला खामेनी यांच्या अंत्यदर्शनासाठी भारतीय सर्वधर्मधर्मीय शिष्टमंडळ तेहरानमध्ये





खामेनी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या शवपेट्यांसमोर एक महिला भावुक झाली.

### ६ दिवसांचा ऐतिहासिक अंत्यसंस्कार विधींना सुरु वात

तेहरान /**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** :: इराणचे दिवंगत सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या आठवडाभर चालणा-या अंत्यसंस्कार सोहळ्याला आज, शुक्रवारी राजधानी तेहरानमध्ये भावूक वातावरणात सुरु वात झाली. अमेरिका आणि इस्त्रायलच्या हवाई हल्ल्यात मारले गेलेले खामेनी यांचे पार्थिव अंतिम दर्शनासाठी तेहरानमधील इमाम खोमेनी ग्रँड मुसल्ला या विशाल प्रार्थनागृहात ठेवण्यात आले आहे. यावेळी इराणचे वरिष्ठ नेते, धर्मगुरू, लष्करी अधिकारी आणि परदेशी राजनैतिक प्रतिनिधींसह लाखो नागरिकांनी तीव्र शोक व्यक्त करत त्यांना श्रद्धांजली वाहिली. खामेनी यांच्या ३७ वर्षांच्या राजवटीचा अंत २८ फेब्रु वारी रोजी झालेल्या युद्धातील पहिल्याच हवाई हल्ल्यात झाला होता. इस्लामिक प्रजासत्ताकाबद्दलची निष्ठा आणि क्रांतिकारी उत्साह दाखवण्यासाठी सरकारने या भव्य अंत्यसंस्कारांचे आयोजन केले आहे.

इस्लामिक परंपरेनुसार मृत्यूनंतर २४ तासांच्या आत दफनविधी केला जातो; मात्र युद्धजन्य परिस्थिती आणि सुरक्षेच्या कारणास्तव हा सोहळा लांबणीवर पडला होता. गेल्या महिन्यात झालेल्या अंतरिम युद्धविराम करारानंतर आता हा कार्यक्रम होत आहे. जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, सोमवारी मध्य तेहरानमध्ये लाखो नागरिकांच्या उपस्थितीत मुख्य अंत्ययात्रा काढण्यात येईल. त्यानंतर मंगळवारी पार्थिव इराणमधील शिया धार्मिक शिक्षणाचे केंद्र असलेल्या कोम शहरात नेले जाईल. बुधवारी पार्थिव शेजारील देश इराकमधील शिया धर्मीयांची पवित्र स्थळे असलेल्या नजफ आणि कर्बला येथे नेण्यात येईल. अखेरीस गुरु वारी इराणमधील सर्वात पवित्र तीर्थक्षेत्र असलेल्या मशहद येथील इमाम रझा यांच्या दर्ग्याजवळ खामेनी यांच्यावर अंत्यसंस्कार केले जातील, ज्यानंतर हा शोकसोहळा समाप्त होईल.

खामेनी यांच्या अंत्यसंस्कारासाठी जागतिक स्तरावरील अनेक प्रमुख नेते तेहरानमध्ये दाखल झाले आहेत. यामध्ये प्रामुख्याने रशियाचे माजी राष्ट्राध्यक्ष दिमित्री मेदवेदेव, चीनच्या नॅशनल पीपल्स काँग्रेसचे उपप्रमुख हे वेई, पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ आणि इराकचे राष्ट्राध्यक्ष निझार अमेदी यांचा समावेश आहे. तसेच लेबन?नच्या हिजबुल्लाह संघटनेचे दिवंगत नेते हसन नसरल्लाह आणि कमांडर इमाद मुघनिया यांचे कुटुंबीयही उपस्थित होते. इराणचे राष्ट्राध्यक्ष, संसदेचे अध्यक्ष, परराष्ट्र मंत्री आणि नवीन क्रांतिकारी रक्षक दलाचे प्रमुख अहमद वाहिदी यांच्यासह अनेक लष्करी जनरल पार्थवासमोर नतमस्तक झाले.खामेनी यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी भारतातून एक विशेष सर्वधर्मधर्मीय शिष्टमंडळ इराणमध्ये दाखल झाले आहे. भारतामधील इराणी दूतावासाने या दौ-याचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले असून, त्यामध्ये भारतीय संस्कृती आणि विविधतेची अनोखी झलक पाहायला मिळत आहे. शुक्रवारी भारतामधून गेलेल्या या विशेष प्रतिनिधींनी त्यांचे अंतिम दर्शन घेउन खिराज-ए-अकीदत (आदरांजली) वाहिली. या शिष्टमंडळात भगवे वस्त्र परिधान केलेले हिंदू धर्मगुरू, पगडीधारी शीख धर्मगुरू आणि ख्रिश्चन धर्मगुरू ंचा समावेश असून, त्यांच्या या एकत्र येण्याने भारताच्या सर्वधर्मसमभावाचे दर्शन घडवले आहे.२८ फेब्रु वारी रोजी झालेल्या ज्या हल्ल्यात खामेनी मारले गेले, त्याच हल्ल्यात त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांचाही मृत्यू झाला होता. मुख्य सभागृहात खामेनी यांच्या शवपेटीशेजारीच त्यांची मुलगी, जावई, लहान नात आणि त्यांचा मुलगा मोजताबा यांच्या पत्नीची पार्थिवेदेखील दर्शनासाठी ठेवण्यात आली आहेत. अंत्यसंस्कारासाठी आलेल्या इसफाहान येथील अठरा वर्षीय विद्यार्थिनी मोबिना रझाघी हिने भावना व्यक्त करताना सांगितले की, देवाच्या इच्छेने आमच्या नेत्याच्या रक्ताचा सूड घेतल्याशिवाय आणि न्याय मिळाल्याशिवाय लोकांचे हे दुःख थोडेही कमी होणार नाही.हा अंत्यसंस्कार सोहळा इराणसाठी अत्यंत संवेदनशील आणि गंभीर क्षणी होत आहे. इराण गेल्या अनेक वर्षांपासून कडक आर्थिक निर्बंध आणि अंतर्गत असंतोषाचा सामना करत आहे. चालू वर्षाच्या जानेवारी महिन्यातच इराणमधील मोठ्या आंदोलनांमध्ये सुरक्षा दलांच्या कारवाईत हजारो निदर्शक मारले गेले होते, ज्यामुळे सत्ताधा-यांबिरोधात जनक्षोभ आहे. अशा परिस्थितीत राष्ट्रीय एकता आणि सत्ता टिकवून ठेवण्यासाठी प्रशासनाने हे शक्तिप्रदर्शन आयोजित केले आहे. अंत्ययात्रेत देशभरातून लाखो लोक सहभागी व्हावेत यासाठी हाटेल्समध्ये पन्नास टक्के सूट, मोफत वाहतूक, अन्न आणि निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे.खामेनी यांच्यानंतर त्यांचे सुपुत्र मोजताबा खामेनी हे इराणचे नवे सर्वोच्च नेते बनले आहेत. मात्र, वडिलांचा मृत्यू झालेल्या त्याच हवाई हल्ल्यात मोजताबा हेदेखील जखमी झाले होते आणि तेव्हापासून ते सार्वजनिक रित्या किंवा कोणत्याही छायाचित्रात दिसलेले नाहीत, ज्यामुळे नव्या नेतृत्वाबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे.

---

## शाळांच्या ५०० मीटर परिसरात स्टिंग एनर्जी ड्रिंक विक्रीवर बंदी

**मुंबईः** राज्यातील शाळकरी मुलांमध्ये लोकप्रिय होत असलेल्या स्टिंग एनर्जी ड्रिंकवर अखेर राज्य सरकारने अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात या विषयावर झालेल्या जोरदार चर्चेनंतर, शाळांच्या ५०० मीटर परिसरात स्टिंग एनर्जी ड्रिंकच्या विक्रीवर तात्काळ बंदी घालण्याचे निर्देश सरकारने दिले आहेत. मुलांच्या आरोग्याशी होणारी खेळ थांबवण्यासाठी हा एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय मानला जात आहे. श्रीगोंदा-नगरचे भाजप आमदार विक्रम पाचपुते यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित करत स्टिंग एनर्जी ड्रिंकच्या दुष्परिणामांकडे सरकारचे लक्ष वेधले. पाचपुते यांनी सभागृहात दावा केला की, स्टिंगमुळे मुलांच्या आरोग्यावर अत्यंत विपरीत परिणाम होत आहेत. जरी या पेयाची विक्री नियमांनुसार होत असली, तरी लहान मुलांना त्याची घातक सवय लागत आहे. विशेष म्हणजे, या पेयाच्या बाटलीवरच लहान मुले आणि गर्भवती महिलांसाठी हे पेय योग्य नाही असा स्पष्ट इशारा दिलेला असतो, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

## एमडी ड्रग्ज रॅकेटचा मुख्य आरोपी अखेर जेरबंद

**■ चार महिन्यांपासून होता फरार ■ ३.५० कोटींच्या अंमली पदार्थ प्रकरणात ११ आरोपी अटकेत**

**अमरावती/प्रतिनिधी-** शहरात एमडी (मेफेड्रोन) अंमली पदार्थांच्या विक्रीसाठी कार्यरत असलेल्या मोठ्या रॅकेटमधील चार महिन्यांपासून फरार असलेल्या मुख्य आरोपीला अमरावती गुन्हे शाखेने अखेर अटक केली आहे. या कारवाईमुळे शहरातील अंमली पदार्थांच्या अवैध व्यापाराला मोठा धक्का बसला असून आतापर्यंत या प्रकरणात ११ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

गुन्हे शाखेच्या पथकाने ८ मार्च २०२६ रोजी गुप्त माहितीच्या आधारे अब्दुल फहीम उर्फ फहिम एफ.बी. (वय २५, रा. आझाद नगर) आणि शेख अयान शेख रमजान (वय २०, रा. द्वारका नगर) या दोघांना ताब्यात घेतले होते. त्यांच्या ताब्यातून २ किलो ८० ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) अंमली पदार्थ, दुचाकी वाहन आणि इतर साहित्य असा एकूण ३ कोटी १२ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. या प्रकरणी नागपुरी गेट पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ११२/२०२६ अंतर्गत एनडीपीएस कायद्यातील विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान आरोपींनी हा अंमली पदार्थ मुंबईहून अमरावतीत विक्रीसाठी आणल्याची कबुली दिली होती. या नेटवर्कचा सूत्रधार गवळीपुरा येथील शेख जमीर उर्फ बाबा शेख आमद (वय ४१) असल्याचेही तपासात निष्पन्न झाले होते. मात्र गुन्हा उघडकीस आल्यानंतर शेख जमीर हा फरार झाला होता. त्याचा शोध सुरू असतानाच १ जुलै रोजी गुन्हे शाखेला तो आपल्या राहत्या घरी येणार असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून अतिशय शिताफीने त्याला ताब्यात घेतले आणि या गुन्ह्यात अटक केली. पोलिसांच्या माहितीनुसार, शेख जमीर उर्फ बाबा याच्याविरुद्ध अमरावती शहरात अंमली पदार्थांशी संबंधित विविध गुन्हे यापूर्वीही दाखल आहेत. अटकेनंतर त्याला २ जुलै रोजी न्यायालयात हजर करण्यात आले. या प्रकरणात आतापर्यंत एकूण ११ आरोपींना अटक करण्यात आली असून पोलिसांनी २ किलो २७१ ग्रॅम ३४० मिलीग्रॅम एमडी अंमली पदार्थ जप्त केला आहे. जप्त करण्यात आलेल्या एमडीची अंदाजित किंमत ३ कोटी ४० लाख ६९ हजार १०० रुपये असून इतर मुद्देमालासह एकूण ३ कोटी ५० लाख ३२ हजार १०० रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे.

शहरातील अंमली पदार्थांच्या साखळीचा पूर्णपणे पर्दाफाश करण्यासाठी तपास सुरू असून या रॅकेटशी संबंधित इतर व्यक्तींचा शोध घेतला जात आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेकडून सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (मुख्यालय व गुन्हे) प्रांजली सोनवणे, सहायक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. पोलीस निरीक्षक अतुल वर, दिनेश दहातोंडे आणि गुन्हे शाखेच्या पथकाने ही उल्लेखनीय कामगिरी बजावली.

## महाराष्ट्रात पावसाचा हाहाकार; मुंबईला दोन दिवस रेड अलर्ट

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये मुसळधार पाउस सुरू असून यामुळे सर्वसामान्य जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. राज्यातील संभाव्य पूरस्थिती आणि इतर कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी एनडीआरएफच्या पाचव्या बटालियनने महाराष्ट्र आणि गोव्यातील संवेदनशील जिल्ह्यांमध्ये आपली बचाव पथके पूर्वतयारी म्हणून तैनात केली आहेत. यामध्ये मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सांगली, सातारा, धाराशिव आणि नागपूर या जिल्ह्यांचा समावेश आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस राज्यातील अनेक भागांत जोरदार ते अतिजोरदार पावसाची शक्यता वर्तवली असून, नागरिकांना प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आणि कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

मुंबईत सलग चौथ्या दिवशी पावसाच्या जोरदार सरी कोसळत असून गेल्या २४ तासांत शहरातील काही भागांमध्ये १५० मिमीहून अधिक पावसाची नोंद झाली आहे. पावसाची ही वाढती तीव्रता आणि धोका लक्षात घेउन भारतीय हवामान विभागाने मुंबईसाठी पुढील दोन दिवसांचा अत्यंत महत्त्वाचा रेड अलर्ट जारी केला आहे. तत्पूर्वी, मुंबईसह ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यांसाठी शुक्रवारी ऑरेंज अलर्ट देण्यात आला होता. या भागांत काही ठिकाणी मध्यम ते मुसळधार पावसाच्या सरी कोसळत असून नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन हवामान विभागाने केले आहे. पावसाचा हा जोर पाहता मुंबई महानगरपालिकेने आपली संपूर्ण आपत्कालीन यंत्रणा हाय अलर्टवर ठेवली आहे.याच दरम्यान आज दुपारी २ वाजून १८ मिनिटांनी समुद्रात ४.२८ मीटर उंचीची मोठी भरती येण्याची शक्यता असल्याने सखल भागातील नागरिकांना आणि समुद्रकिनारी जाणा-या पर्यटकांना विशेष काळजी घेण्याचा इशारा देण्यात आला आहे. मुसळधार पाउस आणि समुद्राची भरती एकाच वेळी येण्याची शक्यता असल्याने मुंबईतील काही सखल भागांमध्ये पाणी साचण्याची आणि त्यामुळे वाहतुकीवर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. दुसरीकडे कोकणातही पावसाचा जोर कायम असून रत्नागिरी जिल्ह्यात गेल्या २४ तासांत सरासरी ६९ मिमी पावसाची नोंद झाली आहे.सतत सुरू असलेल्या या मुसळधार पावसामुळे राज्यातील प्रमुख नद्यांच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ झाली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातून वाहणा-या जगबुडी नदीची पातळी ४.९० मीटरपर्यंत पोहोचली आहे.



## आयएमए अमरावतीतर्फे राष्ट्रीय डॉक्टर दिन उत्साहात

**ज्येष्ठ डॉक्टरांचा गौरव व गुणवंत पाल्यांचा सत्कार**

**अमरावती/प्रतिनिधी-** इंडियन मेडिकल असोसिएशन, अमरावती शाखेतर्फे मंगळवार, दि. १ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता आयएमए हॉल येथे 'राष्ट्रीय डॉक्टर दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले ते अमरावतीच्या वैद्यकीय क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या ज्येष्ठ आयएमए सदस्यांचा सत्कार व आयएमए कुटुंबातील गुणवंत मुला-मुलींचा गौरव. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ डॉक्टर वसंत लुंगे उपस्थित होते. या कार्यक्रमात डॉ. बबन तोटे, डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी, डॉ. मोहना कुलकर्णी, डॉ. मदन अचालिया व डॉ. अरुणा अचालिया या ज्येष्ठ सदस्यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ सदस्यांनी आपल्या सेवाकाळातील आठवणी व अनुभव कथन करून उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी शैक्षणिक, क्रीडा व कला क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळवणाऱ्या मनश्री मेंढे, कनक चांदक, गुंजन राठी, सराई देशमुख, वेदांत खत्री, श्रिया राठी, आराध्य गुल्हाणे, शुताक्षी सोळंके, आर्यमन लेवटे, यश दातीर व दिया पाटील या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. मुलांच्या या कौतुकामुळे सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व संयोजन प्रकल्प प्रमुख डॉ. रुतिका लोखंडे व डॉ. अंशु चांडक यांनी उत्कृष्टपणे केले.

आयएमए अमरावतीचे अध्यक्ष डॉ. दिनेश वाघाडे व सचिव डॉ. विक्रम वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वी झाला. यावेळी डॉ. विजय कुथे ,डॉ. एस. के. पुंशी, डॉ. अलका कुथे,डॉ. संदीप दानखडे, डॉ. रोहन बोबडे, डॉ. सीमा अडवाणी, डॉ. भूपेश भोंड, डॉ. लक्ष्मी भोंड, डॉ. सौरभ लांडे, डॉ. प्रणित काकडे, डॉ. अक्षय चांदुरकर, डॉ. प्रसाद जावळकर यांच्यासह आयएमए अमरावतीचे अनेक ज्येष्ठ व तरुण सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉक्टर दिनाच्या या अनोख्या सोहळ्याने ज्येष्ठांचा सन्मान व नव्या पिढीला प्रोत्साहन देण्याचा दुहेरी उद्देश साध्य झाला, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

---

### -सायटेशन/जाहीरनामा-

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

**आर.एम.जे.सी.क्र.४०७/२०२६** — **ने.ता.१७.०८.२०२६**

अर्जदार -
१. श्री.सुरेश रामदास काळमेघ, **वय ४८ वर्षे, धंदा - शेती**
**रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती**
२. श्री.संजय रामदास काळमेघ, **वय ४४ वर्षे, धंदा - शेती**
३. सौ.शोभा दिपक कोडे, **वय ५६ वर्षे, धंदा - घरकाम**
**दोघेही रा.मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती**

-- विरुध्द --
कोणीही नाही

**वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदारांचे वडिल नामे** रामदास गणपतराव काळमेघ **हे** दिनांक ०७/१०/२०२२ **रोजी बेनोडा,ता.वरुड, जि.अमरावती येथे मरण पावलेले आहे. तसेच अर्जदाराची आई नामे** लिलाबाई रामदासजी काळमेघ **ही दिनांक** २०/१०/२०२१ **रोजी बेनोडा,ता.वरुड, जि.अमरावती येथे मरण पावलेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.**

दिनांक ०२.०७.२०२६

शिक्का

**आदेशान्वये,**
सहाय्यक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय, मोर्शी**

---

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.११८०/२०२६
अशोक व पाच वि.निरंक
पुढील ता.०३.०८.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार ः
१. अशोक देविदास उमाळे, **वय ७२ वर्षे, व्यवसाय - मजुरी**
**रा.२८, शोभा नगर, दुर्गा माता मंदिर, नांधरदाने क्लीनिक जवळ, व्ही.एम.व्ही. पोष्ट मागे, ता.जि.अमरावती**
२. राधिका रमेशराव चुने, **वय ६९ वर्षे, व्यवसाय - गृहिणी**
**रा.शिक्षक कॉलनी, चांदूर रेल्वे, अमरावती**
३. वंदना विजय डबरे, **वय ६६ वर्षे, व्यवसाय - गृहिणी**
**रा.संतोषी नगर, गल्ली नं.३, व्हीएमव्ही कॉलेज रोड, अमरावती**
४. प्रदीप देविदास उमाळे, **(मयत असल्यामुळे त्यांचे वारस)**
४-क) **श्रीमती जया प्रदीपराव उमाळे, वय ५७ वर्षे, व्यवसाय -गृहिणी**
४-ख) कुणाल प्रदीपराव उमाळे, **वय २५ वर्षे, व्यवसाय -मजुरी**
४-ग) कु.पल्लवी प्रदीपराव उमाळे, **वय २७ वर्षे, व्यवसाय -विद्यार्थीनी**
**(अर्जदार क्र.४-क, ४-ख,४-ग), रा.नारायण नगर जवळ, कठोरा रोड, ता.व जि. अमरावती- ४४४६०३**
५. किशोर देविदास उमाळे, **वय ६६ वर्षे, व्यवसाय - गृहिणी**
**रा.कठोरा रोड, रंगोली लॉन जवळ, १७**
**समता कॉलनी, व्हीएमव्ही, अमरावती**

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः [illegible]

**सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की,** मयत देविदास गणपतराव उमाळे **हे दि.०७.०८.२०१९ रोजी अमरावती येथे मयत झाले.** अर्जदार अशोक देविदास उमाळे व चार **यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

**त्यापेक्षा** अशोक देविदास उमाळे व चार **वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.**

**आज दि.**३०.०६.२०२६ **रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती**

---

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे, जि.अमरावती यांचे न्यायालय
जाहिरनामा

आर.एम.जे.सी.क्र.१४१/२०२६ — ने.ता.०४.०८.२०२६

अर्जदार -
१. साहेबराव उर्फ अनिरुध्द नारायणराव काळे,
**वय ६६ वर्षे, धंदा - शेती**
२. भाष्कर नारायणराव काळे, **वय ५५ वर्षे, धंदा- शेती**
**अर्जदार क्र. १ ते २ रा. नेकनानपुर, पो.सोनगांव, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती**

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

**या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की,** साहेबराव उर्फ अनिरुध्द नारायणराव काळे व इतर **यांनी दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर), चांदूर रेल्वे यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता** मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे भाग ८ कलम २ प्रमाणे **अर्ज दाखल केलेला आहे.**

**अर्जदाराचे असे म्हणणे आहे की,** नारायणराव मारोतराव काळे, **यांचा मृत्यू दिनांक ०७.०३.२००२ रोजी व** चंद्रकला उर्फ चंद्रकांता नारायणराव काळे, **यांचा मृत्यू दिनांक २१/०१/२०२२ रोजी मौजा नेकनानपुर, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथे झाला. अर्जदार यांचेशिवाय मयतांचे ईतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.**

**वरीलप्रमाणे सदर्हू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.**

**आज दि.०३ माहे जुलै २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहाय्यक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय, चांदूर रेल्वे**

---

### जाहीर सूचना

**माझे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन सर्वत्र लोकांना सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी** श्री.मनोज महादेव कुमरे, रा.पाचबंगला, बडनेरा, अमरावती, ता.जि.अमरावती, **यांचे कडून खालील वर्णनांकित स्थावर मालमत्ता विकत घेण्याचा सौदा केलेला आहे.**

स्थावर मालमत्तेचे वर्णन

**नोंदणी पोट तुकडी, अमरावती शहर कचेरीचे कक्षेतील व महानगरपालिका अमरावती चे हददीतील मौजे- जेवड, प्रगणे- बडनेरा, ता.जि.अमरावती येथील नंदनवन कॉलनी, दातेराव लेआउट, जुना बायपास रोड, अमरावती या भागातील** शेत सर्वे क्र.४२/२ **मधील जमिनीचे मा.उप विभागीय अधिकारी यांचे फाईल वरील रे.के.नं. एन.ए.पी.३४/ जेवड-४२/१९८३-८४, नि.ता. ३१/०७/१९८४ नुसार तसेच सहायक संचालक, नगररचना, मनपा अमरावती यांचे आदेश क्र. २५७४,दि.१७/१०/१९८३ नुसार मंजुर झालेल्या अभिन्यासातील** प्लॉट क्र.३५ याचे एकुण क्षेत्रफळ ३२२० चौ.फुट (२९९ चौ.मी.) **असून याची चर्तुःसिमा -**

| | |
|---|---|
| **पुर्वेस - सर्व्हीस लेन व नंतर डीपी रोड** | **पश्चिमेस - लेआउट मधील रस्ता** |
| **उत्तरेस - लेआउट मधील रस्ता** | **दक्षिणेस- प्लॉट नं. ३६** |

**यावर बांधलेले** संस्कार आनंद रेसिडेन्सी **मधील पहिल्या माळयावरील** फ्लॅट क्र.१०१ **याचे एकूण बिल्टअप क्षेत्रफळ ६७६.४८ चौ.फुट (६२.८७ चौ.मी.) याची चर्तुसिमा नकाशाप्रमाणे**

**वरील वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेवर कुणाचाही हक्क, गहाण, बोजा, हितसबंध, वारसा,हक्क, कर्ज, बक्षिस, बँकेचे कर्ज किंवा इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध किंवा कोणताही व्यवहार झाला असल्यास सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्यावर संपूर्ण कागदपत्रांसह व पुराव्यासह लेखी हरकत नोंदवावी. दिलेल्या कालावधी नंतर सदर मालमत्तेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा अधिकार किंवा उजर चालणार नाही व माझे पक्षकार वर वर्णन केलेली स्थावर मालमत्ता खरेदी करुन घेण्यास मोकळे राहतील याची नोंद घ्यावी.**

**करिता सदर जाहीर सुचना प्रकाशित करीत आहे.**

दिनांक ०३/०७/२०२६
अमरावती

सही /-
ॲड. अभिजीत बी.बजाज
**नमुना गल्ली नं.५, अमरावती**
**मो.-०९४०५८८३६६३/०९५११९३०९९९**

---

### -सायटेशन/जाहीरनामा-

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.३९७/२०२६ — ने.ता.१७.०८.२०२६

अर्जदार -
१. श्रीमती अनुश्री ओमप्रकाश ठाकरे, **वय ४० वर्षे, धंदा - घरकाम**
२. कु.संचिता ओमप्रकाश ठाकरे, **वय १८ वर्षे, धंदा - शिक्षण**
३. अथर्व ओमप्रकाश ठाकरे, **वय १४ वर्षे, धंदा - शिक्षण**
४. श्रीमती छाया ज्ञानेश्वर ठाकरे, **वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम**
**अर्जदार नं.३ करिता अ.पा.क. आई अर्जदार नं.१**
**सर्व रा.निंभी, ता.मोर्शी, जि. अमरावती**

-- विरुध्द --
कोणीही नाही

**वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं. २ व ३ चे वडिल तर अर्जदार नं.४ चा मुलगा नामे** ओमप्रकश ज्ञानेश्वर ठाकरे हे दिनांक ०१/०४/२०२६ **रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती, ता.जि.अमरावती येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.**

दिनांक ०२.०७.२०२६

शिक्का

**आदेशान्वये,**
सहाय्यक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय, मोर्शी**

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# रंगभूमीच्या विजयाबाई

विजया मेहता यांच्या निधनाने रंगभूमीचे मोठे नुकसान झाले आहे. व्यावसायिक रंगभूमीच्या साच्यातून बाहेर पडून नाटकाला आधुनिक विचारांची दिशा देण्याचे धाडस दाखवणाऱ्या पिढीचा त्या सर्वाधिक प्रभावी चेहरा होत्या.

त्यांनी मराठी रंगभूमीला जागतिक नाट्यपरंपरेची ओळख करून दिली. बर्टोल्ट ब्रेख्त, आयोनेस्को, बेकेट यांच्यासारख्या नाटककारांच्या अभ्यास करून त्यांनी त्यांचा आशय भारतीय संदर्भात नव्याने सादर केला. मात्र त्यांची कधीही पाश्चात्य रंगभाषेचे अंधानुकरण केले नाही. भारतीय लोकपरंपरा, संस्कृत नाट्यपरंपरा आणि मराठी संस्कृती यांच्या आधारावर त्यांनी आधुनिक रंगभाषा उभी केली. म्हणूनच त्यांच्या प्रयोगांमध्ये जागतिकतेचा विस्तार आणि स्थानिकतेची उब एकाच वेळी अनुभवायला मिळते. दिग्दर्शिका म्हणून त्यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे कलाकारांवरील विश्वास. त्यांनी नेपथ्य, प्रकाशयोजना किंवा तांत्रिक चमत्कारापेक्षा अभिनेत्याच्या अंतःशक्तीवर भर दिला. त्यांच्या तालमी कठोर असत; पण त्या कलाकाराला मोडण्यासाठी नव्हे, तर घडवण्यासाठी असत. संवाद पाठ करून रंगमंचावर उभे राहणे हा अभिनय नाही, तर पात्राच्या मनात प्रवेश करून त्याचे जगणे प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणे म्हणजे अभिनय, ही शिकवण त्यांनी अनेक पिढ्यांना दिली. त्यांच्या हातून घडलेले अनेक कलाकार पुढे भारतीय रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील महत्वाचे चेहरे ठरले. 'रावसाहेब' आणि 'पेस्टनजी' सारख्या चित्रपटांमधून त्यांनी मानवी नात्यांचे सूक्ष्म, वास्तववादी चित्रण केले. 'पार्टी' मधील त्यांच्या भूमिकेला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्तम अभिनेत्रीचा गौरव प्राप्त झाला. दिग्दर्शिका, अभिनेत्री, निर्माती आणि प्रशिक्षक अशा विविध भूमिकांमध्ये त्यांनी आपली कलात्मक उंची कायम ठेवली. त्यांच्या कार्याला अनेक सन्मान लाभले. संगीत नाटक अकादमी पुरस्कार, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, टागोर रत्न यांसह अनेक प्रतिष्ठेचे गौरव त्यांच्या वाट्याला आले. पण त्यांचा खरा पुरस्कार कोणता, असा प्रश्न विचारला तर उत्तर पुरस्कारांच्या यादीत नाही, तर त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये, त्यांच्या प्रयोगांमध्ये आणि बदललेल्या रंगसंस्कृतीत आहे. आज मराठी रंगभूमी एका वेगळ्या वळणावर उभी आहे. व्यावसायिकतेची वाढती ओढ, डिजिटल माध्यमांनी प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. प्रयोगशिलतेचा अर्थ अनेकदा केवळ तांत्रिक आकर्षण किंवा धक्कातंत्र असा घेतला जातो. अशा वेळी विजया मेहता यांचे कार्य नव्याने वाचण्याची गरजेचे आहे. त्यांनी शिकवले की प्रयोग म्हणजे परंपरेचा नकार नव्हे, तर परंपरेची संवाद साधून नवे सत्त्व शोधणे. आधुनिकता म्हणजे केवळ विदेशी प्रभाव नव्हे, तर स्वतःच्या संस्कृतीकडे नव्या नजरेने पाहण्याची क्षमता आहे. विजयाबाईंचे आयुष्य आपल्याला आणखी एक महत्वाचा धडा देते. कला हा प्रतिष्ठेचा शॉर्टकट नाही, तर आयुष्यभराची साधना आहे. रंगभूमीवर उभे राहण्यासाठी वाचन, चिंतन, निरीक्षण आणि शिस्त आवश्यक असते. आज निधनानंतर अनेकजण त्यांना श्रद्धांजली वाहत आहेत. ती आवश्यकही आहे; परंतु केवळ श्रद्धांजली पुरेशी ठरणार नाही. त्यांच्या स्मृतीचे खरे स्मारक उभारायचे असेल, तर मराठी रंगभूमीने पुन्हा अभ्यास, शिस्त, संवेदनशीलता आणि वैचारिक धैर्य यांचा स्वीकार केला पाहिजे. नवीन पिढीने त्यांच्या आत्मचरित्राचा, मुलाखतींचा, नाट्यवृत्तींचा आणि प्रयोगांचा अभ्यास केला पाहिजे. कारण त्या केवळ इतिहास नाहीत, तर त्या भविष्याचीही दिशा आहेत. काही व्यक्तिमत्वे त्यांच्या काळापुरती मर्यादित नसतात. ती पुढील अनेक दशकांचे विचार घडवतात. विजयाबाई अशाच व्यक्तिमत्वापैकी एक होत्या. त्यांनी रंगभूमीला आधुनिकता दिली; पण मूल्यांपासून तोडले नाही. त्यांनी कलाकार घडवले; पण व्यक्तिमत्वावर स्वतःची सावली पडू दिली नाही. त्यांनी नाटककलेला प्रतिष्ठा दिली; पण कलेला कुधीही अहंकाराचे रूप दिले नाही. त्यांच्या जाण्याने एक खुर्ची रिकामी झाली आहे; पण त्यांनी घडवलेली परंपरा अजूनही उभी आहे. विजयाबाईंनी केवळ नाटकाने दिग्दर्शन केले नाही, तर रंगभूमीचा विचार बदलण्याचे काम केले. अभिनय, नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत, संवाद आणि रंगभाषा यांचा एकत्र विचार करून त्यांनी मराठी नाट्यविश्वासाला आधुनिकतेची नवी दिशा दिली. त्यामुळे त्या केवळ यशस्वी दिग्दर्शक नसून मराठी रंगभूमीच्या वैचारिक परिवर्तनाच्या महत्वाच्या शिल्पकार ठरतात. पारंपरिक व्यावसायिक रंगभूमीच्या चौकटीत न अडकता विजयाबाईंनी जागतिक रंगपरंपरा, भारतीय लोकनाट्य आणि आधुनिक नाट्यशास्त्र यांचा सखोल अभ्यास केला. हा अभ्यास त्यांच्या प्रत्येक निर्मितीमध्ये जाणवतो. त्यांच्यासाठी नाटक म्हणजे केवळ मनोरंजन नव्हते तर सामाजिक वास्तव, मानवी मन आणि सांस्कृतिक मूल्यांचा शोध घेणारे प्रभावी माध्यम होते. त्यांच्या दिग्दर्शनाची सर्वाम मोठी वैशिष्ट्ये म्हणजे संयम आणि सूक्ष्मता. अनेक दिग्दर्शक भव्य नेपथ्य किंवा आकर्षक तांत्रिक साधनांवर भर देतात; परंतु विजयाबाईंनी कलाकाराचा अभिनय आणि कथानकाची अंतःशक्ती यांना केंद्रस्थानी ठेवले. त्यामुळे त्यांच्या नाटकांमधून बाह्य दिखाव्यापेक्षा आशय अधिक प्रभावी ठरतो. पात्रांच्या मनातील संघर्ष, त्यांच्या नातेसंबंधातील गुंतागुंत आणि सामाजिक परिस्थितीचे वास्तववादी चित्रण हे त्यांच्या दिग्दर्शनाचे ठळक वैशिष्ट्य मानले जाते. मराठीतील प्रायोगिक रंगभूमीच्या उभारणीत त्यांचे योगदान मोलाचे आहे. व्यावसायिक यशाच्या पलीकडे जाऊन प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडणारी नाटके त्यांनी सादर केली. जगभरातील श्रेष्ठ नाटककारांच्या साहित्याचा अभ्यास करून त्यांनी त्यातील आशय भारतीय आणि मराठी संदर्भात समजावून सांगितला. त्यामुळे मराठी प्रेक्षकांना जागतिक नाट्यसाहित्याची ओळख झाली आणि रंगभूमीची अभिव्यक्तीला नवे परिमाण मिळाले. कलाकार अनुभवाने असो किंवा नवोदित; प्रत्येकाच्या व्यक्तिमत्वातील वैशिष्ट्य ओळखून त्यातून सर्वोत्तम अभिनय कसा घ्यावा, हे त्यांना उत्तमप्रकारे अवगत होते. त्यांच्या तालमीत अभिनय हा केवळ संवाद म्हणण्याचा प्रकार राहत नाही, तर तो शरीरभाषा, आवाज, शांतता, हालचाली आणि भावविश्व यांचा समन्वित अनुभव बनतो. त्यामुळे त्यांच्या हातून घडलेले अनेक कलाकार पुढे मराठी आणि हिंदी रंगभूमी तसेच चित्रपटसृष्टीत उल्लेखनीय ठरले.

# त्रिस्तरीय पंचायती राज अन् वसंतराव नाईक यांची दूरदृष्टी

यशवंतराव चव्हाण हे १९५६ मध्ये संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यावेळेपासून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाच्या रचनेचा पायाभरणी सुरू झाली. १९५८ मध्ये मुंबई ग्रामपंचायत अधिनियम अस्तित्वात आले. राज्य पुनर्रचना कायदा १९५६ च्या आधारे राज्यासाठी सीमा निश्चित केल्या. मुंबईसह महाराष्ट्राच्या निर्मितीसाठीचा लढा सर्वज्ञात आहे, राज्याच्या निर्मितीसाठी सुमारे १०६ जण हुतात्मा झाले. आणि त्यानंतर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापन झाली. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची रचना यथायोग्य आणि दीर्घकालीन असण्यासाठी धोरणांची आणि दूरदर्शी नीतीची गरज होती, यामध्ये स्व. वसंतराव नाईक यांचे योगदान अमूल्य होते, हे स्मरणात ठेवावेच लागेल. वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन झाली. त्यानंतरच्या ग्रामविकासाच्या पायाभरणीचा इतिहास आजच्या लोकप्रतिनिधींना आणि ग्रामपंचायत सदस्यांना अवगत असणे महत्वाचे आहे.

### गावापर्यंत लोकशाही आणि अधिकारांचे विकेंद्रीकरण

स्वातंत्र्यानंतर भारतापुढे एक मूलभूत यक्षप्रश्न उभा होता, की लोकशाही केवळ संसद आणि विधानसभेपर्यंत मर्यादित राहिली, तर ती खरी लोकशाही ठरेल का? देशाची सत्तर टक्क्यांहून अधिक लोकसंख्या गावांमध्ये राहत होती. त्यामुळे गावापर्यंत विकासाचे अधिकार आणि निर्णय प्रक्रिया पोहोचविणे ही केवळ एक कल्याणकारी योजना नव्हती, ती एक घटनात्मक जबाबदारी होती. भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद ४० मध्ये राज्याने ग्रामपंचायतींची स्थापना करून त्यांना स्वशासनाचा पाया बनवावे, असे मार्गदर्शक तत्व समाविष्ट करण्यात आले होते. परंतु हे तत्व कायद्याने बंधनकारक नसल्यामुळे ग्रामीण स्वराज्याचा प्रश्न दशकानुदशके प्रलंबित राहिला. पुढे १९९२ मध्ये ७३ च्या घटनादुरुस्तीने या प्रश्नाला घटनात्मक अधिष्ठान दिले, ११ वी अनुसूची जोडून २९ विषयांची यादी पंचायतीकडे सोपवली आणि ग्रामसभेला वैधानिक अस्तित्व दिले. परंतु या ऐतिहासिक ७३ च्या घटनादुरुस्तीची वैचारिक आणि संस्थात्मक पायाभरणी महाराष्ट्रात कोणी केली? याचे उत्तर शोधताना आपल्याला वसंतराव नाईक यांच्या दूरदृष्टीकडे वळावे लागते. १ मे १९६० रोजी नव्या महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी राज्याच्या निर्मितीनंतर अवघ्या काही आठवड्यांत, २२ जून १९६० रोजी तत्कालीन महसूलमंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय लोकशाही विकेंद्रीकरण समिती नेमली. या समितीने अवघ्या नऊ महिन्यांत, १५ मार्च १९६१ रोजी आपला ऐतिहासिक अहवाल सादर केला. या अहवालाचा गाभा असा होता, की ग्रामीण विकासाचे नियोजन विभागनिहाय न करता ते जिल्हानिहाय करण्यात यावे आणि जिल्हा परिषदेला केवळ सल्लागार यंत्रणा न ठेवता



'शेती मोडली तर लोकशाही मोडेल,' हे ऐतिहासिक आणि अत्यंत मार्मिक वाक्य उच्चारणारे वसंतराव नाईक यांच्या सारखा नेता कोणत्याही भिंतीच्या विचारशाळेत तयार झालेला नव्हता. वसंतराव नाईक स्वतः मातीतून आले होते, मातीसाठी जगले. त्यांनी उभारलेल्या संस्था, राबविलेल्या योजना आणि मांडलेले कृषी, प्रशासकीय विचार आजही महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाचे मुख्य आधारस्तंभ आहेत.

ग्रामीण विकासाची सर्वोच्च कार्यकारी संस्था बनविण्यात यावे.

### त्रिस्तरीय रचना आणि वैधानिक रूप

नाईक समितीच्या शिफारशीवरून 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१' तयार झाला. १ मे १९६२ पासून हा कायदा अंमलात आला आणि महाराष्ट्रात ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद अशी त्रिस्तरीय, बळकट व्यवस्था अस्तित्वात आली. ७३ च्या घटनादुरुस्तीने ज्या २९ विषयांची यादी (कृषी, लघुसिंचन, पशुसंवर्धन, प्राथमिक शिक्षण, ग्रामीण आरोग्य इ.) १९९२ मध्ये देशाला दिली, ते सर्व विषय महाराष्ट्राने तीन दशके आधीच वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदेच्या छत्राखाली आणले होते. 'विकास हा जनतेच्या सहभागाशिवाय शक्य नाही आणि जनतेचा सहभाग संस्थांशिवाय टिकू शकत नाही,' हा नाईक यांचा विचार या रचनेचा आत्मा होता.

### हरितक्रांतीचे जनकत्व आणि संस्थात्मक पाया

वसंतराव नाईक हे केवळ प्रशासकीय रचनेचे शिल्पकार नव्हते, तर ते महाराष्ट्राच्या हरितक्रांतीचे, श्वेतक्रांतीचे आणि रोजगार हमी योजनेचे जनक होते. राज्याचे मुख्यमंत्री पद सांभाळताना त्यांनी घेतलेले निर्णय आणि उभारलेल्या संस्था पुढीलप्रमाणे आहेत.

■ **कृषी विद्यापीठांची स्थापना :** शेतकऱ्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी त्यांनी एकाच वेळी राज्यात चार कृषी विद्यापीठे स्थापन केली. ही दूरदृष्टी आजच्या कृषी संशोधनाचा पाया आहे.

■ **महाबीज व कापूस एकाधिकार :** बियाण्यांच्या बाबतीत राज्याला स्वावलंबी करण्यासाठी १९७१ मध्ये 'महाबीज'ची (महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ) स्थापना केली. तसेच व्यापार-यांच्या शोषणातून शेतक-यांची मुक्तता करण्यासाठी 'कापूस एकाधिकार खरेदी योजना' आणली, ज्याला शरद जोशी यांनीही त्यांची उल्लेखनीय कामगिरी मानले आहे.

■ **रोजगार हमी योजना व जलसंधारण :** १९७२ च्या भीषण दुष्काळात ग्रामीण जनतेला जगण्यासाठी त्यांनी 'रोजगार हमी योजने'ची संकल्पना राबवली, ज्याचे रूपांतर पुढे राष्ट्रीय स्तरावर 'मनरेगा'मध्ये झाले. दुष्काळावर मात करण्यासाठी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा मूलमंत्र देत त्यांनी 'वसंत बंधारे' आणि पाझर तलावांची मालिका निर्माण केली. वि. स. पागे यांचा यामध्ये सिंहाचा वाटा होता.

### आजच्या संदर्भातील चिकित्सक दृष्टिकोन

अवघ्या नऊ महिन्यांत, १५ मार्च १९६१ रोजी, समितीने अहवाल सादर केला. या अहवालातील मूलभूत विचार असा होता, की ग्रामीण विकासाचे नियोजन विभागनिहाय न करता जिल्हा निहाय करण्यात यावे. जिल्हा परिषदेला केवळ सल्लागार संस्था न ठेवता ग्रामीण विकासाची प्रमुख कार्यकारी संस्था बनविण्यात यावे. नाईक समितीचे ऐतिहासिक योगदान वसंतराव नाईक समितीने केवळ त्रिस्तरीय रचना सुचविली नाही; त्या रचनेत एक नवा प्राण ओतला. त्यांनी सांगितले, की ग्रामपंचायत ही लोकसहभागाचा पाया असेल. त्याच्याकडे ११ च्या अनुसूचीशी सुसंगत (महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम मधील ग्रामसूचीतील ७८ विषय) असे ग्रामीण स्तरावरील विकासाचे विषय असतील आणि प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी ग्रामसेवकाची व्यवस्था असेल. पंचायत समिती ही तालुका स्तरावरील विकास समन्वयाची कार्यकारी संस्था असेल. गटविकास अधिकारी तिचा प्रशासकीय प्रमुख असेल. जिल्हा परिषदही ग्रामीण विकासाचे नियोजन आणि अंमलबजावणी करणारी सर्वोच्च लोकनिवाचित संस्था असेल. मुख्य कार्यकारी अधिकारी हा व्यवसायिक प्रशासन सांभाळेल, तर लोकनियुक्त अध्यक्ष धोरणात्मक दिशा देतील. हे तत्व म्हणजे लोकशाही आणि प्रशासन यांचा संस्थात्मक समतोल. ७३ च्या घटनादुरुस्तीने नंतर हाच समतोल संपूर्ण देशाला सांगितला. संस्था आहेत, पण आत्मा कुठे आहे? वसंतराव नाईक यांनी कृषी विद्यापीठे उभारली, महाबीज दिले, जिल्हा परिषदा सक्षम केल्या. आज या संस्था भौतिकदृष्ट्या अस्तित्वात आहेत, परंतु कृषी विद्यापीठांमधून बाहेर पडणाऱ्या हजारो पदवीधरांचे पाय शेतीकडे वळतात की शहरांकडे? महाबीजच्या बियाण्यांवरील शेतक-यांचा विश्वास आज किती टिकून आहे? जिल्हा परिषदा ग्रामीण विकासाचे केंद्र राहिल्या आहेत, की केवळ प्रादेशिक राजकारणाचा आखाडा बनल्या आहेत? 'संस्था हे साधन आहे, साध्य नव्हे' हा त्यांचा विचार आपण विसरत चाललो आहोत का, हा आजचा मुख्य प्रश्न आहे.

**डॉ. सुमंत पांडे**
९७६४००६६९३
(माजी कार्यकारी संचालक, जलसाक्षरता केंद्र, यशदा, पुणे)

# सदैव तरुण राहा : स्वामी विवेकानंद



भारतीय संस्कृतीची आणि हिंदु परंपरेची ओळख जगभरात पसरवणारे स्वामी विवेकानंदाची आज पुण्यतिथी आहे. स्वामी विवेकानंद आपल्या गुरुंच्या उपदेशाबद्दल सांगतात, की जोपर्यंत कोणताही तरुण जिवंत आहे, तोपर्यंत त्याच्यात काहीतरी नवीन शिकण्याची उमेद असते. जोपर्यंत नवीन शिकण्याची इच्छा असते, तोपर्यंत त्याचा विकास सुरु असतो. मात्र नवे काही शिकण्याची इच्छा संपुष्टात आली, की त्या तरुणाला चालते-फिरते शव समजावे. हीच गोष्ट प्रत्येक समाजाला लागु पडते, जो समाज नव्या गोष्टी स्वीकारुन, शिकुन त्यानुसार बदल घडवतो. त्या समाजाचे अस्तित्व कायम टिकुन राहते. नवीन शिकणे नाकारल तर त्या समाजात अनेक समस्या निर्माण होऊन तो अध:पतनाकडे जातो. म्हणुनच आपण सतत नवीन शिकत राहिलं पाहिजे.

तुम्हाला अल्पावधीत मोठे ध्येय गाठायचे असेल तर शिकण्याची कला अवगत करायला हवी. शिकणे कधीही टाळु नये. शिकण्याची कला आत्मसात करण्यासाठी प्रथम शरीराला प्रशिक्षित करावे लागेल. तुमचा इंद्रियावर ताबा असेल तरच तुम्ही कमी वेळेत जास्तीत जास्त शिकु शकता. जे तरुण काळाबरोबर स्वत:त बदल घडवून प्रत्येक नवीन वस्तु हाताळणे शिकतात, ते भविष्यात येणाऱ्या नवनव्या गोष्टी शिकायला नेहमी तत्पर असतात. जो मनुष्य काळाबरोबर येणाऱ्या नव्या वस्तुंचा उपयोग करणे शिकु शकत नाही, तो भविष्यात नेहमी मागे पडतो. म्हणुनच काळाबरोबर बदलत जाऊन स्वत:ला उच्च प्रशिक्षण देणें आवश्यक आहे.

स्वामी विवेकानंद म्हणत, 'कोणतीही गोष्ट किंवा कला नाकारण्यापेक्षा ती शिकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येक तरुणात काही तरी नवीन शिकण्याची इच्छा आयुष्यभर टिकुन राहिली पाहीजे. शिकल्यामुळे केवळ आपले पुर्वग्रहच नष्ट होत नाहीत तर भावी आयुष्यासाठी सुध्दा ते फायदेशीर ठरते'. आपण स्वत:च्या जीवनाचं अवलोकन केल तर लक्षात येईल, की अडचणीमुळेच आपण नवे काही तरी शिकू शकतो आणि यशस्वीही होतो. हल्लीच्या तरुण वर्गात अशी प्रवृत्ती निर्माण झाली आहे, की त्यांच्या यशाच्या मार्गात अडचण निर्माण झाल्याशिवाय तो काहीही शिकत नाही. परंतु या अडचणीच त्यांच्या प्रगतीला कारणीभुत ठरतात. युवकांच्या जीवनात समस्या आल्या तर ते त्यातुन बाहेर पडण्यासाठी नवनव्या पद्धतीनं विचार करु शकतात. मात्र काही तरुण असेही असतात, जे जीवनापासुन धडे घेऊच इच्छित नाहीत, यश प्राप्त करण्यासाठी ते नेहमी शॉर्टकट वापरतात. अशा युवकांना थोड काळासाठी यश मिळाले तरी ते दिर्घकाळ टिकत नाही. मग यश मिळवण्यासाठी ते पुन्हा दुसरा एखादा शॉर्टकट शोधु लागतात, या पद्धतीने ते कधीही पुर्णपणे यशस्वी होत नाहीत.

'शिकणे शिका' हे यशाचे सुत्र वापरुन प्रत्येक तरुण यशस्वी जीवन जगु शकतो. चला तर मग आजपासुनच ... नव्हे आतापासुनच शिकायला सुरुवात करु या. जगाला विश्व बंधुत्वाची शिकवण देणाऱ्या स्वामी विवेकानंद यांना स्मृतीदिना निमीत्त शत शत नमन!

**डॉ. विजय बाबर**
वर्धा, मो. ९४२३११८८०६

## वाशीम प्रकरणातून पोलीस बोध घेतील का ?

यापूर्वी कोणत्याही गुन्ह्याची नोंद नसलेल्या बेग्या पवार या पारधी समाजातील तरुणाला चोरीच्या गुन्ह्यात संशयित म्हणून ताब्यात घेऊन त्याला केलेल्या बेदम मारहाणीत त्याचा मृत्यू झाल्याप्रकरणी वाशीम सत्र न्यायालयाने दिलेल्या निकालात पोलीस ठाणे प्रमुखासह ९ पोलिसांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. गुन्हा कबूल करण्यासाठी बेदम मारहाण करण्याची पोलिसांची पद्धत काही नवीन नाही. पोलिसांच्या मारहाणीत याआधीही निष्पापांचा बळी गेला आहे तर काही कायमचे जायबंदी झाले आहेत. बेग्या पवार प्रकरणात स्थानिकांनी आणि समाजातील लोकांनी प्रशासनावर दबाव आणल्यामुळे उशिरा का होईना न्याय मिळाला असेच म्हणावे लागेल. एखाद्या गुन्ह्यात खरा गुन्हेगार सापडत नाही आणि वरिष्ठांकडून दबाव आणला जात असेल तर पोलिसांकडून एखाद्या निष्पापाला किंवा कच्चा कैद्याला बळीचा बकरा बनवले जाते हे आपण चित्रपटांतून आणि गुन्हेविषयक मालिकांतून यापूर्वीही पाहिले आहे. आपली प्रतिष्ठा राखण्यासाठी आणि अपयश झाकण्यासाठी एखाद्या निष्पापाचे आयुष्यही उध्वस्त केले जाते. बेग्या पवारचे लग्न होऊन एक वर्षही झाले नव्हते. पोलिसांच्या मारहाणीत मुलाचा कोठडीतच मृत्यू झाल्याचे कळल्यावर बेग्या पवारच्या आईवडिलांवर दुःखाचा डोंगरच कोसळला. मुलाच्या मृत्यूची रिसोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी गेल्यावर त्यांची तक्रारही प्रविष्ट करून घेण्यात आली नाही. स्थानिकांनी याविरोधात मोर्चे काढले, आंदोलने केली तेव्हा कुठे बेग्या पवारच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले ज्यामध्ये अतिमारहाणीमुळे त्याची शरीरातील बरीच हाडे मोडल्याचे लक्षात आले. वाशीम सत्र न्यायालयाने दिलेला निकाल पोलिसांच्या दडपशाहीला दिलेली सणसणीत चपराक असून यातून बोध घेऊन पोलीस आपल्या तपास पद्धतीत यापुढे तरी सुधारणा करतील का?

**जगन घाणेकर**

## महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक गेम चेंजर ठरणार?

पुरुषप्रधान संस्कृतीमुळे गाव खेड्यात राबणाऱ्या महिलांवर कायम अन्याय होत आला. शेतात राबणाऱ्या महिलांकडे कायम शेतमजूर म्हणूनच पाहिले जात होते. महिलांच्या नावांवर शेतजमीन असण्याचे प्रमाण अगदीच नगण्य आहे. त्यामुळे महिलांना शेतकरी म्हणून ओळख मिळणे कठीण झाले होते. हिचं बाब लक्षात घेऊन विद्यमान सरकारने महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६ एकमताने मंजूर करुन सर्वात मोठा आणि ऐतिहासिक निर्णय पावसाळी अधिवेशनात घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आता शेती करणाऱ्या आणि शेतीपूरक संलग्न व्यवसायाशी संबंधित महिलांना स्वतंत्र शेतकरी म्हणून दर्जा मिळणारं आहे. विशेष म्हणजे महिलांच्या नावांवर शेतजमीन नसली तरीही ग्रामपंचायत आणि नगरपंचायतीच्या सर्वसाधारण सभेत मान्यता मिळाल्यानंतर महिलांना सहाय्यक कृषी अधिकाऱ्याकडून शेतकरी प्रमाणपत्र दिले जाणार असल्याचे कृषिमंत्र्यांनी विधानसभेत सांगितले. त्यामुळे या विधेयकाला आणखीन बळ मिळाले आहे महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने घेतलेला निर्णय स्वागतार्ह असून तो ऐतिहासिक ठरणार आहे.

**राजू जाधव**

## एनसीएमसी कार्डाची मुदत वाढविणे जरुरीचे

राज्य परिवहन महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी महिला, जेष्ठ नागरिक यांना नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड १ ऑगस्टपासून अनिवार्य होणार आहे. पुणे तसेच इतर विभागात हे कार्ड काढण्यासाठी मोठी धावपळ सुरु झाली आहे. वेळेत कार्ड न मिळाल्यास सवलतीने मुकावे लागेल. मुदतीनंतर ज्या प्रवाशाकडे हे कार्ड नसेल त्यांना सवलतीचा लाभ घेता येणार नाही. अनेक केंद्रावर गर्दी दिसून येत आहे आधार कार्ड द्वारे नोंदणी करणेनोंदणी झाल्यानंतर कार्ड प्रिंटिंग साठी पाठविले जाते कार्ड प्रिंटिंग होऊन येईपर्यंत सुमारे १५ दिवस लागतात त्यानंतर कार्डासाठी सुद्धा अनेक दिवस जातात. अनेक जेष्ठ नागरिक व महिला यांची अजून कार्ड काढावयाची आहेत. अशा परिस्थितीत कार्ड लाभाची मुदत १ ऑगस्ट जी आहे ती पुढील दोन महिने वाढवावी तरच त्याचा लाभ घेता येईल, राज्य परिवहन मंत्र्यांनी याचा विचार करावा.

**शांताराम वाघ**

## शेतकरी संघटना:व्यापक सामाजिक विचार

### चिंतन

शेतकरी संघटनेचा विचार हा केवळ शेतीवर अवलंबून असले ल्या समाजाच्या तात्का लिक हिताचा विचार नाही. तो संपूर्ण मानवजातीच्या उत्क्रांतीचा, स्वातंत्र्याचा आणि सन्मानाने जगण्याच्या अधिकारा चा विचार आहे. मानवाच्या इतिहासात काळानुसार अनेक सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अडथळे निर्माण झाले.

त्या अडसरांमुळे माणसा च्या स्वातंत्र्यावर बंधने आली. अशा प्रत्येक अडथळ्याचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करून, माणसाला 'माणूस म्हणून' जगण्याचा मार्ग मोकळा करणे, हीच शेतकरी संघटनेच्या विचारसरणीची मूलभूत दिशा आहे.

शेतकरी संघटनेचा विचार हा केवळ शेती, पीक किंवा उत्पादनापुरता मर्यादित नाही; तर तो आर्थिक स्वातंत्र्य, मुक्त बाजारपेठ, न्याय्य हक्क, समान संधी आणि व्यक्तिस्वातंत्र्य या मूल्यांवर आधारलेला व्यापक सामाजिक विचार आहे. समकालीन परिस्थितीचा भावनेपेक्षा वास्तवाच्या कसोटा 'वर अर्थ लावणे, बदलत्या काळातील आव्हाने ओळखणे आणि त्यावर तर्कसंगत भूमिका मांडणे ही शेतकरी संघटनेची सर्वात मोठी ताकद आहे. म्हणूनच हा विचार आजही तितकाच प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे.

'शेतकरी मुक्त झाला तरच देश खऱ्या अर्थाने समृद्ध आणि स्वतंत्र होईल.' -युगात्मा शरद जोशी

**विलास तुळशीराम ताथोड**

शनिवार, दि. ४ जुलै २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# पेपर फुटीविरोधात छात्र भारतीचा एल्गार..!

## भर पावसात मुख्यमंत्र्यांना निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. ३ : राज्यातील स्पर्धा परीक्षा आणि पात्रता परीक्षांमधील वाढत्या गैरप्रकारांविरोधात छात्र भारती संघटनेने शुक्रवारी भर पावसात शेकडो विद्यार्थ्यांसह आंदोलनात्मक पवित्रा घेत तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर केले. NEET व TET पेपरफुटीची उच्चस्तरीय चौकशी, दोषींवर कठोर कारवाई, तसेच MPSC पूर्व परीक्षा ऑनलाइन घेण्याचा निर्णय तातडीने रद्द करावा, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली.**






निवेदनात म्हटले आहे की, पेपरफुटीच्या वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ सुरू असून शासनाने अद्यापही प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना केलेल्या नाहीत. वर्षानुवर्षे मेहनत करणाऱ्या ग्रामीण, गरीब व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांच्या विश्वासाला तडा गेला असून परीक्षा व्यवस्थेची विश्वासार्हताच धोक्यात आली आहे. संघटनेने NEET आणि TET पेपरफुटीची CBI अथवा न्यायालयीन चौकशी करून संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश करावा आणि दोषींवर मोक्का अंतर्गत कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तसेच MPSC पूर्व परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेतल्यास ग्रामीण भागातील इंटरनेट, वीज व तांत्रिक सुविधांच्या अभावामुळे हजारो विद्यार्थ्यांवर अन्याय होईल. त्यामुळे पूर्वीप्रमाणेच OMR आधारित ऑफलाइन परीक्षा घेण्याची मागणीही करण्यात आली. याशिवाय भविष्यात कोणत्याही शासकीय किंवा स्पर्धा परीक्षेत पेपरफुटी व गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी 'पेपरफुटीविरोधी कठोर कायदा' तातडीने लागू करण्याची मागणी संघटनेने केली. मुसळधार पावसाची पर्वा न करता विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाने परीक्षा व्यवस्थेतील भ्रष्ट प्रवृत्तींवर त्वरित कारवाई करावी, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही छात्र भारतीने दिला.

# MPSC धोरणा विरोधात यवतमाळात विद्यार्थ्यांचा महामोर्चा

## 'नॉर्मलायझेशन' रद्द करा, परीक्षा MPSC मार्फतच ऑफलाईन घ्या

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ३ :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) बदलत्या परीक्षा धोरणांविरोधात आणि ऑनलाईन परीक्षा तसेच 'नॉर्मलायझेशन' पद्धतीच्या विरोधात शुक्रवारी यवतमाळमध्ये स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व महामोर्चा काढत तीव्र संताप व्यक्त केला.




जिल्हाभरातून आलेल्या हजारो विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या सहभागामुळे शहरातील प्रमुख मार्ग घोषणांनी दणाणून गेले. हातात मागण्यांचे फलक, बॅनर आणि घोषणाबाजी करत विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली."परीक्षा TCS-IBPS नव्हे, MPSC मार्फतच ऑफलाईन घ्या", "नॉर्मलायझेशन रद्द करा",विद्यार्थ्यांच्या भविष्याशी प्रयोग थांबवा अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. आंदोलनकर्त्यांनी गट 'क' संयुक्त पूर्व परीक्षा ऑनलाईन घेण्याचा निर्णय तातडीने मागे घेण्याची मागणी केली. तसेच विद्यार्थ्यांना गृहजिल्ह्यातच परीक्षा केंद्र देणे, वाढविण्यात आलेली परीक्षा फी कमी करणे, पूर्व व मुख्य परीक्षेचे शुल्क एकत्रित करणे आणि आरक्षणाच्या रोस्टरनुसारच पदांची जाहिरात प्रसिद्ध करणे, अशा विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य शासन व MPSC कडे पाठविण्यात आले. यावेळी तुषार नन्नावरे, यश राठोड, राहुल हनवते, नयन आडे, सम्यक मानकर, निर्लेपा वासेकर यांच्यासह अनेक विद्यार्थी नेत्यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष न दिल्यास हा लढा केवळ यवतमाळपुरता मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा स्पष्ट इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला. विद्यार्थ्यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे MPSC च्या परीक्षा धोरणावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# TET शिक्षक पात्रता परीक्षा,पेपर फुटीवरून युवक काँग्रेस आक्रमक

## उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. ३ :** राज्यातील TET शिक्षक पात्रता परीक्षा, पेपर फुटी प्रकरणातील दोषींवर तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी पुसद विधानसभा युवक काँग्रेसच्या वतीने उपविभागीय अधिकारी,पुसद यांना निवेदन देण्यात आले. यावेळी युवक काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी TET (शिक्षक पात्रता परीक्षा) पेपर फुटी प्रकरणाची सखोल, निष्पक्ष व जलद गतीने चौकशी करून या गैरप्रकारात सहभागी असलेल्या सर्व दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली.

अशा घटनांमुळे लाखो प्रामाणिक विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या भविष्याशी खेळ होत असून, शासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन दोषींना तातडीने शिक्षा करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.



यावेळी युवक काँग्रेसच्या वतीने प्रशासनाला स्पष्ट इशारा देण्यात आला की, दोषींवर तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी. अन्यथा विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी युवक काँग्रेसच्या वतीने तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल. या आंदोलनास उद्भवणाऱ्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही निवेदनाद्वारे स्पष्ट करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व युवक काँग्रेसचे जिल्हा महासचिव तथा प्रभारी (पुसद, उमरखेड व महागाव विधानसभा) सुजित विजय मानकामे यांनी केले. यावेळी त्यांच्यासोबत पुसद विधानसभा अध्यक्ष अभिलाष खैरमोडे, डॉ. मोसिन पठाण, सुरज धुळे, सुमेद कुलदीपके, यश चव्हाण, रोहन राठोड, सूजल राठोड यांच्यासह युवक काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पीएम किसान हप्ता ई-केवायसीशिवाय अडणार!

## २.०६ लाख शेतकरी अजूनही प्रक्रियेपासून दूर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ३ :** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा पुढील हप्ता मिळवायचा असेल तर ई-केवायसी अनिवार्य असल्याचे स्पष्ट करत जिल्हा प्रशासनाने लाभार्थी शेतकऱ्यांना तातडीचे आवाहन केले आहे. जिल्ह्यातील एकूण ३ लाख ४ हजार १०६ सक्रिय लाभार्थ्यांपैकी केवळ ९७ हजार २१८ शेतकऱ्यांनी ई-केवायसी पूर्ण केली असून, तब्बल २ लाख ६ हजार ८८८ लाभार्थ्यांची प्रक्रिया अद्याप प्रलंबित आहे.

त्यामुळे या शेतकऱ्यांचा पुढील हप्ता रखडण्याची शक्यता आहे. केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात २० मे २०२६ पासून विशेष मोहीम सुरू आहे. लाभार्थ्यांसाठी बायोमेट्रिक आणि फेस ऑथेंटिकेशन या दोन सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. वृद्ध, आजारी किंवा हालचाल करू न शकणाऱ्या लाभार्थ्यांच्या घरी जाऊनही ई-केवायसी केली जात आहे. जिल्हाधिकारी विकास मीना व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी पात्र शेतकऱ्यांनी विलंब न करता प्रक्रिया पूर्ण करून पीएम किसानचा लाभ अखंडित ठेवावा, असे आवाहन केले आहे.

### तालुकानिहाय आकडेवारी

| तालुका | सक्रिय लाभार्थी | ई-केवायसी पूर्ण | प्रलंबित |
|---|---|---|---|
| आर्णी | २०,०१६ | ६,३४० | १३,६७६ |
| बाभूळगाव | १३,४३५ | ३,९३० | ९,५०५ |
| दारव्हा | २५,०५६ | ७,६०८ | १७,४४८ |
| दिग्रस | १६,२५२ | ३,७५६ | १२,४९६ |
| घाटंजी | १९,२०३ | ६,५७८ | १२,६२५ |
| कळंब | १३,६५६ | ३,८५८ | ९,७९८ |
| केळापूर | १६,२३१ | ४,१६४ | १२,०६७ |
| महागाव | २५,१५९ | १०,४४८ | १४,७११ |
| मारेगाव | १३,१६७ | ३,७८३ | ९,३८४ |
| नेर | १८,७६२ | ५,९७४ | १२,७८८ |
| पुसद | ३२,३५१ | ९,७०२ | २२,६४९ |
| राळेगाव | १६,४५१ | ४,८८७ | ११,५६४ |
| उमरखेड | २७,१७१ | १२,३४८ | १४,८२३ |
| वणी | १८,६३५ | ५,३८० | १३,२५५ |
| यवतमाळ | १६,१५४ | ४,६०० | ११,५५४ |
| झरी-जामणी | १२,४०७ | ३,३०३ | ९,१०४ |

## थोडक्यात




### महागावात जिओ नेटवर्कचा बोजवारा; ग्राहकांची नुकसान भरपाई व कारवाईची मागणी

**महागाव :** महागाव तालुक्यात गेल्या तीन ते चार महिन्यांपासून जिओ कंपनीची मोबाईल नेटवर्क सेवा वारंवार खंडित होत असल्याने ग्राहकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. याबाबत महागाव येथील विलास बाबुराव गावंडे यांनी तहसीलदारा मार्फत जिल्हाधिकारी तसेच उपविभागीय अधिकारी यांना निवेदन सादर करून जिओ कंपनीवर चौकशी करून कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महागाव तालुक्यात जिओ कंपनीचे हजारो ग्राहक असूनही मोबाईल नेटवर्क, इंटरनेट सेवा, व्हॉट्सअ‍ॅप कॉल, फेसबुक तसेच फोन कॉल वारंवार बंद पडत आहेत. परिणामी दैनंदिन व्यवहार, ऑनलाइन कामे, बँकिंग सेवा आणि व्यावसायिक कामकाजावर गंभीर परिणाम होत असून नागरिकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

ग्राहकांकडून नियमित रिचार्जची रक्कम आकारली जात असतानाही समाधानकारक सेवा दिली जात नसल्याने ही ग्राहकांची आर्थिक फसवणूक असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित जिओ कंपनीच्या सेवेची तात्काळ चौकशी करून दोषींवर योग्य ती कार्यवाही करावी.

# काही नगरसेवक 'तुपाशी' काही 'उपाशी' का?

## बिनविरोध निवडीनंतर जिल्ह्यात चर्चांचा धुरळा!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ विवेक वानखडे

**यवतमाळ, दि. ३ :** राजकीय विश्लेषण यवतमाळ स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत दुष्यंत चतुर्वेदी यांची बिनविरोध निवड झाली आणि निवडणूक संपली मात्र त्यानंतर सुरू झालेली राजकीय चर्चा आता अधिक रंगू लागली आहे.

या बिनविरोध विजयामागे केवळ राजकीय समन्वय होते,की त्यासाठी पडद्यामागे वेगळीच सूत्रे हलली? हा प्रश्न आता राजकीय वर्तुळात सातत्याने उपस्थित केला जात आहे.मतदान होईल, आपापले राजकीय बळ दिसेल आणि स्थानिक स्वराज्य संस्थांतील नगरसेवकांची भूमिका निर्णायक ठरेल, अशी अपेक्षा अनेकांनी बाळगली होती. मात्र उमेदवारी अर्ज माघारीच्या घडामोडींनी संपूर्ण समीकरणच बदलले. परिणामी अनेक नगरसेवकांच्या अपेक्षांवर पाणी फिरल्याची भावना उघडपणे व्यक्त होत आहे.निवडणुकीनंतर सर्वाधिक चर्चा होत आहे ती कथित काही नगरसेवक "तुपाशी काही उपाशी" काही मोजक्या नगरसेवकांची नाराजी दूर झाली, तर अनेकांना मात्र कोणतीही दखल मिळाली नाही, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. काहींना राजकीय किंवा अन्य स्वरूपाचा लाभ झाल्याचे दावेही केले जात आहेत. मात्र या चर्चांना अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. तरीही या चर्चांनी राजकीय वातावरण चांगलेच तापवले आहे. उमरखेड तालुक्यातील एका प्रभावी नेत्याच्या पडद्यामागील भूमिकेचीही चर्चा सुरू असून, संपूर्ण राजकीय गणित 'देवाच्या' रणनीतीने बदलल्याचे बोलले जात आहे. दुसरीकडे, स्थानिक नेतृत्वाला संधी मिळावी, ही अपेक्षा पुन्हा एकदा अपूर्णच राहिल्याची भावना कार्यकर्ते आणि नागरिकांतून व्यक्त होत आहे.या निवडणुकीने एक प्रश्न मात्र अनुत्तरित ठेवला आहे. बिनविरोध निवडणूक झाली, पण त्याचा खरा लाभ सर्व नगरसेवकांना झाला का, की काही मोजक्यांनाच? या प्रश्नाचे उत्तर सध्या तरी चर्चांमध्ये शोधले जात असून, येणाऱ्या काळातील राजकीय घडामोडी त्यावर शिक्कामोर्तब करतील.

### दोन अपक्षांच्या माघारी मागे नेमके कारण काय?

राजकीय वर्तुळात 'मलिदा' चर्चेला उधाण विधान परिषद निवडणुकीत दोन अपक्ष उमेदवारांनी ऐनवेळी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. संबंधित दोन्ही उमेदवारांनी माघार घेण्यामागे केवळ राजकीय समन्वय होता की अन्य काही कारणे, याबाबत विविध स्तरांवर तर्क-वितर्क व्यक्त केले जात आहेत. आर्णी येथील अपक्ष उमेदवाराने माघारीपूर्वी राजकीय लाभ मिळविल्याची चर्चा रंगत असतानाच, साहेबराव कांबळे यांनी उमेदवारी मागे घेतल्यानंतर अपक्ष म्हणून रिंगणात उतरलेल्या काँग्रेसच्या एका माजी नगराध्यक्षांवर उमेदवारी कायम ठेवण्याबाबत महाविकास आघाडीतील काही नेते आणि नगरसेवकांकडून दबाव निर्माण झाल्याचीही चर्चा आहे. दरम्यान, माघारीच्या दिवशी यवतमाळ शहरातील एका ज्येष्ठ काँग्रेस नेत्याच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीची ही राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे. या बैठकीनंतर काही नगरसेवकांची नाराजी दूर करण्यासाठी राजकीय किंवा अन्य स्वरूपाचे समन्वयाचे प्रयत्न झाल्याचे दावे केले जात आहेत. काही नगरसेवकांना लाभ झाल्याच्या चर्चांनाही उधाण आले असले, तरी या सर्व चर्चांना अद्याप कोणताही अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. मात्र, या घडामोडींमुळे बिनविरोध निवडणूक झाली खरी पण पडद्यामागे नेमके काय घडले? हा प्रश्न राजकीय वर्तुळात अद्यापही चर्चेचा विषय ठरत आहे.

## घर फोडून साहित्य लंपास

**यवतमाळ, दि. ३ :** नागपूर येथील महिला फिर्यादीच्या तारपुरा यवतमाळ येथील बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोराने घरातील गॅस शेगडी, सिलेंडर आणि पाण्याची मोटार असा एकूण सात हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी शाजीया तब्बसुम मुस्माक या नागपूर येथील रहिवासी आहेत. त्यांचे यवतमाळ येथील तारपुरा भागात घर आहे. दिनांक १ जुलै २०२६ रोजी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्याने त्यांच्या बंद घराच्या दरवाजाचा कुलूप कोंडा तोडून आत प्रवेश केला. चोराने घरातील जुनी वापरती गॅस शेगडी, सिलेंडर आणि जुनी पाण्याची मोटार असा एकूण ७,०६९ रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

## सुधाकरराव नाईकांच्या जलदृष्टीला शासकीय सलाम..!

**२१ ऑगस्ट आता 'जलसंधारण दिन'**

**संजय राठोड यांच्या पुढाकाराला शासनाची मंजुरी.**

**यवतमाळ :** माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांच्या



जलसंधारण क्षेत्रातील दूरदृष्टीपूर्ण कार्याचा गौरव करत राज्य शासनाने त्यांच्या २१ ऑगस्ट या जयंतीदिनी दरवर्षी 'जलसंधारण दिन' साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या पुढाकारानंतर विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. यापूर्वी १० मे रोजी स्मृतिदिनी हा दिवस साजरा होत होता.

मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात नाईक यांनी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही संकल्पना रुजवत स्वतंत्र जलसंधारण विभागाची स्थापना केली आणि जलसंधारणाला लोकचळवळीचे स्वरूप दिले. नव्या निर्णयानुसार २१ ऑगस्ट रोजी शासकीय कार्यालयांत प्रतिमापूजन, जलसंधारणाची शपथ, विविध कामांचे भूमीपूजन व जलपूजन, श्रमदान, जनजागृती मोहीम तसेच उत्कृष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. या माध्यमातून नाईक यांची जलदृष्टी आणि जलसंवर्धनाचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे मंत्री संजय राठोड यांनी सांगितले.

# संत गजानन महाराज मंदिराची जागा अतिक्रमणमुक्त करण्याची मागणी..!

## कारवाई न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**फुलसावंगी, दि. ३ :** फुलसावंगी येथील संत गजानन महाराज मंदिरासाठी ग्रामपंचायतीने आरक्षित ठेवलेल्या जागेवर कथितपणे बनावट कागदपत्रांच्या आधारे मालकी हक्क मिळवून नोंदणी करण्यात आल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे.

या प्रकरणात जिल्हा कार्यकारी अधिकाऱ्यांनी संबंधित नोंदी रद्द करून जागा अतिक्रमणमुक्त करण्याचे स्पष्ट आदेश दिले असतानाही तब्बल तीन महिने उलटूनही ग्रामपंचायतीकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप एआयएमआयएमचे जिल्हा उपाध्यक्ष शमशेर खान लाला यांनी पत्रकार परिषदेत केला.

> **"लवकरच आदेशाची अंमलबजावणी करू" जी सदर जागेचे फेरफार तसेच गाव नमुना क्रमांक ८ मधील नोंदी रद्द करण्याचे आदेश प्राप्त झाले आहेत. काही प्रशासकीय कारणांमुळे कारवाईला विलंब झाला. मात्र, जिल्हा कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार लवकरच आवश्यक कार्यवाही करून अंमलबजावणी करण्यात येईल.**
>
> **– विनोद चव्हाण,**
> **सचिव, ग्रामपंचायत फुलसावंगी**

शमशेर खान लाला यांनी सांगितले की, काही वर्षांपूर्वी ग्रामपंचायतीने एका प्लॉटिंगमधील खुली जागा संत गजानन महाराज मंदिरासाठी आरक्षित ठेवली होती. मात्र, त्या जागेपैकी सुमारे १,३५० चौरस फूट जागा एका दांपत्याने कथितपणे बनावट कागदपत्रांच्या आधारे स्वतःच्या नावावर करून घेतली. एवढेच नव्हे, तर ग्रामपंचायतीतील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने गाव नमुना क्रमांक ८ मध्येही संबंधित नोंद करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. या प्रकरणाचा पाठपुरावा ग्रामपंचायतीपासून जिल्हा कार्यकारी अधिकाऱ्यांपर्यंत करण्यात आला. त्यानंतर १० मार्च २०२६ रोजी जिल्हा कार्यकारी अधिकाऱ्यांनी संबंधित नोंदी रद्द करून जागेवरील अतिक्रमण हटवून ती ग्रामपंचायतीच्या ताब्यात घेण्याचे आदेश दिले. मात्र, आदेशानंतरही अतिक्रमण हटविणे, फेरफार रद्द करणे किंवा गाव नमुना क्रमांक ८ मधील नोंदी रद्द करण्याबाबत कोणतीही प्रभावी कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला. "ग्रामपंचायतीने स्वतःच्या मालमत्तेचे संरक्षण करण्याऐवजी संबंधितांना पाठीशी घालण्याची भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे. जिल्हा कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशाची पुढील दहा दिवसांत अंमलबजावणी झाली नाही, तर आमरण उपोषण सुरू करण्यात येईल," असा इशारा शमशेर खान लाला यांनी दिला.

# रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त..!

## अतिक्रमण कारवाईत दुजाभावाचा आरोप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ३ :** यवतमाळ शहराचा सर्वांगीण विकास आणि "सुंदर शहर" घडविण्याचे आश्वासन देत सत्तेवर आलेल्या नगर परिषद प्रशासनाच्या कारभारावर आता नागरिकांनीच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

शहरातील प्रमुख रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असून सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. परिणामी दुचाकीस्वार, रिक्षाचालक, सायकलस्वार तसेच चारचाकी वाहनधारकांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अनेकांना मणक्याचे, कंबरदुखीचे व इतर शारीरिक त्रासही उद्भवत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे.





नगराध्यक्ष अँड.प्रियदर्शनी उईके यांनी निवडणुकीपूर्वी शहर विकासाचा शंभर दिवसांचा आराखडा जाहीर केला होता. त्यात मोठ्या प्रमाणात विकासकामे, रस्ते आणि मूलभूत सुविधा उभारण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात शहरातील रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. शहरात स्वच्छतेचाही बोजवारा उडाल्याचा आरोप होत आहे. एका बाजूला गोरगरिबांच्या हातावर पोट असलेल्या छोट्या व्यावसायिकांवर अतिक्रमण कारवाई केली जात असताना, प्रभावशाली व्यक्तींशी संबंधित अतिक्रमणांकडे मात्र जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. दत्ता चौक परिसरातील सर्व्हिस गल्ली आजही अतिक्रमणाच्या विळख्यात असून याबाबत अनेक तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. मुख्याधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करूनही केवळ उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. नगर परिषद प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष न दिल्यास नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

युवा शक्तीच्या स्वप्नांना दिशा देण्यासाठी

# ज्ञान, कौशल्य व आत्मविश्वासाची त्रिसूत्री आवश्यक - विजया रहाटकर




'मन से मंजिल तक' दीक्षारंभ उपक्रमाचा उत्कर्षबिंदू

**अमरावती/का.प्र.**

आजचा भारत युवा शक्ती, तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण विचारांच्या सामर्थ्यावर जगात नवी ओळख निर्माण करीत आहे. बदलत्या काळातील संधी ओळखून विद्यार्थ्यांनी केवळ पदवीपुरते मर्यादित न राहता ज्ञान, कौशल्य, आत्मविश्वास आणि मूल्याधिष्ठित नेतृत्वाच्या बळावर स्वतःला घडवावे, असे प्रेरणादायी आवाहन राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्लीच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.

त्या श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनातून साकारलेल्या, आय.क्यू.ए.सी. आणि विद्यार्थी विकास कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच डीबीटी स्टार कॉलेज प्रोग्राम अंतर्गत आयोजित 'मन से मंजिल तक : एक प्रेरणादायी प्रयास' या नवप्रवेशित विद्यार्थ्यांच्या दीक्षारंभ उपक्रमातील विशेष सत्रात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. रहाटकर यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत नव्या भारतातील युवकांची भूमिका, महिला सक्षमीकरण, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि भविष्यातील कौशल्ये यावर मार्गदर्शन केले. 'स्वप्नांना वास्तवात आणण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, नवीन कौशल्यांचा स्वीकार आणि आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी हीच यशाची गुरुकिल्ली आहे,' असे त्यांनी सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात बदलांना घाबरण्याऐवजी तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करून विद्यार्थ्यांनी स्वतःला सक्षम बनवावे, असे आवाहन त्यांनी केले. 'यशोदा ँ ६ २.०' उपक्रमाच्या माध्यमातून विशेषतः युवतींसाठी शिक्षण, कौशल्य विकास आणि आत्मनिर्भरतेच्या नव्या संधी उपलब्ध होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी रहाटकर यांनी शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याच्या पावन स्मृतींना उजाळा देत श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक परंपरेचा गौरव केला. कार्यक्रमास राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्लीचे उपसंचालक रामावतार सिंह, महिला व बालविकास विभागाच्या उपायुक्त ज्योती कडू, प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. इंगोले, डीबीटी स्टार कॉलेज प्रोग्राम समन्वयक डॉ. दिनेश खेडकर, तक्रार निवारण समिती समन्वयक डॉ. जयश्री धोटे आणि महिला सशक्तीकरण कक्ष समन्वयक डॉ. वैशाली देशमुख उपस्थित होते. महावीर फाउंडेशन, नवी दिल्लीचे जतीन माटा आणि मतीन संघवी यांनी 'यशोदा ँ ६' उपक्रमाचे प्रभावी सादरीकरण करून कृत्रिम बुद्धिमत्तेचा शिक्षण, कौशल्य विकास आणि भविष्यनिर्मितीसाठी होणारा उपयोग विद्यार्थ्यांसमोर मांडला.

प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. इंगोले यांनी महाविद्यालयाची विविध राष्ट्रीय मानांकने, शैक्षणिक गुणवत्ता आणि विद्यार्थी विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. आभार डॉ. जयश्री धोटे संचालन डॉ. अवंतिका मानकर आणि डॉ. मनीष गायकवाड यांनी केले. 'मन से मंजिल तक' या सहा दिवसीय दीक्षारंभ उपक्रमामध्ये यापूर्वी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

सुप्रसिद्ध वऱ्हाडी कवी व कलाकार किशोर बळी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, राष्ट्रीय स्तरावरील युवा वक्त्या श्रावणी रोटे, विद्यार्थीप्रिय शिक्षक व प्रेरणादायी वक्ते डॉ. राजेश मिरगे यांच्या संवादात्मक व विचारप्रवर्तक सत्रांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला नवी दिशा दिली. माध्यम क्षेत्रातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व प्रा. आदिती पोहरे या ४ जुलै रोजी 'आराम नव्हे, आव्हानातूनच मिळते यश' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत.

# संक्षिप्त

## सोमवारी 'नवीन सेवार्थ प्रणाली' प्रशिक्षण

**अमरावती**- शासनाच्या नवीन सेवार्थ प्रणालीची जिल्ह्यात प्रभावी, पारदर्शक आणि सुरळीत अंमलबजावणी व्हावी, या उद्देशाने जिल्हा कोषागार कार्यालय, अमरावती यांच्या वतीने दुसऱ्या टप्प्यातील विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण सोमवार ६ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नवीन प्रशासकीय इमारत, उपविभागीय कार्यालय, अचलपूर येथे आयोजित करण्यात आले आहे. या महत्त्वपूर्ण प्रशिक्षणासाठी अचलपूर, दर्यापूर, चिखलदरा, धारणी आणि अंजनगाव सुर्जी या पाच तालुक्यांतील सर्व आहरण व संवितरण अधिकारी तसेच संबंधित कार्यालयांतील सेवार्थ प्रणाली हाताळणारे अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये नवीन सेवार्थ प्रणालीची नेमकी कार्यपद्धती, वेतन देयके अचूकपणे तयार करण्याची प्रक्रिया, प्रणालीतील विविध मॉड्यूल्सचा वापर, आवश्यक दुरुस्त्या आणि नवीन तांत्रिक बदलांविषयी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. याशिवाय, एनपीएस वेळेत जमा करण्याची पद्धत आणि 'ग्रास' प्रणालीचा वापर करून शासकीय खात्यात महसूल भरण्याची प्रक्रिया याविषयी प्रत्यक्ष उदाहरणांसह माहिती दिली जाईल. शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतन व लेखाविषयक कामात सुसूत्रता आणि गतिशीलता आणण्यासाठी हे प्रशिक्षण महत्त्वाचे ठरणार असून, यात उपस्थित कर्मचाऱ्यांच्या शंकांचे निरसन केले जाणार आहे. तरी संबंधित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विहित वेळेत उपस्थित राहून या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कोषागार कार्यालयाने केले आहे.

## रशियात अमरावतीच्या कन्येची जागतिक झेप

**अमरावती**-अमरावतीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी व अभिमानास्पद कामगिरी करत शहरातील संस्कृती दिलीप शंकरपुरे हिने रशियातील ओरेनबुर्ग येथे २३ ते २८ जून २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ११व्या इंटरनॅशनल यूथ फोरम – 'युरेशिया ग्लोबल-२०२६' मध्ये भारताचे प्रभावी प्रतिनिधित्व करून अमरावतीसह देशाचे नाव जागतिक व्यासपीठावर उज्ज्वल केले आहे. सध्या रशियातील सिम्फेरोपोल येथील क्रिमियन फेडरल युनिव्हर्सिटीच्या इंटरनॅशनल मेडिकल फॅकल्टीमध्ये एमबीबीएसच्या पाचव्या वर्षाचे शिक्षण घेत असलेल्या संस्कृतीने अत्यंत स्पर्धात्मक आंतरराष्ट्रीय प्रक्रियेनंतर या प्रतिष्ठित युवा मंचावर भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळवला. जागतिक परिषदेत रशियातील ५९ प्रदेशांतील तसेच २४ देशांतील १६० युवा प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला होता. सहा दिवस चाललेल्या परिषदेदरम्यान नेतृत्व विकास, नवकल्पना, जागतिक सहकार्य, सामाजिक परिवर्तन आणि सांस्कृतिक देवाणघेवाण या विषयांवरील कार्यशाळा व पॅनेल चर्चांमध्ये संस्कृतीने सक्रिय सहभाग घेत भारताचा दृष्टिकोन प्रभावीपणे मांडला. सर्व स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## वसंतराव नाईक यांना आदरांजली

**तिवसा**- येथील श्री स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या श्री राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयात हरितक्रांतीचे प्रणेते व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून तिवसा येथील विरोधी पक्षनेते अनिल थुल उपस्थित होते. कार्यक्रमप्रसंगी वसंतराव नाईक व राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून आदरांजली वाहण्यात आली. सुनिल बहाद्दरपुरे यांच्या हस्ते न. पं. तिवसा चे विरोधी पक्षनेते अनिल थुल यांना झाड (रोपटे) आणि पुष्पगुच्छ देऊन एक 'शेतकरी' म्हणून त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी मधुकरराव पिंगळे, राजाभाऊ देशमुख, नितीन गायकवाड, मयूर बोके, मयूर वानखडे आणि कृणाल गौरखेडे, सुरज तंवर प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच विशाल गडलिंग, गौरव भगत, सुरज भगत, अभिलाष पखाले, यशवर्धन भगत, सौरभ कटारने, राजेश गोंडसे, ऋषिकेश गंधे, अचल मुंदाणे, सुरज धडांगे मोनिका येवले, रोशन डगवार, राहुल धडांगे यांच्यासह वाचनालयाचा मोठा वाचक वर्ग उपस्थित होता. संचालन भूषण मुंदाणे आभार सुमित अनासाने यांनी मानले.



## ज्ञानदीप पब्लिक स्कूलचा वर्धापन दिन

**अचलपूर**-कृष्णाई शिक्षण व बहुउद्देशीय संस्था, जीवनपूरा (अचलपूर) संचलित ज्ञानदीप पब्लिक स्कूलचा तिसरा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वितरण करण्यात आले. तसेच अबॅकस प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे आणि सुवर्णपदक देऊन गौरविण्यात आले. पालकांनी शाळेत दिल्या जाणाऱ्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाबद्दल, शिस्तीबद्दल आणि विद्यार्थ्यांवर होणाऱ्या संस्कारांबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाला डॉ. नरेंद्र राईकवार, अनिल पिंपळे, डॉ. अशोक निंबूरकर, डॉ. रमेश नघाटे, धर्मराज पवार, सचिन लाखोंचे, सुरेश पखाले यांच्यासह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन प्राचार्य माधवी ठाकरे यांनी तर आभार प्रदर्शन खुशी बीजेवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हीना परवीन, प्रिया सावरकर तसेच शाळेच्या शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



## विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान

**चांदूर रेल्वे**-केंद्र व राज्य शासनाच्या 'विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान' अंतर्गत ग्रामपंचायत मालखेड येथे अभियानाचा शुभारंभ गट विकास अधिकारी राणी माळवे यांच्या हस्ते उत्साहात करण्यात आला. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला वर्षातून किमान १२५ दिवस रोजगार उपलब्ध करून देण्याचा संकल्प करण्यात आला आहे. तसेच शाश्वत विकास, कौशल्य विकास, स्वयंरोजगाराला प्रोत्साहन, पायाभूत सुविधांची निर्मिती आणि ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यावर भर देण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. कार्यक्रमास ग्रामपंचायत प्रशासक लता पाटील, विस्तार अधिकारी रमेश मेश्राम, तांत्रिक अधिकारी मंगेश काकडे, ग्रामपंचायत अधिकारी साधना सोनोने, रोजगार सेवक गजानन बागडे, ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी, महिला बचत गटांच्या सदस्यांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.



# सिमेंट रस्त्याच्या कामावर नागरिकांचा आक्षेप

## चौकशी करून कारवाईची मागणी

**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**

चांदूर रेल्वे शहरातील प्रभाग क्रमांक ४ मध्ये आमदार निधीतून सुरू असलेल्या सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामावर स्थानिक नागरिकांनी गंभीर आक्षेप घेतला आहे. हे काम मंजूर सरकारी इस्टिमेटनुसार न करता थातूरमातूर पद्धतीने सुरू असल्याचा आरोप नागरिकांनी केला असून, कामाच्या दर्जाची तातडीने चौकशी करून आवश्यक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सुरू असलेल्या कामाच्या ठिकाणी संबंधित शासकीय विभागाचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी उपस्थित नसल्यामुळे कामाच्या गुणवत्तेवर कोणतेही नियंत्रण राहिलेले नाही.

तसेच कामाबाबत कंत्राटदाराकडे विचारणा केल्यास अरेरावीची भाषा वापरून समाधानकारक उत्तरे दिली जात नसल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

संदर्भात नागरिकांनी नगरपरिषद अध्यक्ष, मुख्याधिकारी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन सादर करून कामाची तातडीने पाहणी करावी, सरकारी इस्टिमेटनुसार दर्जेदार काम करण्यात यावे आणि संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

यावेळी सुमेरचंद जैन, अशोक खुरपडे, सुनील राऊत, अशोक बेलसरे, मनोज ढोले, प्रशांत बैस, शैलेश बगाडे, यशवंत घाटोळ, विठ्ठल घाटोळ, रवींद्र भोयर, राजेश बेलसरे, प्रकाश नाचवणकर, मयूर उमक, किशोर फसाटे, सागर बेलसरे, बाल्या पेठे, लक्ष्मण बेलसरे, राजेश वानरे, अमित बेलसरे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

महिला शेतकरी विधेयक म्हणजे

# महिलांच्या श्रमाला आणि हक्काला मिळालेला सन्मान -आ. सुलभा खोडके

**अमरावती/का.प्र.**

महिला सक्षमीकरणासाठी शासनाच्या वतीने अनेक कायदे करून विविध योजना राबविण्यात आल्या. या योजनांतून आज अनेक महिलांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले आहे, पण शेतकऱ्यांसोबत खांद्याला खांद्या लावून काम करणाऱ्या महिला शेतमजुरांना कुठलीही ओळख अथवा न्याय मिळत नव्हता. राज्यातील महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता मिळावी यासाठी शासनाचे महिला शेतकरी विधेयक म्हणजे महिलांच्या श्रमाला आणि हक्काला मिळालेला खरा सन्मान आहे. या विधेयकातून शेतकरी महिलांच्या जिद्द, कर्तृत्व, नेतृत्व आणि कृषी क्षेत्रातील महत्वपूर्ण योगदानाचे दर्शन घडत असल्याचे प्रतिपादन आ. सुलभा खोडके यांनी केले.

राज्यविधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातील विधानसभेतील कामकाजादरम्यान महाराष्ट्र 'महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६' वर चर्चा करतांना आ.खोडके यांनी सांगितले कि, विदर्भातील शेतकरी आत्महत्या काळात महिलांनी कुटुंबाला आधार देऊन पुढे नेण्याचे काम केले. अनेक महिला या रासायनिक शेती ऐवजी सेंद्रिय शेतीला महत्व देत जुने घराच्या बीजांचे संगोपण करून आपल्या शेतात बीजारोपण करतात. आणि शासनाच्या नैसर्गिक शेतीचे महत्व अधोरेखित करतात. दुग्ध व्यवसाय, मत्स्य व्यवसाय , पशुपालन, कुक्कुट पालन सारख्या कृषी पूरक व्यवसायातही महिला शेतमजुर ह्या जवळपास सगळी कामे करत असतात. मात्र त्यांच्या श्रमाला कुठेही सन्मान मिळत नाही.

महाराष्ट्र शासनाने महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक आणून कुटुंबाच्या किंवा सामुदायिक जमिनीवर शेती करणाऱ्या या महिला शेतमजुरांना शेतकरी म्हणून मान्यता देण्याचा प्रयत्न या विधेयकाच्या माध्यमातून केला असल्याचे गौरवोद्गार आ.खोडके यांनी विधानसभेतून व्यक्त केले. कृषी क्षेत्रातील महिलांना 'शेतकरी' म्हणून वैधानिक मान्यता देणे, त्यांच्यासाठी संस्थात्मक यंत्रणा उभारणे, कर्ज, तंत्रज्ञान, बाजारपेठ व विविध सेवा महिलांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश



या विधेयकातून साध्य होणार असल्याचे सुद्धा या विधेयकात अंतर्भूत आहे. पारंपरिक शेती करणाऱ्या महिलांबरोबरच आदिवासी महिला , एकल महिला, अल्पभूधारक महिला यांना सुद्धा शेतकरी म्हणून दर्जा देऊन त्यांना लाभ देण्यात यावा, म्हणून स्वतंत्र तरतूद करण्यात यावी. महिलांसाठी आरोग्य विमा , अपघात विमा , वृद्धपकाळ आणि सामाजिक सुरक्षा योजनाची सुद्धा यामध्ये आखणी करावी, शहरी भागातील महिला गावात जाऊन शेती करत असेल पण त्यांची ग्रामपंचायत मध्ये नोंद नसेल अशा शहरी भागातील महिला शेतमजुरांना सुद्धा महिला शेतकरी प्रमाणपत्र देतांना अडचणी उद्भवू नये, त्यांना देखील शेतकरी महिला दर्जा मिळावा अशी सुचना आमदार महोदयांनी केली .

महिलांना राज्य शासनाच्या कर्ज योजना, कृषी अनुदाने, बियाणे, खते, पीक विमा, विस्तार सेवा, बाजारपेठ सुविधा, वाहतूक, साठवणूक आणि सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ देण्यासाठी डिजिटल प्रभावी यंत्रणा उभारली जाईल. अशी मांडणी या विधेयकात करण्यात आली असल्याने त्याची खरी अंमलबजावणी होणे म्हत्वाचे आहे. यासाठी दरवर्षी विधानसभे पुढे अंमलबजावणी अहवाल सादर करण्यात यावे .

जेणेंकरूत यातील त्रुटी व अडथळे दूर करता येईल. अशी सुचना करण्यात आली. महाराष्ट्र 'महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६ हे खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या नव्या पर्वाची सुरुवात ठरेल व यातून महिलांना निर्णय प्रक्रियेत स्थान मिळेल. अशी अपेक्षा व्यक्त करीत आमदार संजय खोडके यांनी या विधेयकाचे समर्थन करून मुख्यमंत्री- नामदार देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री ना. सुनेत्रा पवार तसेच राज्याचे कृषीमंत्री- दत्तात्रय भरणे यांचे अभिनंदन केले.

# समर्थ कॉलनीत परळ जातीच्या ३९ पिल्लांचे यशस्वी रेस्क्यू!

**मोशी/ वार्ताहर**

शहरातील समर्थ कॉलनी येथे रूपेश उज्जैनकर यांच्या राहत्या घरी भारतातील नंबर दोनचा विषारी परळ जातीचा पाच फुटाचा साप व त्याची तब्बल ३९ पिल्ले आढळून आली. घरामध्ये एकाच वेळी इतक्या मोठ्या संख्येने सापाची पिल्ले आढळल्याने परिसरात एकच आहाकार उडाला व काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले.

वनपरिक्षेत्र उद्याना च्या कंपाऊंडला लागूनच असलेल्या उज्जैनकर यांच्या घरी निघालेल्या या सापांच्या व पिल्लांच्या घटनेची माहिती मिळताच मोर्शी शहरात कार्यरत असलेले जीवनसेतू जलमित्र आपत्ती बचाव बहुउद्देशीय संस्था व कार्स संस्था सर्पमित्रांचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. या पथकाने अत्यंत दक्षतेने व कौशल्याने आई सापासह सर्व



३९ पिल्लांचे सुरक्षित रेस्क्यू करून त्यांना जीवनदान दिले.

रेस्क्यूनंतर साप व त्याची सर्व पिल्ले त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे सोडण्यात आल्यामुळे शेवटी परिसरातील नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला.

रेस्क्यू टीममध्ये जीवनसेतू जलमित्र आपत्ती बचाव बहुउद्देशीय संस्थेचे प्रियांशु तायवाडे, विवेक सावरकर, शेषांद्री वयले, श्रवण खुरपे, तोफिक शेख, कार्स संस्थेचे अभय धामेधर, महेश बाबुले, यांनी संयुक्तपणे ही रेस्क्यू मोहीम यशस्वीरीत्या पार पाडली.

# वार्ड बाल संरक्षण समितीच्या प्रशिक्षण कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अमरावती/ का.प्र.**

येथील महिला व बालविकास विभागातील जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांच्यामार्फत रविनगर बीट अंतर्गत येणाऱ्या अंगणवाडी सेविकांना विविध सामाजिक विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी वार्ड बाल संरक्षण समितीच्या प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन अंगणवाडी क्र. १३७ मध्ये करण्यात आले होते. कार्यशाळेला वार्डातील अंगणवाडी सेविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यशाळेचे आयोजन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय गट, बाल विकास प्रकल्प अधिकारी धनतोडे, व जिल्हा बाल संरक्षण कक्ष प्रमुख अजय डबले यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले होते.



**महिला व बालविकास विभागाअंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे आयोजन**



कार्यशाळेत वार्ड बाल संरक्षण समितीचे उद्दिष्टे, कार्यपद्धती तसेच अंगणवाडी सेविकांची जबाबदारी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी बालविवाह, बालकामगार, बालकांवरील लैंगिक अत्याचार, बालसंगोपन योजना, अनाथ प्रमाणपत्र तसेच बाल संरक्षणाशी संबंधित विविध शासकीय मार्गदर्शक सूचनांची माहिती देण्यात आली.

बालकांच्या संरक्षणासाठी अंगणवाडी सेविकांनी आपल्या कार्यक्षेत्रात जनजागृती करून बालहक्कांचे संरक्षण करण्यासाठी सक्रिय भूमिका बजवावी असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्या मनिषा फुलाडी (हनुमंते) यांनी प्रशिक्षणादरम्यान केले.

तसेच अंगणवाडी सेविकांच्या कामकाजा तील अडचणी जाणून घेऊन त्यावर चर्चा करण्यात आली. कार्यशाळेला अंगणवाडी सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यशाळेच्या यशस्वीतेकरिता मुख्य सेविका अनुराधा पवार यांनी परिश्रम घेतले.

# अचलपूर-परतवाड्यात डुप्लिकेट हेल्मेटची खुलेआम विक्री

**अचलपूर/का.प्र.**

अमरावती जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी नागरिकांच्या सुरक्षीततेसाठी दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर करावा, असे आवाहन केल्यानंतर अनेकांनी हेल्मेट खरेदीकडे धाव घेतल्याचे चित्र अचलपूर-परतवाडा जुळ्या शहरात पहायला मिळत आहे. मात्र या जनजागृतीचाच गैरफायदा घेत अचलपूर-परतवाडा शहरात डुप्लिकेट आणि दर्जाहीन हेल्मेटची खुलेआम विक्री सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. त्यामुळे कायद्याच्या भीतीने हेल्मेट खरेदी करणाऱ्या नागरिकांची आर्थिक फसवणूक तर होतच आहे, शिवाय त्यांच्या जीवाशीही थेट खेळ सुरू असल्याची संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्या दुचाकीस्वारांबर कारवाईची मोहीम सुरू असून, विनाहेल्मेट वाहन चालविणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जात आहे. त्यामुळे अनेक नागरिक घाईघाईने हेल्मेट



खरेदी करत आहेत. याच संधीचा फायदा घेत काही व्यावसायिकांनी स्वस्त आणि निकृष्ट दर्जाची हेल्मेट बाजारात उतरविली आहेत. अवघ्या ४०० ते ५०० रुपयांत विक्रीस ठेवण्यात आलेली ही हेल्मेट दिसायला आकर्षक असली तरी प्रत्यक्षात अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याचे सांगितले जात आहे. अपघाताच्या वेळी अशा हेल्मेटमुळे डोक्याचे संरक्षण होण्याऐवजी गंभीर दुखापत किंवा जीवितहानी होण्याच्चा धोका अधिक असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, काही हेल्मेटवर बनावट पद्धतीने आयएसआय चिन्ह रंगवून ती दर्जेदार असल्याचा आभास निर्माण केला जात आहे. त्यामुळे सामान्य ग्राहक सहज फसत असून, बनावट आणि मूळ हेल्मेट यातील फरक ओळखणे अनेकांसाठी कठीण ठरत आहे. या गंभीर प्रकाराकडे संबंधित प्रशासन, अन्न व औषध प्रशासन, विधी मापनशास्त्र विभाग आणि पोलीस प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन जुळ्या शहरातील हेल्मेट विक्रीची तपासणी करावी, बनावट व निकृष्ट हेल्मेट जस करून संबंधित विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

# ओबीसी जातनिहाय जनगणनेसाठी सावता परिषदेचे धरणे आंदोलन

## २०२७ च्या जनगणनेत स्वतंत्र कॉलमची मागणी ; अन्यथा राज्यव्यापी तीव्र आंदोलनाचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोला ■

सन २०२७ मध्ये होणाऱ्या जनगणनेत इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजाची स्वतंत्र जातनिहाय जनगणना करण्यात यावी, यासाठी जनगणना प्रपत्रात ओबीसींसाठी स्वतंत्र स्तंभ (कॉलम) समाविष्ट करण्यात यावा, या प्रमुख मागणीसाठी सावता परिषदेच्या वतीने अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र शासनामार्फत केंद्र शासनाकडे तातडीने प्रस्ताव पाठविण्याची मागणी करण्यात आली.

सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर ओबीसी समाजाच्या जातनिहाय जनगणनेसाठी विविध ठिकाणी आंदोलने सुरू असून, त्याचाच एक भाग म्हणून अकोल्यात हे आंदोलन करण्यात आले. यावेळी सादर करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे



की, ओबीसी समाजाची जातनिहाय जनगणना झाल्यास विविध जातींची अचूक लोकसंख्या समोर येईल. त्यामुळे समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीचा वास्तव आढावा घेऊन प्रभावी विकास योजना राबविणे शक्य होईल. तसेच लोकसंख्येच्या प्रमाणात राजकीय, शैक्षणिक व आर्थिक प्रतिनिधित्व निश्चित करण्यासाठीही ही माहिती महत्त्वाची ठरेल.

आंदोलनकर्त्यांनी केंद्र सरकारने सन २०२७ च्या जनगणनेत अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गाप्रमाणेच ओबीसी समाजासाठीही स्वतंत्र कॉलमचा समावेश करून जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. यासाठी महाराष्ट्र शासनाने तातडीने केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवावा, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली.

मागणीची दखल न घेतल्यास सावता परिषदेच्या वतीने राज्यभर अधिक तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांनी दिला.

या आंदोलनात प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. संतोष हुशे, जिल्हा परिषद सदस्य भाऊसाहेब गाढवे, प्रदेश उपाध्यक्ष प्रवीण वाघमारे, लक्ष्मण निखाडे, माजी आमदार हरीदास भदे, माजी आमदार नारायण गव्हाणकर, प्रकाश तायडे, महेश गणगणे, पंढरीसेठ हाडोळे, विजय कौशल, लखुआप्पा लंगोटे, शंकर इंगळे, सतीश भोपळे, आशिष ढोमणे, महेंद्र बोळे, धनंजय सिरस्कार, शंकरराव बिडकर, अनिल शिंदे, प्रदीप काळपांडे, बालुभाऊ बगाडे, अजय ढोणे, हरीश नावकर, गोपाल काकड, दिनेश सोळंके, अमोल कलोरे, पुष्पाताई गुलवाडे, सुमित्रा निखाडे, मायाताई मसने, प्रविण निलखन, संकेत मसने, महेंद्र राऊत, रोहन झगडे, रामदास खंडारे, सुनील उंबरकर, दिलीप गिरे, प्रकाश मसने, ऋषिकेश आमले यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले.

# बीएलओच्या कामांचा आढावा, प्रत्येक पात्र मतदाराची अचूक नोंद घ्यावी –जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | अकोला ■

- विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम
- जिल्हाधिकाऱ्यांकडून विविध केंद्रांना भेटी

मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम जिल्ह्यात राबविण्यात येत असून त्या अनुषंगाने जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी विविध मतदान केंद्रांना भेट देऊन मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या कामांचा आढावा घेतला.

मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्या माध्यमातून मतदाराचे गणनापत्र भरुन घेण्याची प्रक्रिया जिल्ह्यात सर्वदूर सुरू आहे. त्याअनुषंगाने मोहिमेच्या अंमलबजावणीची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज अकोला शहर, बाळापूर, तसेच पातूर तालुक्यातील केंद्रांना भेट दिली. उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेश परंडेकर, उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे, तहसीलदार कुणाल झाल्टे, वैभव फरतारे यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते. पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने फॉर्म



वितरण, नागरिकांकडून परिपूर्ण माहिती भरून घेणे व त्यानुसार माहितीचे डिजिटायझेशन ही सर्व कामे विहित वेळेत पूर्ण झाली पाहिजेत. प्रत्येक बाब जलद गतीने व दक्षतापूर्वक पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना दिले सर्वप्रथम जिल्हाधिकाऱ्यांनी अकोला शहरातील खडकी येथील केंद्र, तसेच डाबकी रस्ता परिसरातील भिकमचंद खंडेलवाल विद्यालय येथील मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा आढावा घेतला.

त्यानंतर पातूर येथील मराठी शाळा क्र. १, तसेच बाळापूर येथील शासकीय उर्दू अध्यापक विद्यालय, कासारखेड येथील शाळा आदी अनेक केंद्रांना भेट दिली. यावेळी जिल्हाधिका-यांनी मतदारांच्या घरी जाऊन प्रत्यक्ष प्रक्रियेचा पडताळा घेतला, तसेच मतदार बांधवांशी संवाद साधला.

नागरिकांनी बीएलओंना अचूक माहिती द्यावी.. गणनापत्र काळजीपूर्वक भरावे. आवश्यक कागदपत्रे जवळ ठेवा. मॅपिंगचे काम पूर्णत्वास न्यावे. नोंदींमध्ये त्रुटी राहता कामा नये.


## जाहीर नोटीस

### वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ८८७/२०२६ प्रोसेस नं.७८४०/२०२६
चौ.ता. ३०/०७/२०२६ दिनांक : २०/०६/२०२६

**अर्जदार :** १. धर्मराव शामराव खोडके मु. पो. आपोती खुर्द, ता. जि. अकोला मो. नं. ९३५६२४०२८२ २. इंदूबाई लक्ष्मण ताकसाडे मु. पो. पातोंडा, जउळखेड, ता. अकोट, जि. अकोला. ३. कामिना किसन आढे रा. मु. पो. दानोरी, ता. अकोट, जि. अकोला. ४. रमाताई सुरेश बागडे रा. गणेश नगर, कोठारी लेआउट, गुडधी, अकोला. ता. जि. अकोला. ५. मिरा रविंद्र कुटेमाटे रा. मु. पो. कळशी, अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत :शामराव भगवान खोडके
**पत्ता :-** रा. मु. मारोडी, पो. आपोती खुर्द, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शामराव भगवान खोडके यांचे दि. ०९/०९/२००८ रोजी मारोडी, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २० /०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला


# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

## जिल्ह्यातून २९ हजारहून अधिक कर्जखात्यांची माहिती पोर्टलवर अपलोड

■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराष्ट्र शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६'च्या प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणीसाठी सुरुवात केली आहे. या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी विभागातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी पुढाकार घेऊन कर्जमुक्ती योजनेच्या पोर्टलवर माहिती अपलोड करण्याच्या प्रक्रियेत शंभर टक्के माहिती अपलोड करुन एक आदर्श ठेवला आहे. अकोला जिल्ह्यातून २९ हजार ८८५ खाती अपलोड करण्यात आल्याचे उपनिबंधक कार्यालयातर्फे सांगण्यात आले.

या योजनेचा लाभ प्रत्येक पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विभागातील जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समित्या गठीत करण्यात आल्या असून. या समितीत संबंधित जिल्ह्यांचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक आणि व्यापारी बँकांचे जिल्हा समन्वयक यांचा समावेश आहे. तसेच संबंधित जिल्ह्याचे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था हे समितीचे 'सदस्य सचिव' म्हणून आहेत.

या कर्जमुक्ती योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने जिल्हास्तरावर सूक्ष्म नियोजन व नियंत्रण केले जाणार असून आधार लिंक नसलेल्या कर्ज खात्यांची यादी प्रसिद्ध करून आधार प्रमाणीकरणासाठी विशेष मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत. त्यानुसार पात्र-अपात्र शेतकऱ्यांच्या याद्यांचे पारदर्शक व्यवस्थापन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारींचे तत्पर निवारण करण्यासाठी सर्व विभाग, बँक यांनी समन्वयाने कार्य सुरू केले आहे. विभागातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांची माहिती अपलोड करण्याच्या कामात मोठी आघाडी घेतली आहे. सहकार विभागाकडून प्राप्त दि. ३० जून २०२६ अखेरच्या अहवालानुसार, विभागातील ९९.९० टक्के पात्र सभासदांची (कर्ज खात्यांची) माहिती पोर्टलवर यशस्वीरित्या अपलोड करण्यात आली आहे.

# शिव विजय अग्रवाल सीए फाउंडेशन परीक्षेत जिल्ह्यात प्रथम तर देशात अकरावा



■ प्रतिनिधी | अकोला ■

महानगरातील शिव विजय अग्रवाल याने सीए फाउंडेशन परीक्षेत जिल्ह्यात प्रथम स्थान प्राप्त केले.त्याने या परीक्षेत ४०० पैकी ३५१ गुण मिळवत ऑल इंडिया रँक ११ प्राप्त करून अकोल्याचे नाव देशभरात उज्ज्वल केले.निकाल जाहीर झाल्यानंतर शिव विजय अग्रवाल यांनी आपल्या यशाचे श्रेय आचिवर्स अकादमी चे संचालक सीए श्याम माहेश्वरी यांच्या मार्गदर्शनाला तसेच अकॅडमीचे प्रा ॲड. अंकुश सावना व नितेश शुक्ला यांना दिले. आपल्या यशाबद्दल शिव अग्रवाल याने संतोष व्यक्त केले. करीत अकादमी मध्ये मिळालेले उत्कृष्ट मार्गदर्शन, नियमित चाचण्या, शिस्तबद्ध अभ्यासाचे वातावरण आणि सर्व शिक्षकांचे सातत्यपूर्ण सहकार्य हेच माझ्या या यशामागील सर्वात मोठे बळ ठरले असल्याचे सांगितले'त्याच्या या राष्ट्रीय उपलब्धी बद्दल त्याचे आचिवर्स अकादमी व सर्व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.


## जाहीर नोटीस

### वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ९१३/२०२६ प्रोसेस नं.७९३४/२०२६
चौ.ता. ०३/०८/२०२६ दिनांक : २३/०६/२०२६

**अर्जदार :** १. साहेबराव ज्योतीराम बोलके रा. दुधलम, पातुर नंदापूर, ता. जि. अकोला २. इंदिरा भिमराव पंडीत रा. कवळा, ता. मुर्तीजापूर, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** १. पंजाबराव ज्योतीराम बोलके २. हिंमत ज्योतीराम बोलके दोघेही रा. दुधलम, पातुर नंदापूर, ता. जि. अकोला.
**मयताचा पत्ता :-** मयत : ज्योतीराम चंपत बोलके
**पत्ता :-** रा. दुधलम, पातुर नंदापूर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत ज्योतीराम चंपत बोलके यांचे दि. ०९/०५/२०२१ रोजी राहते घरी दुधलम, पातुर नंदापूर, ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला


# पातूरच्या किड्स पॅराडाईजमध्ये अवतरली 'ज्ञानाची पालखी'

**संत-महापुरुषांना वंदन, पुस्तकांचे पूजन अन् संस्कारमय प्रवेशोत्सवाने नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात**



■ प्रतिनिधी | पातूर ■

शाळेचा पहिला दिवस हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण असतो.या दिवसाला ज्ञान,संस्कार आणि भारतीय परंपरेची जोड देत पातूर येथील किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलमध्ये शैक्षणिक सत्र २०२६-२७ चा प्रारंभ अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात करण्यात आला.शाळेत विद्यार्थ्यांनी शालेय पाठ्यपुस्तके,भारतीय संविधान,ग्रामगीता, तुकाराम गाथा यांसारख्या ज्ञानपर ग्रंथांचे पूजन करून त्यांची पालखी काढली. उत्साहपूर्ण वातावरणात काढण्यात आलेल्या 'ज्ञान दिंडी'ने परिसर संस्कारमय झाला. यावेळी या ज्ञानाच्या पालखीचे पूजन शाळेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे व कार्यकारी संचालिका सौ.ज्योत्स्ना गाडगे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी शाळेच्या प्रवेशद्वारावर संत आणि थोर महापुरुषांच्या प्रतिमा हातात घेऊन विद्यार्थी उभे होते. पालखीसोहळ्यात सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याने या महापुरुषांना वंदन करून त्यांच्या विचारांचा आदर्श जीवनात अंगीकारण्याचा तसेच ज्ञानार्जनासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा संकल्प केला. त्यामुळे शाळेचा प्रवेशोत्सव हा केवळ स्वागताचा कार्यक्रम न राहता विद्यार्थ्यांमध्ये मूल्यशिक्षणाची बीजे रुजविणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला. प्री-प्रायमरीच्या विद्यार्थ्यांचे फुलांचा वर्षाव करून जंगी स्वागत करण्यात आले.

हा अभिनव प्रवेशोत्सव शाळेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे आणि कार्यकारी संचालिका सौ.ज्योत्स्ना गाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक चंद्रमणी धाडसे, नीतू ढोणे,नरेंद्र बोरकर,प्रियंका चव्हाण, बजरंग भुजबटराव, स्वप्निल पाटील,अविनाश पाटील,शुभांगी बोरकर,प्रतीक्षा भारसाकळे,, स्मितल उगले,वैशाली इंगळे,अक्षय तायडे, सदानंद कातखेडे,हरिष सौंदळे,राजश्री खंडारे,तेजस्विनी गवई,समीक्षा डोंगे,यांच्यासह कल्पना वानेरे,रोशनी नकाशे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# विदर्भ चेंबरची नवीन कार्यकारणी गठीत

■ प्रतिनिधी | अकोला ■

गत ९३ वर्षापासून व्यापार व उद्योग क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ची नवीन कार्यकारणी गठीत करण्यात आली. चेंबरचे अध्यक्ष निकेश गुप्ता यांच्या अध्यक्षतेत संपन्न झालेल्या चेंबरच्या वार्षिक आमसभेत प्रमुख पाहुणे म्हणून कॅटचे राष्ट्रीय सचिव तथा दिल्लीचे खासदार प्रवीण खंडेलवाल, राष्ट्रीय अध्यक्ष बी सी भरतीया, खा अनुप धोत्रे उपस्थित होते.



या आमसभेत सर्वांनूमते चेंबरची कार्यकारणी अविरोधपणे घोषित करण्यात आली. यात अध्यक्षपदी निरव वोरा, वरिष्ठ उपाध्यक्ष सिद्धार्थ रुहाटीया,कनिष्ठ उपाध्यक्ष किशोर बाछुका, सचिव निलेश अग्रवाल, सहसचिव संतोष छाजेड, कोषाध्यक्ष श्रीकांत गोयनका, कार्यकारी सदस्य म्हणून राहुल गोयनका ,एड सुभाषसिंह ठाकूर,दिलीप खत्री, मनीष केडिया, राजकुमार राजपाल, किरीट मंत्री, चंचल भाटी,सज्जन अग्रवाल, शांतीलाल भाला, प्रणय कोठारी,योगेश अग्रवाल, राजीव शर्मा, गुलशन कृपलानी, नमन खंडेलवाल,गोविंद बजाज,मधुर खंडेलवाल, सतीश बालचंदानी,राहुल गोसर, पंकज कोठारी, आशुतोष वर्मा,किशोर अग्रवाल,सी ए दीपक अग्रवाल, दिपाली देशपांडे, रविता शर्मा, मनोज अग्रवाल आदींची सर्वानुमते अविरोध निवड करण्यात आली.निवडणूक अधिकारी म्हणून सीए प्रवीण बाहेती, निरंजन अग्रवाल, रमाकांत खंडेलवाल यांनी कामकाज बघितले.आपल्या निवडीवर चेंबरचे नूतन अध्यक्ष निरव वोरा यांनी उपस्थितांचे आभार मानीत शतकाकडे वाटचाल करणाऱ्या विदर्भ चेंबर मध्ये अनेक रचनात्मक उपक्रम राबविणार असल्याचे सांगितले तसेच सर्व पूर्व अध्यक्षांचे आभार मानले. युवा उदयमी ला चेंबर चे सदस्य बनून सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. तर निकेश गुप्ता यांनी नूतन कार्यकारणीला शुभेच्छा देत नूतन कार्यकारणी चेंबरला नवा आयाम देणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. यावेळी चेंबरचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

### वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ९९६/२०२६ प्रोसेस नं.८१८४/२०२६
चौ.ता. १०/०८/२०२६ दिनांक : ०१/०७/२०२६

**अर्जदार :** १. मिलिंद मधुकर ठोंबरे रा. साठे बंगलो कंपाउंड, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ९४२२८०३३२१ २. सौ. सुवर्णा दत्तात्रय रोठे रा. रेणुका नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. ३. सौ. मेघा प्रमोद धोडपकार रा. रवी नगर स्क्वेअर, टिळक नगर, नागपूर, ता. जि. नागपूर. ४. रश्मी अमोद दातार रा. राइट भुसारी कॉलनी, कोथरूड पुणे. ५. शलाका चंद्रशेखर ठोंबरे रा. सिव्हिल कॉलनी, देउळगाव राजा, ता. देउळगाव राजा, जि. बुलढाणा.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : श्रीमती मालती मधुकर ठोंबरे
**पत्ता :-** रा. व्दारा मिलिंद मधुकर ठोंबरे रा. साठे बंगलो कंपाउंड, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्रीमती मालती मधुकर ठोंबरे यांचे दि. २७/११/२००८ रोजी देउळगाव राजा येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १०/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर असे होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला


# त्रिदिवसीय महेश नवमी महोत्सव उत्साहात संपन्न

## योग, रक्तदान, सामाजिक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम व भव्य शोभायात्रेने माहेश्वरी समाज एकत्र आला

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

मूर्तिजापूर तालुका माहेश्वरी संघटनेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही माहेश्वरी समाजाचा त्रिदिवसीय महेश नवमी महोत्सव-२०२६ मोठ्या उत्साहात २१ ते २३ जूनदरम्यान तिडके नगर येथील राधा मंगलम येथे विविध सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रमांनी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त राजश्री सतीश सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली सोमाणी कॉम्प्लेक्स येथे योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर गणेश मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. दुपारी शिवराणा गड वृद्धाश्रम (सिरसो) येथे वृद्धांना फळांचे वाटप करण्यात आले. सायंकाळी पुंडलिक बाबा गोरक्षण, रेपाळखेड येथे समाजातील ज्येष्ठ, महिला मंडळ, प्रगती मंडळ, नवयुवक संघटना व समाजबांधवांच्या उपस्थितीत गौसेवा करण्यात आली.

दुसऱ्या दिवशी बॉक्स क्रिकेट स्पर्धेसह मास्टर शेफ, सामान्य ज्ञान, स्टोरी टेलिंग, चित्रकला,



अंताक्षरी आदी विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. रक्तदान शिबिरात तब्बल ४५ रक्तदात्यांनी सहभाग नोंदविला. माहेश्वरी महिला मंडळाने कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित (एआय) नाटिका सादर केली. तसेच प्रगती मंडळाच्या वतीने सुमारे ३५ बालकांनी सादर केलेल्या १२ ज्योतिर्लिंगांच्या कहाणीवरील संगीतमय प्रस्तुतीने उपस्थितांची विशेष दाद मिळविली.

समारोपाच्या दिवशी महेश पूजन, स्वागत गीत व स्वागत नृत्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाध्यक्ष श्यामसुंदर विजयकुमार सोमाणी यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख अतिथी म्हणून ठाकुरदास सुखदेव मालाणी (अमरावती) व सीए नीरज नंदकिशोर राठी (अकोला) उपस्थित होते. यावेळी माहेश्वरी समाज ट्रस्टचे अध्यक्ष रामेश्वर बुब, तालुका माहेश्वरी संघटनेचे अध्यक्ष पुरुषोत्तम डागा, महिला मंडळाच्या अध्यक्षा डॉ. सरिता सिकची, नवयुवक संघटनेचे अध्यक्ष सचिन चांडक तसेच प्रगती मंडळाच्या अध्यक्षा सपना साबू यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात ज्येष्ठ दाम्पत्य, मातामह, विविध क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या व्यक्ती, डीएम व एमडी पदवी प्राप्त डॉक्टर तसेच एमएच-सीईटी, बारावी व दहावी परीक्षेत प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. प्रमुख अतिथींनी समाजबांधवांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्तिक सोमाणी यांनी केले.

सायंकाळी संजय डागा यांच्या निवासस्थानापासून भव्य शोभायात्रेला प्रारंभ झाला. पारंपरिक वेशभूषेतील महिला-पुरुषांचा उत्स्फूर्त सहभाग, ट्रॅक्टरवरील भगवान शिवाची आकर्षक देखावा आणि ढोल-ताशांच्या गजरात निघालेली शोभायात्रा पोळा चौक, रेल्वे स्टेशन, बसस्थानक व शिवाजी चौक मार्गे राधा मंगलम येथे पोहोचली. महाआरती, विविध स्पर्धांच्या बक्षीस वितरण व स्नेहभोजनाने महोत्सवाची सांगता झाली. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी नवयुवक संघटना, महिला मंडळ, प्रगती मंडळ तसेच सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे नियोजन तालुका माहेश्वरी संघटनेचे अध्यक्ष पुरुषोत्तम डागा व सचिव हरीश राठी यांनी केले.


जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.


संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २०६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# नांदगाव बाजार समिती उपसभापती पदी अर्चना कणसे अविरोध

**नांदगाव खंडेश्वर/ प्रतिनिधीः**-स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापती पदासाठी शुक्रवार ३ जुलै रोजी झालेल्या निवडणुकीत अर्चना संदीप कणसे यांची एकमताने अविरोध निवड करण्यात आली. झालेल्या निवडणुकीत उपसभापती पदासाठी अर्चना कणसे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज होता. त्यांच्या विरोधात उमेदवारी अर्ज नसल्याने अर्चना कणसे उपसभापती पदासाठी अविरोध विजयी ठरल्या. बाजार समितीचे उपसभापती विलास पाटील सावदे यांनी उपसभापती पदाचा राजीनामा दिला. त्यामुळे बाजार समितीत उपसभापती पद रिक्त होते. तेव्हा ३ जुलै रोजी उपसभापती पदाची निवडणूक पार पडली. निवडणूक प्रक्रिया अध्यासी अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था सचिन पतंगे व सहाय्यक आशिष भांडे यांनी निवडणुकीचे कामकाज सांभाळले. निवडणूक प्रक्रिये वेळी सहकार नेते तथा जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अभिजीत पाटील ढेपे, बाजार समितीचे माजी सभापती विलास पाटील चोपडे यांची प्रमुख



उपस्थिती होती. याशिवाय विद्यमान सभापती डॉ. राजेंद्र पांडे, संचालक प्रभात ढेपे, विलास सावदे, प्रमोद ठाकरे, ज्ञानेश्वर हांडे, गजानन ढेरे, पंकज ठाकरे, धनंजय मेटकर, सोनाली लेंडे, अर्चना कणसे, अंकुश कोल्हे, गजानन सावदे, विजय अजबले, दीपक सवाई, ओम प्रकाश साबळे, जितेश जंगडा, विवेक वैष्णव ,मोहम्मद जावेद या संचालकासह संदीप कणसे व गजानन खोडे यांची उपस्थिती होती.

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३१९/२०२६ ने.ता.०७.०८.२०२६

**अर्जदार :** १. ज्ञानेश्वर बापुराव मनगटे, वय ६३ धंदा - मजुरी
२. ऋतुजा ज्ञानेश्वर मनगटे, वय २६ धंदा - शिक्षण
३. तनुजा ज्ञानेश्वर मनगटे, वय २१ धंदा - शिक्षण
रा.देलवाडी, ता.जि.वर्धा

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत सुनिता ज्ञानेश्वर मनगटे** यांचा मृत्यू दिनांक **१५.०५.२०२३** रोजी शिरजगांव बंड,, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच **मृतक सुलोचना भाऊराव गहुकर** यांचा मृत्यू दि.**०४.१०.२०२०** रोजी पुलगांव, ता.देवळी, जि.वर्धा येथे झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३१९/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााणपत्र देण्यात येईल.

आज दि.**३०.०६.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 10/2026 कलम ५०-अ (३) पुढील तारीख २८.०७.२०२६
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जैन दिगंबर मंदिर अनाथालय, जैन विद्यादान पाठशाळा, अमरावती, जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री.किरण जयकुमार गरीबे व ईतर**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मा. धर्मादाय सहआयुक्त अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ५०-अ (३) अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--
(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत -** परिशिष्ट-१ प्रमाणे
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - परिशिष्ट-१ प्रमाणे

सदर प्रकरण महा.सार्वजनिक विश्श्वस्त व्यवस्था अाधिनियम १९५० च्या कलम ५०-अ (३) अन्वये न्यायिक बोर्डवर दाखल झालेले आहे.

प्रस्तावित योजनेप्रमाणे दुरुस्तीचा अर्ज दाखल केला आहे.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.धर्मादाय उपआयुक्त, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **३०.०६.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

**मा.दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.)क्र.१७९/२०२६ ने.ता.३०.०७.२०२६

**अर्जदार :** १. अरुण बळीराम बलखंडे,
रा.रामायण नगर, यवतमाळ रोड, बडनेरा, जि.अमरावती
२. भाष्कर बळीराम बलखंडे,
रा.श्री.गोविंद रॉयल रेसिडेन्सी, मालु लेआऊट, कलोती नगर, रुक्मिणी नगर, अमरावती
३. प्रमिला सोमेश्वर गुल्हाने, रा.जवळा धोतरा, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **बळीराम तुळशीराम बलखंडे** यांचा मृत्यू दि.**०८.०१.२००२** रोजी पापळ, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. तसेच **लक्ष्मीबाई बळीराम बलखंडे** यांचा मृत्यू दि. **०१.०२.२००७** रोजी पापळ, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला आहे. अर्जदार नं.१ व २ ही मुले, अ.नं.३ ही मुलगी आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०२ जुलै २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२०५/२०२६
**रुपाली व एक -वि- निरंक**
पुढील ता.०३.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Rupali Brijeshkumarsing Chauhan,Age 41 Yrs. Occu.: Pvt.Job R/o/ H.No.950/Jail Road, Bichhu Takadi, Amravati.
2. Lalit Rambhau Gawande, Age 36 Yrs. Occu.: Labour R/o Near Hanuman Mandir, Jail Quarter, Bus Stop,Camp,Amt.

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Rambhau Narayanrao हे दिनांक 04.11.2011 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. तसेच मयत Usha Rambhau Gawande हे दिनांक 29.10.2021 रोजी **अमरावती** येथे मयत झाल्या. अर्जदार Rupali Brijeshkumarsing Chauhan+1 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Rupali Brijeshkumarsing Chauhan+1 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्क:**
**९४२२८५७१६१,**
**९४२२९१८५६९**

---

## जाहीर नोटीस

मा.शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांचे ना हरकत पत्र क्र.जा.क्र.शिउसं/माध्य/क/३०२/२०२४ अम-वाशिम/हस्तांतरण ई ऑफिस/१०३५३२८ दि.३०/०६/२०२६ नुसार शाळा हस्तांतरणासाठी जाहिराती प्रसिध्दी करिता देण्यात आलेल्या नाहरकत प्रमाणपत्रानुसार श्री अरिहंत अल्पसंख्याक शिक्षण संस्था, ता.मानोरा, जि.वाशिम व रामचंद्र युवक कल्याण संस्था, मोझरी,ता.तिवसा, जि.अमरावती या संस्थेच्या वतीने जाहीर नोटीस देतो की,संस्थेने ठरविल्याप्रमाणे रामचंद्र युवक कल्याण संस्था,मोझरी ता.तिवसा,जि.अमरावती व्दारा संचालित श्री विद्यानिकेतन भिवापुर ता.तिवसा, जि.अमरावती ही शाळा श्री अरिहंत अल्पसंख्याक बहुउदेशिय शिक्षण संस्था,मानोरा, ता.मानोरा, जि.वाशिम र.नं.एफ ११४६३ या संस्थेत हस्तांतरण करावयाचे आहे. सदर प्रक्रियेच्या अनुषंगाने शासकीय, निमशासकीय व्यक्ती, हक्क, उजर,किंवा तक्रारी असल्यास याबाबत योग्य कागदपत्रांनिशी जाहीर नोटीस प्रकाशित झाल्याचे तारखेपासून १५ दिवसाचे आत तक्रारी सादर कराव्या. त्यानंतर कोणाचेही काही म्हणणे नाही असे गृहीत धरुन सदर हस्तातरण प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. मग कोणाचीही तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही, करिता ही जाहीर नोटीस प्रकाशित.

**तक्रार दाखल करावयाचा पत्ता**
०१- मा.शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.अमरावती
शिक्षणाधिकारी (माध्य) कार्यालय, अमरावती
०२- अध्यक्ष,रामचंद्र युवक कल्याण संस्था मोझरी
ता.तिवसा, जि.अमरावती
०३- अध्यक्ष श्री अरिहंत बहुउदेशिय शिक्षण संस्था
जि.प.शाळेसमोर वसंत नगर दिग्रस रोड मानोरा
ता.मानोरा जि.वाशिम

---

Sant Gadge Baba Amravati University
Shri Shivaji Education Society, Amravati's

## DR.PANJABRAO DESHMUKH COLLEGE OF LAW, AMRAVATI

MORSHI ROAD, AMRAVATI

**INTERVIEW**

ACADEMIC SESSION 2026-27

Application are invited for the post of Lecturer in Law as contributory (CHB) Lecturer (Three Years Degree Course - Grant in Aid) for the Session 2026-27 i.e. teaching period prescribed by the SGBAU, Amravati. The details of th e posts, reservation and eligibility criteria as under :-

**Three Years Degree Course (Grant in Aid)**

| Sr. No. | Subject/ Course | Category as per Govt.Circular Dt.1-10-2025 | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | SC | ST | VJ (A) | NT (B) | NT (C) | NT (D) | SBC | OBC | EWS | OPEN | TOTAL |
| 1. | Law | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | 14 | 14 |

**Eligibility Criteria :**

Academic Qualification shall be as per U.G.C. Regulation 2018 (University Direction No.082019 & 14/2019) for the post of Assistant Professor as directed in the Govt. Regulation No. sankirn-2018/(185/18)/MS-3, Dt.14.11.2018. The other conditions and remuneration shall be as fixed by Govt. in the said G.R.

The interested candidate should submit their applications with attested copies of documents in proof of their qualification and shall remain present for interview at **11.00 to 01.00 p.m.** on **08.07.2026** in the College office along with original documents & resume.

**Note : Application are invited till Dt.06/07/2026 Upto 5.00 pm.**

**Shri Harshwardhan P.Deshmukh,**
**President,**
**Shri Shivaji Education Society,**
**Amravati.**

**Dr.Varsha N.Deshmukh**
**Principoal**
**Dr.Panjabrao Deshmukh College of Law**
**Amravati.**

---

## सूचना

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२**
**दिनांक २३.०३.२०२६**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

शासन सूचना क्र. टीपीएस-१८२५/१७९/प्र.क्र.३४/२०२५/भारत मंडपम/कन्व्हेशन सेंटर/सूचना/नवि-१३ - ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका व काही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्रांकरीता लागू करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (यापुढे जिचा उल्लेख **उक्त नियमावली** असा करण्यात आलेला आहे) मधील तरतुदीनुसार, शासन अधिसूचना क्र.टीपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/वियो.व प्रायो./कलम ३७ (१कक)(ग) व कलम २०(४)/नवि-१३, दि.०२.१२.२०२० अन्वये मंजुरी दिली असून उक्त नियमावली दि.०३.१२.२०२० पासून अंमलात आली आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाने शासन निर्णय क्र. टीपीएस-१८२५/१७९/प्र.क्र.३४/२०२५/नवि-१३, दि.२०.०३.२०२५ अन्वये भारत मंडपम सांस्कृतिक केंद्राच्या धर्तीवर राज्यातील सात महानगरपालिकांच्या क्षेत्रामये **भारत मंडपम या नामाभिधानाने** किमान ३० एकर क्षेत्राखालील जागा आरक्षित ठेवण्याकरीता उक्त अधिनियमान्वये कलम ३७(१) अन्वयेचा परिपूर्ण फेरबदल प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या अनुषंगाने उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वयेचे निदेश पारित केले आहेत. (यापुढे **उक्त निदेश** असे संबोधिले आहे.)

आणि ज्याअर्थी, शासनाने दि.२.०३.२०२५ रोजी पारित केलेल्या उक्त निदेशानुसार भारत मंडपम सांस्कृतिक केंद्राच्या धर्तीवर राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांच्या मंजूर विकास योजनेमधील **भारत मंडपम / कन्व्हेशन सेंटर** या नामाभिधानाचे आरक्षणाचे सुयोग्य विकसनाच्या दृष्टीने उक्त नियमावलीच्या विनियम क्र.११.१ () मध्ये नवीन तरतुद क्र.८(ए) व त्यासह विनियम क्र.४.२७.५ (वाय) या दोन तरतुदी नव्याने समाविष्ट करणे आवश्यक आहे असे शासनाचे मत झाले आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख **उक्त फेरबदल** असा करण्यात आलेला आहे.)

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक)(क) व कलम ३०(३) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तदनुषंगिक शक्तीचा वापर करुन, उक्त फेरबदलावर जनतेकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिध्द करीत आहे. उक्त फेरबदलावरील कोणत्याही सूचना/हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात पसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना यांचेकडे दाखल करता येतील. विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्राप्त सूचना/हरकतीवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी शासनातर्फे **अधिकारी** म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख **उक्त अधिकारी** असा करण्यात येत आहे.)

ही सूचना, कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरीता जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात उपलब्ध राहील.

१) विभागीय सहसंचालक, नगर रचना, कोकण/पुणे/नागपूर/नाशिक/अमरावती/छत्रपती संभाजीनगर विभाग
२) आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता)
३) जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे
४) महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे
५) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४
६) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि.मुंबई
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण
८) सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे/नवनगर विकास प्राधिकरणे
९) मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व जिल्हा परिषदा
१०) मुख्याधिकारी (सर्व नगर परिषदा/नगर पंचायती)

ही सूचना शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) वर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशाानुसार व नावाने

**(वि.मा.का./अम/जाही/३०६/२०२६-२०२७)**

**स्वा/-**
**(प्रणव कर्पे)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

---

**मा.दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.)क्र.१९७/२०२६ ने.ता.३०.०७.२०२६

**अर्जदार :** १. रामेश्वर हिंमतराव मुंदे,
२. गजानन हिंमतराव मुंदे
३. विलास हिंमतराव मुंदे
१ ते ३ रा.चाकोरा, पो.वडुरा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
४. लिलाबाई प्रकाश उगले, रा.दहिगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
५. पुष्पा रामदास हेरोडे, रा.पिंपळगांव बैनाई, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **नर्मदा हिंमतराव मुंदे** यांचा मृत्यू दि.**०४.०७.२०१७** रोजी चाकोरा सिध्दनाथपूर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. तसेच मयतांचे पती **हिंमत पुंजाजी मुंदे** यांचा मृत्यू दि. **०८.११.२०१२** रोजी सिध्दनाथपूर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला आहे. अर्जदार नं.१ ते ३ ही मुले, अ.नं.४ व ५ ह्या मुली आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०२ जुलै २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२४०/२०२६
**शुभांगी अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२०.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Shubhangi Jitendra Bhalerao,Age 36 Yrs. Occu.: Housewifed
2. Netra Jitendra Bhalerao, Age 04 Yrs. Occu.: Education
3. Sushil Wamanrao Bhalerao, Aged 65 Yrs. Occu.: Household
Appli.No.2 being minor through Appli.No.1 natural guardian as mother.
All R/o Near Kanwar Nagar, Kamala Nehru Nagar, Rukhmini Nagar, Amravati

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **जितेंद्र वामनराव भालेराव** हे दिनांक 04.01.2026 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शुभांगी व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शुभांगी व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२०८/२०२६
**सुधाकर व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१२.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Sudhakar Ramraoji Kukade, Age 64 Yrs. Occu.: Agriculturist R/o Yawal Pura, Nandgaon Peth, Tq. Dist. Amravati.
2. Sau.Poonam Praful Karale, Age 37 Yrs. Occu.: Household R/o Ward No.1, Bharwadi Tq. Tiosa, Dist. Amravati.
3. Sau.Nita Prabhakar Fartad, Age 33 Yrs. Occu.: Household R/o Anandwadi Chistur, Tq. Aashti, Dist.Wardha.
4. Manisha Sudhakar Kukade, Age 30 Yrs. Occu.: Service
5. Ku.Kalyani Sudhakar Kukade, Age 26 Yrs. Occu.: Student
6. Vishal Sudhakarrao Kukade, Age 26 Yrs. Occu.: Student
No.4, 5, 6 R/o Yawal Pura, Nandgaon Peth, Tq. Dist. Amravati.

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शोभा सुधाकर कुकडे** हे दिनांक 11.08.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुधाकर व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुधाकर व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२१०/२०२६
**सुचित्रा अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०४.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Suchitra Sanjay Mahatme,Age 59 Yrs. Occu.: Housewife R/o/ AD-02, Kasliwalaangan, Dnyaneshwar Nagar, Aurangabad
2. Sushil Surendra More, Age 54 Yrs. Occu.: Business R/o Near Amba Tower, Ravi Nagar, Amravati.
3. Sanjyot Surendra More, Aged 53 Yrs. Occu.: Business R/o Ravi Nagar, Amravati.

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Surendra Ramchandra More हे दिनांक 06.08.2016 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. तसेच मयत Sunita Surendra More हे दिनांक 05.11.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाल्या. अर्जदार Suchitra Sanjay Mahatme+2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Suchitra Sanjay Mahatme+2 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३०.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२९०/२०२६
**सुमन व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२४.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Suman Devidas Ware, Age 61 Yrs. Occu.: Household
2. Pankaj Devidas Ware, Age 45 Yrs. Occu.: Labour
3. Sunil Devidas Ware, Aged 39 Yrs. Occu.: Household
4. Aarti Devidas Ware, Age 43 Yrs. Occu.: Household
All R/o Behind Karan Bar, Hamalpura, Amravati.

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **देविदास बळीराम वारे** हे दिनांक 07.03.2010 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुमन व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुमन व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०१.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२०९/२०२६
**पारुल व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०६.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Parul Govind Purwar, Age 56 Yrs. Occu.: Household
2. Ayushi Govind Purwar (After Marriage Ayushi Shivam Gupta), Age 30 Yrs. Occu.: Job
Both R/o Girdhar Metals, Bartan Bazar, Amravati.
3. Anurag Govind Purwar, Aged 26 Yrs. Occu.: Business R/o Plot No.66, Ghanshyam Nagar, Amravati

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **गोविंद प्रेमचंद पुरवार** हे दिनांक 16.10.2024 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **पारुल व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पारुल व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२२.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २९६**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# महाकर्जमुक्ती योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांना दिलासा

## कर्जमुक्तीचा लाभ मिळेपर्यंत थकीत रकमेवर व्याज आकारू नयेत; शासनाचे स्पष्ट आदेश

**अमरावती/का.प्र.**

राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना आणखी एक मोठा दिलासा देण्यात आला आहे. योजनेचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईपर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी पात्र थकीत पीककर्जाच्या रकमेवर कोणत्याही प्रकारची व्याज आकारणी करू नये, असे स्पष्ट आदेश राज्य शासनाने दिले आहेत. या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने बुधवारी १ जुलै रोजी शासननिर्णय जारी केला आहे.

या संदर्भातील सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने बुधवारी १ जुलै रोजी शासननिर्णय जारी केला आहे. राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने २ जून २०२६ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना मंजूर केली असून सध्या या योजनेची अंमलबजावणी सुरू आहे. या योजनेनुसार ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या पात्र अल्पमुदतीच्या पीककर्जासाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जाणार आहे. दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर त्यांना एकवेळ समझोता (ओटीएस) योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतचा लाभ मिळणार असून, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद आहे.

या योजनेसाठी शासनाने मानक कार्यपद्धती (एसओपी) तयार केली असून, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांकडून पात्र कर्जखात्यांची माहिती संगणकीय प्रणालीवर अपलोड करण्याचे काम सुरू आहे. त्यानंतर कर्जखात्यांची पडताळणी, अपात्र खात्यांचे वगळणे, लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण आणि कर्जमाफीची रक्कम संबंधित खात्यात जमा करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.




ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी काही कालावधी लागणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

ही प्रक्रिया सुरू असताना शेतकऱ्यांच्या थकीत पीककर्जावर व्याजाची वाढ होऊ नये आणि कर्जमाफीचा लाभ मिळाल्यानंतर त्यांना नव्याने पीककर्ज उपलब्ध होण्यात अडथळे येऊ नयेत, यासाठी शासनाने हा निर्णय घेतला आहे. त्यानुसार कर्जमाफी आणि एकवेळ समझोता (ओटीएस) योजनेस पात्र असलेल्या शेतकऱ्यांच्या पात्र थकीत रकमेवर १ एप्रिल २०२६ पासून ते कर्जमाफीचा प्रत्यक्ष लाभ खात्यात जमा होईपर्यंत कोणतेही व्याज आकारू नये, असे आदेश देण्यात आले आहेत.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७९-अ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून हा आदेश जारी करण्यात आला असून, तो राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांना लागू राहणार आहे.

# रविवारी गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार

**अमरावती/का.प्र.**

भारतीय बौद्ध महासभेच्या तालुका पुरुष व महिला शाखा, दर्यापूर यांच्या विद्यमाने माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा २०२६ मध्ये प्राविण्य प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार समारंभ रविवार ५ जुलै रोजी दुपारी १२ वाजता दीक्षाभूमी नगर, भीमनगर, दर्यापूर येथील तथागत बुद्ध विहार, राष्ट्रसंत गाडगेबाबा संस्थान रोड येथे आयोजित करण्यात आला आहे.

भारतीय बौद्ध महासभा तालुका पुरुष व महिला शाखा, दर्यापूर यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. यामध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील इयत्ता दहावीमध्ये ९० टक्क्यांपेक्षा अधिक आणि बारावीमध्ये ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका अध्यक्ष मुरलीधर रायबोर्ड राहणार असून, राज्य संघटक विजयकुमार चौरपगार व उपविभागीय दंडाधिकारी बळवंतराव अरखराव हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. नितीन कोळी, दर्यापूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजित राठोड, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. मुकेश सरदार तसेच वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष संजय चौरपगार उपस्थित राहणार आहेत. याशिवाय विविध सामाजिक, शैक्षणिक व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून, पीएच.डी. पदवी प्राप्त केल्याबद्दल डॉ. प्राजक्ता जयदीप दुधंडे तसेच सेवानिवृत्त झाल्याबद्दल गजानन वर्धे यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

कार्यक्रमास तालुक्यातील सर्व गुणवंत विद्यार्थी, पालक, बौद्ध उपासक-उपासिका तसेच समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भारतीय बौद्ध महासभा तालुका पुरुष व महिला शाखा, दर्यापूरच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे. कार्यक्रमास उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत सोबत आणावी, असेही आयोजकांनी कळविले आहे.

# जपानी कराटे प्रशिक्षण शिबिराचा समारोप

## महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण

**अमरावती/का.प्र.**

'आजकाल महिलांसाठी, विशेषतः तरुण महिलांसाठी, स्वतःचे संरक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. हे साध्य करण्यासाठी, तरुण महिला आणि मुले या दोघांसाठीही कराटे शिकणे हा पहिला पर्याय बनला आहे. अभिजीत बहुउद्देशीय सामाजिक विकास संस्थेअंतर्गत ऑल इंडिया किलर ऑफ द ड्रॅगन मार्शल आर्ट्स असोसिएशनने आयोजित केलेल्या ५० दिवसीय कराटे प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले होते.

या कार्यक्रमाला महापौर श्रीचंद तेजवानी, सुदर्शनजी जैन, प्रा. डॉ. अरुणा वाडेकर, डॉ. मंगेश मेंढे, पी. बी. इंगळे, एल. जे. वानखेडे आणि दाई सेंसाई राजुजी नन्नवारे मंचावर उपस्थित होते. या कार्यक्रमातबेस्ट स्टूडेंट्स



ऑफ द ईयर पुरस्कार विपुल आखरे यांना प्रदान करण्यात आला. बेस्ट फीमेल कराटे फाइटर ऑफ द ईयर पुरस्कार मनश्री मेंढे आणि परोल उइके यांना प्रदान करण्यात आला.बेस्ट मेल कराटे फाइटर ऑफ द ईयर पुरस्कार अर्णित इंगळे यांना प्रदान करण्यात आला. टीम मैनेजमेंट एक्सलेंस अवार्ड राजीव ठवरे यांना प्रदान करण्यात आला.

कराटे प्रशिक्षण केंद्र सुरू झाल्यापासून पूर्वा पकडे एक उत्कृष्ट विद्यार्थिनी म्हणून प्रशिक्षण घेत आहे. आज ती एक ब्लॅक बेल्ट होल्डर आहे. पुढील शिक्षणासाठी तिला शहराबाहेर जावे लागणार असल्याने, आज मान्यवरांच्या हस्ते तिचा सन्मान करून तिला निरोप देण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन सलीमभाई मिरावाले यांनी केले. या कार्यक्रमात सेंपाई आयुषी शुक्ला, सेंपाई पूर्वा पकडे, गौरी धनुष्यकर, श्रुती ढोके, परोल उईके, अर्णव भगत, राजीव ठवरे आणि विद्यार्थ्यांचे पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच एकता रॅली समितीच्या पदाधिकारी पी.बी. इंगळे, एल.जे.वानखडे, कुमुद पाचपोर, अरुण बनारसे, विजय पाटील सह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या ऑनलाइन परीक्षा पद्धतीला युवक काँग्रेसचा विरोध

# निर्णय मागे न घेतल्यास राज्यव्यापी लोकशाही आंदोलनाचा इशारा

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (MPSC) संयुक्त गट 'क' परीक्षा ऑनलाइन Computer Based Test (CBT) पद्धतीने घेण्याचा तसेच सन २०२७ पासून गट 'अ', 'ब' व 'क'च्या पूर्व परीक्षा टप्प्याटप्प्याने CBT पद्धतीने आयोजित करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयाला महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसने तीव्र विरोध दर्शवित तात्काळ निर्णय मागे घेण्याची मागणी केली आहे. अन्यथा १२ जुलैनंतर राज्यव्यापी लोकशाही आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

अमरावती येथे आयोजित पत्रकार परिषदेत युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, राज्यातील लाखो स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचा श्इएणवर विश्वास असून, यापूर्वी विविध विभागांच्या ऑनलाइन परीक्षांमध्ये तांत्रिक अडचणी, सर्व्हर समस्या, गैरव्यवहार आणि पारदर्शकतेबाबत प्रश्न उपस्थित झाले होते. त्यामुळे MPSCच्या परीक्षाही ऑफलाइन (OMR/लेखी) पद्धतीनेच घेण्यात याव्यात, अशी विद्यार्थ्यांची मागणी असल्याचे त्यांनी नमूद केले.

युवक काँग्रेसने आयोगाच्या २६ जून रोजीच्या परिपत्रकातील अनेक मुद्द्यांवर आक्षेप घेतला. परिपत्रकातील मुद्दा क्रमांक ३ आणि ८ हे परस्परविरोधी असल्याचा दावा करण्यात आला.



एका बाजूला मनुष्यबळ, सुरक्षा आणि प्रशासकीय अडचणींचा उल्लेख करण्यात आला असताना दुसऱ्या बाजूला ऑनलाइन परीक्षा घेण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध असल्याचे नमूद करण्यात आल्याने आयोगाने याबाबत स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी करण्यात आली.

तसेच, उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, तामिळनाडू आणि केरळ या राज्यांमध्ये गट 'अ', 'ब' व 'क'च्या परीक्षा पूर्णपणे CBT पद्धतीने होत असल्याचा आयोगाचा दावा वस्तुस्थितीला धरून नसल्याचा आरोप युवक काँग्रेसने केला. संबंधित राज्यांमध्ये अनेक भरती परीक्षा अद्याप ऑफलाइन पद्धतीनेच होत असल्याचे सांगत यासंदर्भातील पुरावे सादर करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

मुख्य परीक्षेसाठी प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र परीक्षा शुल्क आकारण्याच्या निर्णयालाही युवक काँग्रेसने विरोध दर्शविला. या निर्णयामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असून समान संधीच्या तत्त्वाला धक्का बसेल, असा दावा करण्यात आला.

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांनी राज्यातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाठीशी युवक काँग्रेस ठामपणे उभी असल्याचे सांगितले. तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, आ.सतेज पाटील, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्यासह काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांनीही विद्यार्थ्यांच्या मागण्यांना पाठिंबा दिल्याचे यावेळी सांगण्यात आले.

१२ जुलै पूर्वी MPSCने ऑनलाइन CBT परीक्षा पद्धती आणि मुख्य परीक्षेच्या शुल्काबाबतचे निर्णय मागे घेतले नाहीत, तर राज्यभरातील विद्यार्थी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करतील.

अमरावती शहर युवक काँग्रेसही या आंदोलनात सक्रिय सहभाग घेईल, असा इशारा पत्रकार परिषदेत देण्यात आला. यावेळी या पत्रकार परिषदेला वैभव देशमुख, समीर जवंजाळ, अक्षय साबळे, आशिष यादव, कुलदीप विधळे, राहुल साबळे, राहुल बागडे, संकेत साहू, धनंजय बोबडे, कृणाल गावंडे, प्रियाल मोहोड, प्रफुल्ल तंतरपाळे, ओम कुबडे या युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांसह कुलदीप विधळे, भूपेंद्र राजपूत हे विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते.

## जी.एच.रायसोनी विद्यापीठतात विद्यार्थ्यांचे स्वागत

# 'आरंभ' इंडक्शन कार्यक्रम उत्साहात

**अमरावती/का.प्र.**

जी एच रायसोनी विद्यापीठ, अमरावती येथे बी.टेक, बीसीए आणि बीबीए प्रथम वर्षाच्या नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे हार्दिक स्वागत करण्यासाठी 'आरंभ' हा भव्य इंडक्शन कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित करण्यात आला. विद्यापीठ परिसरात आयोजित या कार्यक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना संस्थेचे शैक्षणिक वातावरण, समृद्ध संस्कृती आणि अत्याधुनिक सुविधांशी परिचित करून देणे हे होते.

कार्यक्रमास सुरुवात डॉ. मुकेश कुमार (बी.टेक प्रथम वर्ष समन्वयक), डॉ. भावना करमोरे (बीसीए विभागप्रमुख) आणि डॉ. राजकुमार झा (मॅनेजमेंट स्टडीज स्कूलचे डीन) यांच्या स्वागत भाषणाने



झाली. त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी नव्या बॅचला आत्मविश्वासाने आणि उत्साहाने शैक्षणिक प्रवास सुरू करण्याची प्रेरणा दिली.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. स्नेहील जायस्वाल यांनी विद्यापीठाच्या उपलब्धी, पायाभूत सुविधा आणि समग्र शिक्षणाच्या वचनबद्धतेवर प्रकाश टाकणारे व्याख्यान दिले. त्यानंतर कुलगुरू डॉ. विनायक एस. देशपांडे यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यापीठाचे ध्येय, दृष्टिकोन आणि मूल्ये यांचा उल्लेख करताना विद्यार्थ्यांना उपलब्ध संधींचा अधिकाधिक फायदा घेण्याचे आणि समाजासाठी सकारात्मक योगदान देण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमातील मुख्य आकर्षण म्हणजे मार्गदर्शित कॅम्पस टूर, विद्यार्थी आणि पालकांनी आधुनिक ग्रंथालये, सुसज्ज प्रयोगशाळा, प्रगत संगणक केंद्रे आणि विशाल क्रीडा संकुल यासह विद्यापीठाच्या अत्याधुनिक सुविधांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. सर्वांनी सुविधांबद्दल समाधान व्यक्त केले.या कार्यक्रमात ६० हून अधिक नवीन विद्यार्थी, त्यांचे पालक आणि २० प्राध्यापक सहभागी झाले होते. नवीन विद्यार्थ्यांनी प्राध्यापक आणि सहविद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि विद्यापीठ जीवनाबाबत आपल्या आकांक्षा आणि अपेक्षा व्यक्त केल्या.विद्यार्थी आणि पालकांकडून 'माहितीपूर्ण, आकर्षक आणि आश्वासक' असे सकारात्मक अभिप्राय प्राप्त झाले. विद्यापीठ प्रशासनाने सांगितले की, असे ओरिएंटेशन कार्यक्रम शाळेतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकडे सहज संक्रमण करण्यास आणि संस्थेशी सख्त संबंध निर्माण करण्यास महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

# मंडप व्यवसायाला अत्यावश्यक सेवेचा दर्जा द्या

## आ. महेश लांडगे यांच्या मागणीचे स्वागत

**छत्रपती संभाजीनगर-** महाराष्ट्र विधान मंडळाच्या पावसाळी अधिवेशनात भाजपचे आ. महेश लांडगे यांनी मंडप व्यवसायाला 'अत्यावश्यक सेवा' म्हणून मान्यता देण्याची मागणी केल्याचे मंडप व्यावसायिकांकडून स्वागत करण्यात आले आहे.

सण-उत्सव, धार्मिक कार्यक्रम, विवाह समारंभ तसेच शासकीय कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनामध्ये मंडप व्यवसायाची महत्त्वपूर्ण भूमिका असून, या क्षेत्रावर लाखो कामगारांचा रोजगार अवलंबून आहे. त्यामुळे या व्यवसायाला अत्यावश्यक सेवेचा दर्जा देऊन शासनाने आवश्यक सुविधा व संरक्षण द्यावे, अशी मागणी आ.लांडगे यांनी अधिवेशनात केली.मंडप व्यवसायिकांना काम करताना विविध प्रशासकीय आणि तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागते. या समस्या विधिमंडळात प्रथमच प्रभावीपणे मांडला गेल्याने मंडप व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

जय म्हणाले, ग्राहकांच्या गरजेनुसार दिवस-रात्र, कोणत्याही वेळेत सेवा देणे मंडप व्यवसायिकांचे कर्तव्य असते. पाऊस, उन्हाळा किंवा इतर कोणत्याही अडचणींची पर्वा न करता कार्यक्रमांची संपूर्ण व्यवस्था उभी करण्यासाठी ते सातत्याने कार्यरत असतात.अनेक अडचणींवर मात करून हा व्यवसाय समाजाला अखंड सेवा देत असून, शासनाने त्याची दखल घेऊन अत्यावश्यक सेवेचा दर्जा देण्याचा निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## संक्षिप्त



### वृद्धांची सेवा हिच ईश्वर सेवा-संजय सरवटकर

**अमरावती-**स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ (महाराष्ट्र राज्य) अमरावती जिल्हाध्यक्ष व राजमाता जिजाऊ बहुउद्धेशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तसेच फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते संजय सरवटकर यांचा वाढदिवस स्थानिक जेवडनगर (दस्तूरनगर) येथील सुखशांती वृद्धाश्रमात विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी पं. स.सदस्या व जेष्ठ समाजसेविका कल्पना बुरांगे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रभात एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष वि. दा. पवार, माजी ऊर्जा व परिवहन राज्य मंत्री सुधाकर गणगने यांच्या धर्मपत्नी सुरेखा गणगने, अवधूत शेंद्रे उपस्थित होते. भास्करजी काळे, दीपक खडसे, कैलास इंगळे यांचाही वाढदिवस असल्यामुळे त्यांचाही सत्कार करण्यात आला. तसेच दैनिक चालू वार्ता तर्फे जेष्ठ साहित्यिक मालती चांदुरकर, व लक्ष्य अकॅडेमीच्या संचालिका डॉ. प्रीती तट्टे यांना 'नारी गौरव' पुरस्काराने गौरवण्यात आले. कार्यक्रमाला अमीर शहा, श्रीकृष्ण नाईक,सचिन सरोदे,किसन वानखडे, तिवारी,विजय हरणे पाटील,गजानन सावंत, शंकरराव खंडारे (बडनेरा ),गोपाल सोळंके, मेघा चांदुरकर तसेच संघटनेचे असंख्य पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, सेवाभावी, वृद्धाश्रमातील सर्व कर्मचारी वर्ग ही प्रामुख्याने उपस्थित होता. कार्यक्रमाचे संचालन प्रा. सचिन सरोदे तर आभारप्रदर्शन विजय हरणे पाटील यांनी केले.



### शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचा उत्साह

**अंजनगाव बारी-**वडगाव जिरे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विविध उपक्रमांचे आयोजन उत्साहात करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात विद्येची देवता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले तसेच इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना समग्र शिक्षा अभियानांतर्गत शैक्षणिक गणवेश, पाठ्यपुस्तके, वही, पाण्याच्या बाटल्या व इतर शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोहर मारोडकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. याच प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक शिवलाल बोरकर यांच्या सेवानिवृत्ती निमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या सन्मानार्थ विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजनही करण्यात आले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहशिक्षिका निशा सोयाम यांनी मोलाचे योगदान दिले.यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोहर मारोडकर, सहशिक्षिका निशा सोयाम, आशाताई, वंदना रामटेके तसेच किसनराव मात्रे, शरदराव ब्राह्मणे, पुनम वासनिक, जनार्धन लाहाबर यांच्यासह ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### खा.वानखडे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर

**आसेगाव पूर्णा-**अमरावती जिल्ह्याचे खा.बळवंत वानखडे यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवारी आसेगाव पूर्णा येथील ग्रामपंचायत भवनात आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात तब्बल ७३ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकीची जाणीव करून दिली. तसेच रस्ते सुरक्षा जनजागृतीचा संदेश देत प्रथम ५० रक्तदात्यांना हेल्मेटचे वाटप करण्यात आले. मेळघाट ब्लड बँकेचे डॉ. मनीष चंदनानी, रजनी रावटकर, डॉ. निलेश काकडे, शेख सलमान, कुमारी मैथिनी व पल्लवी घुले यांच्या वैद्यकीय पथकाने रक्तदात्यांची तपासणी करून रक्तसंकलनाची प्रक्रिया पार पाडली. आसेगावचे ठाणेदार सुरज तेलगोटे यांच्या हस्ते रक्तदात्यांना हेल्मेटचे वितरण करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते गोपाळराव शिरभाते, ठाकरे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आशिष वाटाणे, काँग्रेसचे मोहन मोरे, योगेश शिरभाते, मोहन रघुवंशी, सदानंद गवई, प्रताप गोंडाणे यांच्यासह ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते व मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते. रक्तदानासह रस्ते सुरक्षेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

### 'डॉक्टर्स' व 'सी.ए.डे' निमित्त सत्कार

**अमरावती-**लायन्स क्लब अमरावती रियल तसेच लॉयन क्लब अमरावती रियल सफायर यांच्या वतीने डॉक्टर्स डे व सी.ए. डे निमित्त जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, अमरावती येथे सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात अमरावती विभागाचे प्रादेशिक सहआयुक्त डॉ. यसूदेव वंजारी, सहाय्यक आयुक्त डॉ. पुरुषोत्तम सोलंके, पशुधन विकास अधिकारी डॉ. मिलिंद काळे, डॉ. नितीन पाटणे, डॉ.संतोष भोसले, डॉ. वैभव सानप तसेच प्रख्यात बालरोगतज्ज्ञ डॉ. सतीश तिवारी व डॉ.तेजवानी यांचा सन्मान करण्यात आला. तसेच सी.ए. डे निमित्त ज्येष्ठ सनदी लेखापाल सी.ए. विजय जाधव यांचाही शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन लायन क्लब अमरावती रियल चे डॉ. दीपक कऱ्हे (अध्यक्ष) यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरीत्या पार पडले. कार्यक्रमास लायन श्याम जाडिया (सचिव), गौरव कोटवानी (कोषाध्यक्ष) त्याचप्रमाणे नेहा हरेश उदासी (अध्यक्ष), योगिता चेतन पटेल (सचिव) कशिश राजा किंगराणी (कोषाध्यक्ष) उपस्थित होते तसेच दिनेश अग्रवाल, राजा किंगराणी, हेमंत वालचाळे, सोहेल टॉपर, हरीश उदासी ,चंद्रदत्त मिश्रा, मनोज मिश्रा, जितेंद्र झा, ज्योती क-हे, गीता मिश्रा, रितू जय तेजवानी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# महिलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी

## राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर

**अमरावती/प्रतिनिधीः-** कामाच्या ठिकाणी महिलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. शासनाच्या महिला केंद्रित योजनांचा लाभ प्रत्येक पात्र महिलेपर्यंत पोहोचला पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले आहे.

येथील महसूल भवन येथे आयोजित बैठकीत त्यांनी महिला सुरक्षा, सक्षमीकरण आणि शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेतला, त्यावेळी त्या बोलत होत्या.

याप्रसंगी बोलताना रहाटकर यांनी सर्व शासकीय विभागांना एका महिन्याच्या आत आपल्या कार्यालयांमध्ये 'पॉश' म्हणजेच लैंगिक छळ प्रतिबंधक समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले. या समित्या स्थापन करून त्याचा सविस्तर अहवाल संबंधित जिल्हा प्रशासनाकडे सुपूर्द करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.



या आढावा बैठकीला विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना, बुलढाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण कुमार देवरे, वाशिम जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी तसेच वन विभागाच्या मुख्य वन संरक्षक जयोती बॅनर्जी, वनसंरक्षक अर्जुना के आर यांच्यासह सर्व प्रमुख विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

रहाटकर म्हणाल्या की, प्रशासनामार्फत जिल्ह्यातील सर्व समित्यांना टप्प्याटप्प्याने प्रशिक्षण देण्यात यावे. यासाठी येत्या चार महिन्यांचा एक सुनियोजित कार्यक्रम तयार करून राबविण्यात यावा. महिलांविरुद्ध घडणाऱ्या गुन्ह्यांमध्ये पीडित महिलांना तातडीने आणि अत्यंत संवेदनशीलतेने न्याय मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

कामाच्या ठिकाणी महिलांसाठी अत्यंत सुरक्षित, भयमुक्त आणि सन्मानजनक वातावरण निर्माण करणे ही सर्वच शासकीय ☞(पान २ वर)

# ५८ तक्रारींवर राष्ट्रीय महिला आयोगाची जनसुनावणी

राष्ट्रीय महिला आयोगाच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात जनसुनावणी घेण्यात आली. यात ५८ तक्रारी विचारात घेण्यात आल्या. विशेष म्हणजे उपस्थित सर्व तक्रारदारांशी आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी व्यक्तिशः भेट घेतली आणि त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधितांना निर्देश दिले.



जनसुनावणीच्या वेळी विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, विशेष पोलिस महानिरीक्षक महेश पाटील, पोलिस आयुक्त राकेश ओला, जिल्हा पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांच्यासह आयोगाचे अधिकारी उपस्थित होते.

जनसुनावणीसाठी आलेल्यांची नोंदणी करून त्यांना टोकन क्रमांक देण्यात आले. नियोजन भवनात दोन पॅनेल करून उपस्थित महिलांच्या तक्रारी ऐकून घेण्यात आल्या. त्यानंतर संवेदनशील प्रकरणी आयोगाच्या अध्यक्ष रहाटकर यांनी तक्रारदारांशी व्यक्तीशः संवाद साधला. जनसुनावणीत प्रामुख्याने पॉश, नातेसंबंधातील तडजोडीची प्रकरणे, घरगुती हिंसाचार आदी प्रकरणे समोर आली. काही प्रकरणी तक्रारदाराचे म्हणणे ऐकून घेऊन☞(पान २ वर)

# चिखलदऱ्यात पावसाळी पर्यटनासाठी पोलिसांचा विशेष बंदोबस्त

## २०० पोलीस व १०० होमगार्ड तैनात

**अमरावती/प्रतिनिधीः-** विदर्भातील प्रमुख पर्यटनस्थळ असलेल्या चिखलदऱ्यात पावसाळ्यात मोठ्या संख्येने पर्यटक दाखल होत असतात. पर्यटकांचा प्रवास सुरक्षित, आनंददायी आणि सुरळीत व्हावा यासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांनी व्यापक नियोजन करत विशेष सुरक्षा व वाहतूक बंदोबस्त तैनात केला आहे.



पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली यंदाच्या पावसाळी पर्यटन हंगामासाठी सुमारे २०० पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच १०० होमगार्ड विविध ठिकाणी नियुक्त करण्यात आले आहेत. पर्यटनस्थळे, व्ह्यू पॉइंट्स, मुख्य मार्ग, गर्दीची ठिकाणे, पार्किंग व्यवस्था आणि वाहतूक नियंत्रणावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

पर्यटकांना तात्काळ मदत व मार्गदर्शन मिळावे यासाठी १४ पोलीस मोटारसायकल रायडर्सना बॉडी वॉर्न कॅमेरे आणि सार्वजनिक सूचना ☞(पान २ वर)

# एकतर्फी प्रेमातून तरुणीवर प्राणघातक हल्ला

## लक्ष्मीनारायण परिसरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** एकतर्फी प्रेमातून तरुणीवर विळ्याने प्राण घातक हल्ला करण्यात आल्याची घटना लक्ष्मीनगर परिसरात समोर आली आहे. १८ वर्षीय तरुणीच्या तक्रारी वरून पोलिसांनी आरोपी योगेश स्वर्गे (वय ३५,भानखेडा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहिती नुसार लक्ष्मी नगर परिसरात आपल्या आई सोबत राहणारी १८ वर्षीय तरुणी गुरुवारी सायंकाळी परिसरातून जात होती. त्यावेळी आरोपी योगेश स्वर्गे तिच्या मागे आला आणि त्याने तिला रस्त्यात अडवून तिच्याशी वाद घातला. तू माझ्यासोबत का बोलत नाही आहे यावरून आरोपी तिच्याशी भांडत होता. हा वाद एवढा वाढला की, आरोपीने तिच्यावर विळ्याने हल्ला केला. तरुणीच्या ☞(पान २ वर)

# घर भाड्यावरून झालेल्या वादात तरुणीचा संशयास्पद मृत्यू

## मोबाईल गायब झाल्याने संशय वाढला

**अमरावती/प्रतिनिधीः-** निंभोरा परिसरात घर भाड्यावरून झालेल्या वादात एका तरुणीने संशयास्पद स्थितीमध्ये गळफास घेतला. तरुणीच्या आईने आरोप केला आहे की, घरमालकीण आणि पतीने तिला मारहाण आणि प्रताडित केल्याने तिने हे पाऊल उचलले. घटनेनंतर मृतक तरूणीचा मोबाईल गायब झाल्याने या प्रकरणात संशय आणखीन गडद झाला आहे. मयुरी बावनकर असे मृत विवाहितेचे नाव आहे. माहितीनुसार मयुरी बावनकर नोकरी करून घर भाडे आणि स्वतःचा खर्च काढत होती. गुरुवारी सकाळी मयुरीने ११ वाजता आपली बहीण जयश्री पवार हिला फोन करून सांगितले की घर भाड्यावरून तिचा घर मालकीण वैशाली काळे यांच्याशी वाद झाला आहे. आरोप आहे की या वादात तिच्याशी मारहाण करण्यात आली होती. बहिणीला फोन केल्यानंतर मयुरीने आत्महत्या केली. गुरुवारी दुपारी मयुरीच्या शेजारी राहणाऱ्यांनी जयश्रीला तिने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे सांगितले. माहिती मिळताच कुटुंबीय निंभोरा मध्ये तिच्या राहत्या घरी पोचले जेथे स्वयंपाक घरात मयुरी



गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसली. पोलिसांनी घटनास्थळावर पोहोचून पंचनामा केला आणि मृतदेह जिल्हा सामान रुग्णालयात पाठवला. तिच्या आईने आरोप लावला की जेव्हा त्यांनी मयुरीचा फोन मागितला तर घरमालकाने सांगितले की फोन पोलिसांनी जप्त केला आहे. पोलिसांना विचारपूस केली असता त्यांनी मोबाईल नसल्याचे सांगितले. यामुळे कुटुंबियांचा संशय आणखीन वाढलेला आहे. या प्रकरणात निष्पक्ष तपास करून दोषीवर कार्यवाही करण्याची मागणी ☞(पान २ वर)

# शिराळ्यात तलवार व कोयत्यासह युवक ताब्यात



**अमरावती/प्रतिनिधीः-** अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत अमरावती शहर गुन्हे शाखेने शिराळा गावात धडक कारवाई करत एका युवकाला तलवार आणि धारदार कोयत्यासह ताब्यात घेतले. जप्त करण्यात आलेल्या शस्त्रांची किंमत एक हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

शिराळा येथील रोहित राठोड नावाचा युवक आपल्या घरी अवैध शस्त्रे लपवून ठेवत असल्याची माहिती पोलिसांना प्राप्त झाली होती. माहितीची खातरजमा केल्यानंतर गुन्हे शाखेचे पथक तातडीने शिराळा ☞(पान २ वर)

# सराईत फरार आरोपी राजापेठ पोलिसांच्या जाळ्यात

## वॉण्टेड जय कडूला छत्री तलाव परिसरातून अटक

**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ आणि फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या दोन गंभीर गुन्ह्यांमध्ये फरार असलेल्या एका सराईत आरोपीला राजापेठ पोलिसांनी शिताफीने अटक केली.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव जय सुनील कडू (वय २४, रा. मेहेरबाबा कॉलनी, अमरावती) असे आहे. त्याच्याविरुद्ध राजापेठ आणि फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यांमध्ये गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून तो बराच काळ पोलिसांना चकवा देत फरार होता. राजापेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे व डीबी पथक फरार आरोपींचा शोध घेत होते. दरम्यान, जय कडू हा छत्री तलाव मैदान परिसरात येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी परिसरात सापळा रचला. संशयित हालचाली आढळताच पथकाने वेगाने कारवाई करत जय कडू याला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याला पुढील कायदेशीर प्रक्रियेसाठी राजापेठ पोलीस ठाण्यात ☞(पान २ वर)

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी खेळ थांबवा गुल्लरघाट आश्रमशाळा तात्काळ पूर्ववत सुरू करा

## पालक व शाळा व्यवस्थापन समितीची मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शासकीय माध्यमिक आदिवासी आश्रमशाळा, गुल्लरघाट (ता. चिखलदरा) ही सन २०१४ पासून दर्यापूर तालुक्यातील कॅम्प बाभळी येथे सुरळीत सुरू असून या शाळेत सुमारे ४५० आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेच्या कामकाजाबाबत पालक किंवा शाळा व्यवस्थापन समितीकडून कोणतीही तक्रार नसताना सन २०२६ मध्ये पालक, शाळा व्यवस्थापन समिती व स्थानिक ग्रामस्थांना विश्वासात न घेता ही शाळा अंजनगाव सुर्जी येथील टिनशेड/ठाकरे सभागृहात स्थलांतरित करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.



पालक व शाळा व्यवस्थापन समितीच्या म्हणण्यानुसार, नाना ठिकाणी वर्गखोल्या, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, पिण्याचे स्वच्छ पाणी तसेच इतर आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणासह त्यांच्या सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी चुकीचे अहवाल सादर करून☞(पान २ वर)

# एसआयआर प्रक्रियेसाठी काँग्रेसची संघटनात्मक तयारी

## -जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांचे पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन

**अमरावती/प्रतिनिधीः-** विशेष संक्षिप्त पुनरिक्षण प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने जिल्ह्यात संघटनात्मक तयारीला वेग दिला असून, बूथ स्तरापर्यंत सक्षम यंत्रणा उभारण्यावर भर देण्यात येत आहे. याच अनुषंगाने आयोजित बैठकीस अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख तर प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री यशोमती ठाकूर उपस्थित होत्या.



बैठकीत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या निर्देशांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आवाहन करण्यात आले. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात मतदार केंद्र स्तर प्रतिनिधी-१ यांची नियुक्ती करून त्यांचे अर्ज वेळेत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानंतर प्रत्येक मतदार केंद्रावर मतदार केंद्र स्तर प्रतिनिधी-२ नियुक्त करून त्यांची माहिती प्रदेश कार्यालयाकडे पाठविण्याचेही सांगण्यात आले.तसेच जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडून मिळणाऱ्या विधानसभानिहाय मतदार याद्या संबंधित प्रतिनिधींकडे सुपूर्द करणे, जिल्हास्तरीय एसआयआर समन्वय समिती स्थापन करून नियमित बैठका घेणे, तसेच प्रतिनिधींच्या कामावर देखरेख ठेवणे आणि निवडणूक प्रशासनाशी सातत्याने समन्वय राखणे, यावर☞(पान २ वर)

# ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या अध्यक्षपदी संजय चव्हाण



**खल्लार/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन, शाखा दर्यापूरच्या अध्यक्षपदी संजय मनोहरराव चव्हाण यांची निवड झाली आहे. त्यांच्या निवडीबद्दल ग्रामपंचायत अधिकारी, सहकारी तसेच मित्रपरिवाराकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

संजय चव्हाण यांच्या नेतृत्वगुणांचा, संघटनात्मक कार्याचा आणि प्रशासकीय अनुभवाचा विचार करून त्यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यांच्या नेतृत्वाखाली शाखेच्या कामकाजाला अधिक गती मिळेल, तसेच ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी ते प्रभावीपणे कार्य करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# अचलपूर नगर परिषदेच्या उपाध्यक्ष खुर्शीदा बानो अपात्र

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक १८ (अ) च्या नगरसेविका व पालिका उपाध्यक्ष खुर्शीदा बानो अताउल्ला शहा यांचे नगरसेवक पद जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी अमरावती यांनी रद्द करण्याचा आदेश दिला आहे.

### दोनपेक्षा अधिक अपत्यांच्या नियमाचे उल्लंघन केल्याचा ठपका

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १६(१)(क) सह कलम ४४ अन्वये हा आदेश २ जुलै २०२६ रोजी पारित करण्यात आला. या प्रकरणात परतवाडा येथील अभय निर्मल वाजपेयी यांनी तक्रार दाखल करून नगरसेविका खुर्शीदा शहा यांना दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्याने त्या कायद्यानुसार नगरपरिषदेच्या सदस्यत्वासाठी अपात्र ठरतात, असा दावा केला होता. प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान दोन्ही पक्षांनी लेखी व तोंडी युक्तिवाद केला. जन्मनोंदी, जन्मप्रमाणपत्रे,☞(पान २ वर)

# देवडी व चावलमंडीमधील मुख्य रस्त्याला आले तलावाचे स्वरूप जागोजागी खड्डे, पावसाळ्यात पाणी साचल्याने वाहन चालक त्रस्त

**अचलपूर/प्रतिनिधीः-** पावसाळा सुरू होताच अचलपूर शहरातील देवडी आणि चावलमंडी या दोन्ही मुख्य रस्त्याला तलावाचे स्वरूप येते.या दोन्ही रस्त्याचे रुंदीकरण आणि सिमेंट काँक्रीटीकरण चे काम कधी सुरू होणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.या दोन्ही रस्त्यावर जागोजागी खड्डे असल्याने पावसाळ्यात या खड्ड्यामध्ये पाणी साचत असल्याने वाहन चालक त्रस्त झाले आहे. यामुळे शाळा,विद्यालय ,महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पायदळ जाताना अडचणीचा सामना करावा लागत आहे.



अचलपूर शहरातील देवडी आणि चावलमंडी या मुख्य रस्त्यावर विविध शाळा, महाविद्यालय, विविध बँक, शासकीय कार्यालय, व्यापार प्रतिष्ठाने असल्याने या मुख्य रस्त्यावर विद्यार्थी , व्यापारी, कर्मचारी, नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. विशेष म्हणजे या मुख्य रस्त्यावर ट्रक, ट्रॅक्टर, दुचाकी, चारचाकी आदी वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. मात्र या मुख्य रस्त्यावर जागो जागी खड्डे पडल्याने वाहन चालकांना विविध समस्याचा सामना करावा लागत आहे. तसेच या खड्ड्यामध्ये पावसाळ्यात पाणी साचत असल्याने पायदळ जाणारे विद्यार्थ्यांना विविध समस्या चा सामना करावा लागत आहे. या मुख्य रस्त्याचे डांबरीकरण सुद्धा काही वर्षापूर्वी करण्यात आले होते .यानंतर या दोन्ही मुख्य रस्त्याचे रुंदीकरण आणि सिमेंट काँक्रीटीकरण साठी शासनाकडून निधी मंजूर झाला आहे .मात्र त्या दोन्ही रस्त्याचे रुंदीकरण☞(पान २ वर)

# दर्यापूर जिल्हा न्यायालयाच्या निवडणुकित परिवर्तन पॅनलचे चार उमेदवार अविरोध

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर जिल्हा न्यायालयाच्या होऊ घातलेल्या निवडणुकीत परिवर्तन पॅनलचे ॲड. उषा दिलीप कुमार अग्रवाल, ॲड. सौरभ दिघडे,ॲड. आम्रपाली चौरपगार, ॲड.रितेश गवई हे चारही सदस्य पदाचे उमेदवार ॲड. धर्माधिकारी, दिलीप कुमार अग्रवाल, ॲड. राजाभाऊ गोमासे,ॲड.जगदीश विल्हेकर, ॲड. विद्यासागर वानखडे, ॲड.मुकुंद नळकांडे, ॲड.निशिकांत पाखरे, ॲड. नंदू रायकवार, ॲड. एन.बी.पवार, यांचे नेतृत्वात बिनविरोध नियुक्त झाले आहेत.



अध्यक्ष पदासाठीचे उमेदवार ॲड.प्रदीप शेळके, विरुद्ध ॲड. संतोष कोल्हे, उपाध्यक्ष पदाचे उमेदवार ॲड. देवानंद पर्वतकर, विरुद्ध ॲड.रियाज घाणीवाले तर सचिव पदाचे उमेदवार ॲड.अनुराधा गोमासे, विरुद्ध ॲड.विकास पळधामोळ सहसचिव पदाचे उमेदवार ॲड.लीना गहरवाल, विरुद्ध ॲड.भाग्यश्री कुंभारे (मोपारी) तर कोषाध्यक्ष पदाचे उमेदवार ॲड. वैभव इंगळे विरुद्ध ॲड.ऋतिक मलिये हे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

# गुरुकुंज उपसा सिंचन योजना भाग -२ ला शासनाची मान्यता राजेश वानखडे यांच्या विधानमंडळातील मागणीला मोठे यश

## १२ गावातील शेतकऱ्यांचे ४००० हेक्टर क्षेत्र सिंचित होण्याचा मार्ग प्रशस्त

**तिवसा :** तिवसा विधानसभा मतदारसंघातील गुरुकुंज उपसा सिंचन योजना भाग -२ ला मान्यता देऊन या योजनाअंतर्गत पहिल्या टप्प्यामध्ये तिवसा तालुक्यातील वऱ्हा सर्कल मधील सिंचनापासून वंचित राहिलेल्या १२ गावांना वाढीव उपसा सिंचन योजना मंजूर करून शेतकऱ्यांना सिंचनाची सोय उपलब्ध करून देण्यात यावी याबाबत विधिमंडळाच्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनामध्ये औचित्याचा मुद्द्याद्वारे आमदार राजेश वानखडे यांनी शासनाकडे आग्रही मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला मोठा यश मिळालं असून शासनाने गुरुकुंज उपसा सिंचन योजना भाग - २ कार्यान्वित करणे करिता आता मान्यता दिलेली आहे. जलसंपदा विभागाचे सचिव यांनी विदर्भ विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक यांना पत्रा द्वारे ☞(पान २ वर)



# पहिल्याच पावसात महामार्गाला खड्ड्यांचे ग्रहण

## कोटींचा खर्च पाण्यात, PWD अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी ते टाकरखेडा जिल्हा महामार्गावर पहिल्याच पावसात जीवघेणे खड्डे पडल्याने नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे तीन वर्षांपूर्वीच या महामार्गाचे नूतनीकरण कोट्यवधी रुपये खर्चून करण्यात आले होते.

अंजनगाव शहरातून जाणाऱ्या या मार्गावर प्रभा मंगल कार्यालयासमोर मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसाचे पाणी साचल्याने हे खड्डे अधिकच धोकादायक बनले आहेत. दुचाकीस्वारांसाठी हे खड्डे जीवघेणे ठरत आहेत.स्थानिक नागरिकांच्या मते, पाण्याचा योग्य निचरा झाला असता तर खड्डे पडले नसते. यावरून ☞(पान २ वर)



# हरविलेले २० मोबाईल शोधून मूळ मालकांच्या ताब्यात



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर पोलिस स्टेशनच्या सतर्कता, तांत्रिक कौशल्य आणि सायबर विभागाच्या मदतीमुळे हरविलेले तब्बल २० मोबाईल फोन शोधून त्यांच्या मूळ मालकांना परत करण्यात आले. या उपक्रमामुळे नागरिकांनी दर्यापूर पोलिसांच्या कार्याचे कौतुक केले आहे.

ही कारवाई अमरावती ग्रामिणचे पोलिस अधिक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली☞(पान २ वर)